# बोल-बाला.



पुरुषोत्तम पांडुरंग गोखले, कऱ्हाड.

किंमत ८ आणे.

# सुरवातीची सजावट.


| | विषय | दिवस | स्थळ | पान |
|---|---|---|---|---|
| | प्रस्तावापूर्वी | | | |
| | प्रस्ताव | | | |
| १ | कै. नाना शंकर शेट | १८-८-३४ | दैवज्ञक्लब कराड | १ |
| २ | भारताचें गणेशपूजन | १८-९-३१ | सिटीस्कूल सांगली | २ |
| ३ | निरोप | (१) १८-१-३२ (२) भाद्र. ३०, १८५२ | तुरुंगाचे वाटेवर | ३ |
| | | (३) मार्च १९३५ | स्वतांचा वर्ग | ८ |
| | | (४) १७ मार्च १९३६ | कराड मराठी शाळा नं. १ | १३ |
| | | (५) १९३२ | बंदींतून घराकडे | २९ |
| ४ | लोकमान्यांचें राष्ट्रीय तत्वज्ञान | १-८-३४ | सार्वजनिक वाचनालय कराड | ४ |
| ५ | नर व्हा नर | १९३६ मार्च | स्वतांचा वर्ग | ४ |
| ६ | शेतीचा देव | ऋषिपंचमी १८५० | येळूर गणेशोत्सव | ५ |
| ७ | तुकारामाची कविता | तुकाराम बीज १८५३ | कराड | ७ |
| ८ | हिंदूंच्या त्यागतत्वाची सुंदर फोड | शके१८५८धुळवड | स्वामीची बाग कराड | ९ |
| ९ | पाडवा साजरा कां करावा ! | वर्षप्रतिपदा १८५९ | रा. स्वयंसेवक संघ कराड | १२ |
| १० | विद्यार्थि-मित्र | ६-२-१९३३ | कराड शाळा नं. १ | १३ |
| ११ | नव्या घटनेचा धिक्कार | १-४-३७ | इस्लामपूर | १३ |
| १२ | विनय | सरस्वत्युत्सव १९२८ | टिळक हायस्कूल कराड | १६ |
| १३ | संततिनियमनाचे मार्ग | १९३३ | कराड | १७ |
| १४ | दिवाळखोर देवनागरी | १९२७ | गणेश वाचनालय पुणें | २० |
| १५ | खेडेगांवची सेवा | ७-३-३५ | मुली. व्ह. फा. परीक्षेचे वेळीं 'शिक्षण कोर्स' कराड | २१ |
| १६ | सेनापति बापू गोखले | माघ ५, शके १८५३ | कराड | २३ |
| १७ | नामदार गोखले | १९-२-३१ | मनोरंजक वाचनालय कराड | २६ |
| १८ | महाराष्ट्राचे पंचप्राण | २४-२-२५ | गणेश वाचनालय पुणें | २७ |
| १९ | साहे ओझें त्यास तेंचि द्यावें | ७-५-२८ | वसंत व्याख्यानमाला, वांई | २७ |
| २० | प्रगतीची व्याख्या | आक्टोबर १९३३ | सरस्वत्युत्सव कराड | २८ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २१ | शाळा सोडल्यावर | १९२५ | गणेशोत्सव कराड शाळा नं.१ | ३० |
| २२ | कृष्णकालीन शारीरिक शिक्षण | कृष्णाष्टमी | टिळक हायस्कूल कऱ्हाड | ३५ |
| २३ | महाराष्ट्राचा इतिहास | १९३७ | सुरली | ३७ |
| २४ | वर्तमान व भविष्यकाल | १९३७ | ताकारी | ३७ |
| २५ | पाश्चात्यांचा फायदा | चीनदिन १९३७ | कराड | ३८ |
| २६ | बोलघेवड्यांचा बाजारभाव | १९३७ | वसंतव्याख्यानमाला किर्लो.वाडी | ३८ |
| २७ | चित्पावन | १९३६ | चित्पावनसंघ, बेळगांव | ४४ |
| २८ | दासबोध | दासनवमी १८५५ | कराड | ४५ |


श्री. पुरुषोत्तम पांडुरंग ऊर्फ बाबूराव गोखले यांची ही व्याख्यानपस्तीशी आहे. पैकीं २१वें व्याख्यान " शाळा सोडल्यावर " हें " बालोपयोगी व सर्वोपयोगी " म्हणून नागपूर साहित्य-संमेलनाचे अध्यक्ष नाटयाचार्य खाडीलकर यांनीं गौरविलेलें होतें. पृष्ठ २९ वर दिलेलें ' निरोप ' पुस्तकरूपानें प्रसिद्ध करतांच एक वर्षाच्या आंतच ती आवृत्ति भुर्कन उडाली. दुसरेही निरोप जनतेच्या कौतुकाचा विषयच होते. पृ. २३ ते २८ वर क्रमांक १६ ते २०चीं व्याख्यानें ' गोखले आणि-' या नांवें १९३४ सालीं पुस्तिकारूपानें प्रसिद्ध केलीं होतीं. त्यांचीही नवी आवृत्ति काढणें जरूर भासूं लागलें होतें. " हिंदूंच्या त्यागतत्वाची सुंदर फोड " हें व्याख्यान कॉलेजमधील तरुणांनीं मोठ्या आस्थेनें वाचल्याचें आम्हांस समजलें आहे. या सर्वांवरून एकच गोष्ट स्पष्ट आहे. ती अशी कीं, रा. गोखल्यांनीं आपल्या लेखणीनें तसाच वाणीनें मराठी वाङ्मयाला रंग चढविला आहे.

" बोलबाला हें पुस्तक आम्ही हातीं घेतलें त्यावेळीं त्यांतले सगळे विषय पूर्ण वाचल्याशिवाय आमच्यानें ते खालीं ठेववेना. विषयवैचित्र्य, विषयाची चित्ताकर्षक मांडणी आणि तो तो विषय मांडतांना त्या त्या भागाशीं समरस होऊन विवेचन करण्याची साहाजिक हातोटी आम्हांस फार आवडली. श्रीयुत गोखले ह्यांच्या व्याख्यानांचें संपूर्ण पुस्तक म्हणजे महाराष्ट्र शारदेच्या वाङ्मयमंदि-रांतील एक संग्राह्य, वाचनीय आणि मननीय पुस्तक होय असें आम्हांस वाटतें." —**मित्र**, बेळगांव.

आणि या दृष्टीनें पाहिलें तर ज्याची ' ऐक्यानें स्तुती केली तें १९३१ मधील साताऱ्या पाठकमनवांतील व १९३२तील कऱ्हाड घाटावरील 'न्यायमूर्ति रानडे' हें व्याख्यान अगर १९३१सालीं सांगलीस गणपत्युत्सवांत दिलेलें " हिंदुसंघटनेवरील " व्याख्यान यांची अक्षरशः प्रसिद्धी झाली असती, तर तीं व्याख्यानें " मराठीचीं भूषणें " म्हणूनच मिरवलीं असतीं. पण त्यांचा सारांशही

प्रसिद्ध झाला नाहीं. याचें कारण " गोखले आणि " या पुस्तकाच्या " शेवटच्या पानावर " स्वतांच गोखल्यांनीं म्हटल्याप्रमाणें " आमच्या इकडे लघुलेखकांचे रिपोर्ट नसतात. " आणि वृत्त-पत्रांचे वार्ताहर वक्त्यांच्या भाषणाचा फार तर सारांश शक्य तितका वक्त्यांच्याच शब्दांत प्रसिद्ध करतात. असा सारांश शक्य तर वेचक व बिनचूक देणें ही एक अवघड कला आहे. या कलेचा सराव असणारांनाही उत्तम व्याख्यानाचा सारांश स्वतांचें समाधान करील असा देणेंही अवघड जातें. स्वतां बोलणारालाही आपल्या भाषणाचा यथातथ्य सारांश लिहून देणें कठीण असतें. प्रस्तुत व्याख्यानसंग्रहांतील " शेतीचा देव " हेंच त्याचें उदाहरण होय. तात्पर्य, बोलायला उभें राहतांना व्याख्यान " फर्डे होईलच अशा विश्वासानें लघुलेखक नियोजिला तरी तो सारांशपटु भेटेलच असा नियम नाहीं. " अशा स्थितींत वृत्तपत्रांच्या वार्ताहरांना रुचतील–पचतील–सुचतील एवढेच भाषणांचे सारांश प्रसिद्धी पावतात. अर्थात् अभ्युदय कराड, ऐक्य-समर्थ सातारा, त्रिकाळ-ज्ञानप्रकाश-लोकशक्ती पुणें, भारतमाता इसलामपूर, लोकमान्य-नवाकाळ मुंबई वगैरे पत्रांच्या वार्ताहरांनीं दिलेले गोखल्यांच्या भाषणांचे अस्सल वाटले ते सारांश म्हणजेच प्रस्तुत पुस्तक होय हें आतां निराळें सांगावयास नको.

स्वतां गोखलेच ( जानेवारी १९३४ मध्यें ) लिहितात कीं,—" मी वक्ता नाहीं. जिभेचा उपयोग लोकसेवेंत करणारा आहे. जिभेचा उपयोग परिणामकारक होतो आणि कित्येक वेळां चिर-स्थाई वाङ्मय निर्माण करतो. " ही योग्यता प्रस्तुत पुस्तकास आहे कीं नाहीं हें जाणत्यांनीं ठरवावयाचें आहे. तसें ठरविण्यास सोपें जावें म्हणून वृत्तपत्रांच्या रकान्यांत बसून राहिलेलें हें गोखल्यांचें " वाङ्मय " पुस्तकरूपानें संकलित केलें आहे.

सौ. सुलोचनाबाई गोखले.

आमचीं

## लोकप्रिय पुस्तकें.

| | किंमत |
|---|---|
| अभ्युदयाचीं नवरत्नें ... ... ... | ०—१-६ |
| शारदासदन ... ... .... ... | ०—८-० |
| विवेकविहार ... ... ... ... | ०—८-० |
| ज्ञानकिरण ... ... ... ... | ०—८-० |
| रुक्मिणीस्वयंवर (श्री. नवांगुळकृत) ... | ०–१२–० |
| फुलोरा (साहित्यसेवामंडळ) ... ... | ०—८-० |
| शिव—वात्सल्य (श्री. घाटेकृत) ... ... | ०—१—० |
| स्फूर्तिकिरण (राष्ट्रीयगीतें) .... ... | ०—१-० |

हा सर्व गट एकदम घेणारास दोन रुपयांत मिळतो.

व्यवस्थापक—श्रीलक्ष्मी प्रेस, कऱ्हाड.

# बोलकाल्याचीं भावंडें.

अर्थात्

श्री. पु. पां. गोखले, बी. ए.

यांचीं

## लोकमान्य पुस्तकें.

गोखले आणि—(स्वराज्यानंतरच्या महाराष्ट्राचें चित्र) किं. ८८९

गो. ग. आगरकर (चरित्र) ... ... किं. ८१८६

संपादक आगरकर (निबंध) .... .... किं. ८४

जागृत सातारा (१९३५ पर्यंतचा सातारा जिल्ह्याचा राजकीय इतिहास) किं. १ रु.

सौ. सुलोचनाबाई गोखले, कऱ्हाड.

# “ प्रस्तावा ” पूर्वी.

समाजसेवक पु. पां. ऊर्फ बाबूराव गोखले यांनीं वेळोवेळीं दिलेल्या विविध विषयांवरील व्याख्यानांचा सारसंग्रह म्हणजे हा ‘ बोल-बाला ’! कागदावर उतरलेल्या लेखनावरून जसें लेखकाच्या जीवनाविशेषाचें आपणांस ज्ञान होऊं शकतें त्याप्रमाणें व्याख्यानांत व्यक्त झालेल्या विचारांवरून वक्त्याच्या व्यक्तिमत्त्वावर प्रकाश पडूं शकतो. मुळाइतपत मोल नसलेलीं चित्रें पाहणाऱ्या मनुष्याच्या आनंदापेक्षां व्याख्यानें वाचणाऱ्या वाचकाच्या आनंदांत अधिक जिवंतपणा असतो असें म्हणण्यास कांहीं प्रत्यवाय नाहीं. प्रस्तुत पुस्तकांतील उच्च विचारावरून दे. भ. बाबूराव गोखले यांच्या थोर व्यक्तिमत्त्वाच्या जाणिवेबरोबर वाचकांना कार्यप्रेरक आनंदही होईल, असा विश्वास वाटतो.

निरपेक्ष समाजसेवा हाच दे. भ. बाबूराव गोखले यांच्या जीवनांतील स्थायीभाव ! लहानपणापासून गरीबीची सोबत घेऊन आत्मविश्वासानें व समाधानवृत्तीनें त्यांनीं अद्यावत् आपलें आयुष्य पार पाडलें आहे. विद्यार्थीदशेंत निश्चित केलेल्या जीवनाच्या ध्येयावरील म्हणजेच समाजसेवेवरील त्यांची निष्ठा विपरीत वस्तुस्थितींतही विचलीत होऊं शकली नाहीं. प्रापंचिक जबाबदाऱ्याकडे ते दुर्लक्ष करीत नसले, तरी पण सार्वजनिक कार्याइतके संसारांत ते कधींच रममाण झालेले आढळत नाहींत. तेल घातल्यावाचून नुसती काजळी झाडण्यानें जसा दिव्याचा प्रकाश पडत नाहीं तद्वत् घातकी चालीरीतीचा निव्वळ उच्छेद करण्यानें समाजाची उन्नति होत नाहीं. तर त्यासाठीं मन, मेंदू नि मनगट यामध्यें सात्विक सामर्थ्य संचारलें पाहिजे. दे. भ. गोखले यांनीं तें सामर्थ्य निर्माण करण्याकडे तारीखतागायत आपली वाणी आणि लेखणी झिजविलेली आहे.

मनुष्याचे विचार जितके स्वतंत्र तितके त्याच्या वाणींत तेज अधिक असतें. बोलल्या बोलांला जर प्रचीतीचें पाठबळ असेल तर श्रोत्यांच्या अंतःकरणावर तें आपला कायम ठसा उमटविल्यावांचून राहात नाहींत. दे. भ. गोखले यांचे विचार आकर्षक, ओजस्वी नि तेजस्वी वाटण्याचें कारण हेंच होय. तीव्र तळमळीच्या पोटीं जन्मलेली त्यांची वाणी श्रोत्यांच्या काळजाला जाऊन भिडते म्हणूनच त्यांचें भाषण ह्मणजे एक स्फूर्तिदायक संदेश वाटतो. श्रोत्यांना शब्दसौंदर्याचा साक्षात्कार घडविण्यापेक्षां कार्यप्रेरकतेच्या दृष्टीनें अर्थानें भेदक नि नादानें वेधक अशी शब्दयोजना करण्याकडे ते अतिशय लक्ष पुरवितात. त्यांच्या भाषणांत कुठें काव्य फुललेलें असेल तर कुठें शब्दनिष्ठ व अर्थनिष्ठ कोटयांचा चमत्कार दिसेल; मधून मधून मराठी वळणाचे नवीन नादानुकारी शब्द सांपडतील तर कुठें कल्पकतेच्या भराऱ्या दृष्टीस पडतील. जोरदारपणा हेंच त्यांच्या भाषेचें खरें वैशिष्टय असल्यामुळें लवलवित लालित्य कुठेंही दिसणार नाहीं. प्रस्तुत पुस्तकांतील गोखल्यांच्या व्याख्यानांच्या “ सारांशावरूनही ” तोच प्रत्यय वाचकांस येईल.

**प्र. ल. ऊर्फ शंकर करंबेळकर.**

# प्रस्ताव.

माझे मित्र रा. बाबूराव गोखले यांच्या पत्नी सौ. सुलोचनाबाई यांनीं ज्यावेळीं मला " बोल-बाला " या पुस्तिकेस प्रस्ताव लिहिण्याची विनंति केली त्यावेळीं मला दुहेरी आनंद झाला. प्रस्तावना लेखनाची पात्रता आपल्या अंगीं आहे असें मानणारे एक तरी आपुलकीचें माणूस आहे हें एक व दुसरें असें कीं—व तोच खरा आनंदहेतु होय—माझ्या मनांत मित्रवर्य बाबूराव यांचेबद्दल वसत असलेला भाव अक्षर करण्याची संधि मला त्यांनीं दिली. वस्तुतः त्यांच्याबद्दल माझ्या मनांत वसत असलेला भाव शब्दगत करून त्यांचें संपूर्णत्व मी प्रकट करूं नये अशीच माझी मनापासूनची इच्छा. परंतु भावनांचें व्यक्तीकरण केलें नाहीं तर ' स्नेहवात ' अंतर्मुख होऊन दोघांच्याहि जीवांना जाळत असते हा मानसशास्त्रीय सिध्दांत माझे डोळ्यापुढें आला आणि मी हें कार्य करण्याचें मनानें पत्करलें.

'पिकतें तेथें विकत नाहीं' या न्यायाचें प्रत्यन्तर यंत्रयुग आल्यापासून तर फारच तीव्रतेनें येत आहे. यंत्रयुगानें मानवी जीवनांतहि क्रांति करून टाकली आहे. सर्व धनवान् एकीकडे होऊन त्यांची सत्ता स्थिर राहण्यासाठीं जे उपयोगी पडतील त्यांच्याच गुणाचें-श्रमाचें-मोल द्यावयाचें ही वृत्ति समाज घटनेंत बळावत जात आहे, हा या यंत्रयुगाचा परिणाम आहे. What man has made of man असें कवींना म्हणावयास लावणारा हा काळ आहे. आणि या वृत्तीच्या दार्ढ्यानेंच ' जेथें पिकतें तेथें विकत नाहीं ' ही म्हण पालटून 'पिकते आहे तेथें विकतच नाहीं' असें म्हणावयाची बुद्धिवादी माणसावर पाळी आली आहे. आणि या मनोवृत्तीच्या विकासामुळें—संस्कृतिसंरक्षणाच्या धोरणामुळेंच—दलित मध्यम वर्गांपैकीं अनेक नर-रत्नांना स्वतःच्या विकासास मुकावें लागत आहे. अशा अत्यंत थोर गृहस्थांपैकीं बऱ्याच वरच्या मानाचें पान ज्यांना मिळावें असे माझे मित्र बाबूराव आहेत अशी माझी खात्री आहे.

त्यागपूर्ण जीवनाची तर ते प्रतिमाच आहेत. त्यांच्या इतकीच जीवनाचीं साधनें ज्यांच्याजवळ आहेत ते सर्व त्यांच्या एकदशांश त्यागास तयार होतील तर सामाजिक क्रान्तीची गति किती तरी वेगवान झाल्याशिवाय राहणार नाहीं. बायबलांतील गोष्टींत म्हटल्याप्रमाणें त्यांनीं केलेल्या गुप्त वा प्रकट दानाचें पुण्य अत्यंत मोठें आहे. त्यांच्या त्यागाप्रमाणेंच त्यांची सेवावृत्ति ही अत्यंत अनुकरणीय अशीच आहे. सामाजिक वा राजकीय क्षेत्रांत कोठलेंहि काम करण्यास त्यांची केव्हांही तयारी असते. समाजाची सेवा बुद्धिवान जाणत्या माणसांनीं करावयाची नाहीं तर इतर कोण करणार असें ते नेहमीं म्हणत असतात; यावरून तरी मोठमोठ्या माणसांनीं त्यांच्या मनोवृत्तीची ओळख करून घ्यावी.

त्याग व सेवा यांचे बरोबरच साधूचा सर्वांत मोठा गुण बोलण्याप्रमाणें चालणें; हा त्यांच्या अंगीं पूर्णपणें मुरला आहे. अर्थात् त्यांचें बोलणेंहि आगरकरी बाण्याप्रमाणें पटेल तेंच असतें हें सांगणें नकोच.

इतक्या विस्तारानें बाबूरावजींची ओळख करून देण्याचें कारण एकच आहे. त्यांच्या गुणांचें वर्णन करून ग्रहदूषित मेंदू सुधारतील अशी आशा मला बिलकुल नाहीं. पण हा बोल-

बाला ज्यांच्यासाठीं प्रकाशित होत आहे अशा बुद्धिवादी तरुणांसाठींच त्यांच्या गुणांचें मंडन मी मांडीत आहे.

'बोलबाला' या पुस्तकांत रा. बाबूराव यांच्या निरनिराळ्या विषयांवरील व्याख्यानांचें सार एकत्र केलें आहे. सामाजिक, धार्मिक, राजकीय व इतरही कांहीं विषयांचा समावेश या बोलबाल्यांत करण्यांत आला आहे. परंतु या सर्व मण्यांचें विचारसूत्र एकच आहे. सर्व तरुणांनीं 'नव्या काळाला कलाटणी देणाऱ्या कार्याचा श्रीगणेशा' बुद्धिवादी क्रांतिकारक विचारांनीं करावा हेंच तें होय. नाना शंकरशेठांचें चरित्र असो, सेनापती बापू गोखल्यांचें वर्णन असो कीं नामदार गोखल्यांचें चित्र रंगवावयाचें असो, कै. शिवरामपंत परांजपे यांच्या प्रमाणें बाबूराव यांच्यापुढें स्वातंत्र्य हें ध्येय आहे.

व तेंहि "मराठीच्या शिवाजीच्या" संदेशाप्रमाणें "स्वावलंबन व स्वाभिमान" या साधनांनींच मिळविण्याचा मार्ग तरुणांनीं गिरवावा अशी त्यांची तीव्र तळमळ आहे.

लोकमान्यांचें राष्ट्रीय तत्वज्ञान सांगावयाचें असो किंवा हिंदूंच्या त्यागतत्वाची फोड करावयाची असो, त्यांचें आपलें एक सांगणें. आपली परंपरा तेजस्वी राखावी, सत्ताधिकाऱ्यांना बेचैन करावें इतकेंच नव्हे तर निःश्रेयसाबरोबरच राष्ट्रीय अभ्युदय साधावा. हें करतांना आपली बुद्धि भ्रष्ट करण्याचा शत्रूंनीं कितीही प्रयत्न केला तरी बुद्धिहत न होतां किंवा कलागतीचें बीज पेरून समाजाची घटना विषदग्ध करण्याचा परकीयांचा प्रयत्न चालू असतां त्याला बळी न पडतां महाराष्ट्रीयांनीं आपला बाणेदारपणा कायम राखून परराज्याचें जूं झुगारून देण्याचा प्रयत्न प्रत्येकानें केला पाहिजे असेंच बाबूरावजींचें सांगणें व मनापासूनचें सांगणें आहे. याच ठिकाणीं एक दोन प्रश्नाबद्दल रा. बाबूराव यांचे व माझे विचार भिन्न आहेत असें सांगावयाचें आहे. महात्मा गांधींनीं राजकारणाला आध्यात्माची जोड देण्याची ना. गोखले यांची इच्छा पुरी केली आहे असें त्यांचें म्हणणें आहे. वस्तुतः राजकारणाचा परिपाक समाजाची आध्यात्मिक प्रगति होण्यांत होतो. त्याग असो वा आध्यात्म असो हें कशाचें अधिष्ठान होऊं शकत नाहीं. अर्थकारण व राजकारण यांच्या सम्यग् योजनेनें समाजाची घडी नीट बसवून मगच त्या समाजाची आध्यात्मिक प्रगति साधतां येते. अर्थशास्त्रांत म्हटल्याप्रमाणें 'अर्थ एव प्रधानः धर्मकाममूले इति' हेंच सत्य आणि या दृष्टीनें "कम्युनिझममध्यें भिण्यासारखें काय आहे? या गोखल्यांच्या प्रश्नांत अर्थ आहे असें कसें म्हणावें?" पूर्वीच्या व नव्या काळांत रूप व रीतिमध्यें जे भेद आहेत त्यामुळें जुन्या व नव्या तत्वांत महदंतर आहे. ज्यांना आपली सत्ता टिकवावयाची आहे त्यांना त्यागतत्वाचे गोडवे गोवसें वाटतात आणि ज्यांना सत्तेचें स्वरूप पाण्यांत मिसळलेल्या सुगंधाप्रमाणें समाजाच्या कणाकणांतून म्हणजे व्यक्तीव्यक्तींतून प्रतीत व्हावयास हवें त्यांना कम्युनिझमचें लाल निशाण अधिक प्रिय वाटते! असो.

राजकीय, धार्मिक वा सामाजिक विषयाप्रमाणें वाङ्मयात्मक विषयावरही कांहीं मतें बाबूरावांनीं प्रकट केलीं आहेत. त्यांचें तुकारामावरील व्याख्यान कवितेचें कार्य काय आहे याचें मार्मिक विवेचन करणारें असुन तुकारामाच्या थोरवीचें

विवेचनहि सुंदर झालें आहे. तुकारामाची कविता अन्तःकरणाचा ठाव घेते असें त्यांनीं म्हटलें आहे, तें ध्यानीं ठेवण्यासारखें आहे. कविता काय अगर कोठलेंहि वाङ्मय काय ठाव सोडलेल्या अन्तःकरणांचा ठाव घेऊन त्यांना कार्यप्रवण करील तरच तें अक्षर वाङ्मय होय असें मला वाटतें. दासबोधासंबंधींचें विवेचनहि अत्यंत सरळ व सुंदर असून " अभ्यासें प्रकट " झालेल्या ग्रंथराजाचा अभ्यास त्यांनीं एका विशिष्ट दृष्टीकोनांतून केला आहे हें सिद्ध होतें.

याशिवाय संततिनियमन, शाळा सोडल्यावर, प्रगतीची व्याख्या इत्यादि त्यांचीं व्याख्यानें त्यांच्या मनोवृत्तीची, त्यांच्या खोल विचारीपणाची, त्याचप्रमाणें सक्रिय अनुभूतीची साक्ष देतील. त्यांतूनहि त्यांची समाजाकडे पाहाण्याची व समाजनिष्ठ जीवन असावें या वृत्तीची प्रतीति येते. " To the Nation my best, to the individual only the necessary ", या त्यांच्या दंडकावरून त्यांच्या सर्व लिहिण्याबोलण्याची कल्पना येते.

रा. बाबूराव हे माझेपेक्षां वयानें बरेच मोठे आहेत. त्यामुळें मला ज्या आधुनिक विचारप्रवाहाची झुळूक लागली आहे ती त्यांना लाभली नाहीं. ते बुद्धिवादी आहेत, पण त्यांना नव्या शास्त्रीय बुद्धिवादाचा अल्पांशच लाभला आहे. आमचें जीवन जुन्या विचारांच्या रूढींच्या अगर त्यांच्यात आधारानें संपूर्ण न होतां आम्हाला नवीन तत्वज्ञानाची कासच धरली पाहिजे असें माझें मन मला सांगतें. रा. बाबूरावांच्या दृष्टीकोनाप्रमाणें जुन्यांत नवें सामाऊन घेतां येईल असें मला वाटत नाहीं. पण उलट माझें म्हणणें असें कीं, नवीनच जुन्याच्या होमांतून निर्माण होईल आणि तेंहि जुन्याहून भव्य उत्कट व सुंदर असे.

बाबूरावांना आशा काय ती तरुणांची आहे. ती आशा ते सफल करतील असें मलाहि वाटतें. अर्थात् तरुणांताहि नाद व कृती यांत मेळ नसलेल्या व्यक्ती नाहींत असें नाहीं. समाजवादी असून समाजाविषयीं बेफिकीर अगर प्रामाण्यवादी जसें आहेत तसेंच राष्ट्रीय म्हणविणारे निव्वळ धर्मवादी व अराष्ट्रीय आहेतच. पण आम्हां तरुणांना आतां आंतरराष्ट्रीय विचारांची ओळख होऊं लागली आहे व चीनादिनाचे व्याख्यानांत बाबूरावांनीं सांगितल्याप्रमाणें साम्राज्यशाही व तिचे सांस्कृतिक साथीदार यांच्याशीं आमचा क्रांतिकारक लढा आहे हें आम्हांस कळूं लागलें आहे. हेंच अधिकाधिक कळून ठसेल तरच बाबूरावांची आशा सफल होईल असें मला वाटतें. तेव्हां तरुणांनीं बोल-बाल्याचा अभ्यास करावा व बुद्धिवादी क्रांतिकारक बनावें.

ता. १५-११-१९३८. श्री. व्यं. नखाते.

चिरंजीव



कै. लक्ष्मण गणेश जोशी

या चे

सद्गुणस्मृतीस-

श्री. पु. पां. ऊर्फ बाबूराव गोखले.



माझ्यावर केलेल्या टीकांकडे मी लक्ष दिलें असतें तर मला या जागेचा (अध्यक्षपदाचा) कधींच राजीनामा द्यावा लागला असता. मला जें उत्तम वाटेल तें मी करतों आणि अत्युत्तम वठविण्याचा हव्यास धरतों. माझ्या कार्याचा परिणाम हितकर झाला तर टिकाकारांचीं तोंडें अनायासें बंद होतील. कदाचित् माझें कार्य परिणामीं अहितकारक झालें तरी सदसद्विवेकबुद्धीची ज्योत पाजळत असल्यानें मला टीकाकारांची फिकीर बाळगण्याचें कारणच नाहीं. कारण ईश्वराला साक्षी ठेवून वागलों हें समाधान मला अक्षयीचें आहे. —अब्राहम लिंकन.

# बोल–बाला.

## कै. नानाशंकरशेठ.

आपण ज्या पुण्यपुरुषाचें गुणवर्णन करणार आहोंत या पुण्यपुरुषाचे वेळची परिस्थिति ह्मणजे इ. स. १८०३ चे सुमारास पेशवाई संपुष्टात येऊन इंग्रजांची सत्ता स्थापिली जात होती. लोकांचा सरकारवर अगर सरकारचा लोकांवर विश्वास नाहीं. अशा साशंक परिस्थितींत व संक्रमणावस्थेंत कै. नाना शंकरशेठ यांचा अवतार झाला. त्यांचा जन्म अघटित, तसेंच त्यांचें आयुष्यही रहस्यपूर्ण होऊन गेलें. अल्पवयातच वडील वारले व घरची श्रीमंती. अशा परिस्थितींत ते नादान न बनता त्यांनीं परिश्रमपूर्वक मराठी, संस्कृत व इंग्रजी भाषा अवगत करून त्यावर प्रभुत्व मिळालें व लहानपणीच शरीर संपदा कमावून अनेक कार्यांचा व्याप हाती घेतला. अशा व्यापामुळें कै. गोखले अकालीं वारले असे त्यांचे चरित्रकार रँ. परांजपे ह्मणतात. परंतु कै. नानांचाही व्याप कमी नसून ते आपलें शरिरसामर्थ्यावरच दीर्घकालपर्यंत जगले. भिवंडीचा हिंदु-मुसलमानांचा दंगा, पंढरपुरचे यात्रेकरूंची श्रीपांडुरंगाचें दर्शनाची सोय करणें, यावरून त्यांची धर्मनिष्ठा व शील यांची कल्पना येते. 'जे. पी.' चा अपूर्व मान, जीमधूनच पुढें नॅशनल कांग्रेस निर्माण झाली अशा "बॉंबे ॲसोसिएशन" संस्थेचें जनकत्व, जिवंतपणींच लोकांनीं उभारलेला पुतळा व ते वेळचे महर्षि कै. दादाभाई नौरोजी यांचे कै. नानांबद्दलचे गौरवपूर्ण भाषण व पूज्यभाव, सतीची बंदी, सोनापूर दहन भूमीची कामगिरी, स्त्री शिक्षणाचा उपक्रम व अनेक संस्थाना केलेली अलोट आर्थिक मदत यावरून त्या थोर पुण्यपुरुषाच्या कायिक, वाचिक, मानसिक श्रमाची व कर्तबगारीची कल्पना येते. व अशा पुण्यपुरुषास धन्यवाद द्यावे तितके थोडेच आहेत अल्फीनष्टसाहेबापासून फ्रायरसाहेबापर्यंत सर्व गव्हर्नर नानांस आपले सल्लागार मानीत, तरी नाना होयबा नव्हते.

सोनापूरच्या स्मशानभूमीसंबंधीं त्यांनीं सरकारला कसें खडसावलें आणि १८५७ च्या स्वातंत्र्य युद्धाचे वेळीं नानांच्यावर सरकारी वॉरंट कसें तयार होतें, हें ज्यांना माहीत आहे, त्यांना बुद्धि, मन, शरीर व पैसा यांनीं झीज सोसून नानांनीं नव्या काळाला नवी सृष्टी उत्पन्न करून लोकांचे पुढारी होऊन "नृपातिजनपदानां दुर्लभः कार्यकर्ता" हें पद कसें सार्थ केलें, हें कळून येईल. अशा तऱ्हेनें नव्या काळाला कलाटणी देणाऱ्या कार्याचा 'श्रीगणेशा' करून नानांनीं "भारताच्या स्वातंत्र्यार्थ" आशीर्वादाकरतां भावी पिढयांच्या मस्तकावर हात उभारले आहेत, तेव्हां कृतज्ञतेनें त्यांना वंदन करून आपली रजा घेतों.

# भारताचें गणेशपूजन.

त्रिगुणात्मक परमेश्वराच्या स्वरूपापैकीं, संहारकर्त्या शंकराची आणि पालनकर्त्या विष्णूची पूजा साधारण शहरांतूनच आढळते. पण ब्रह्मदेवाची-उत्पन्नकर्त्याची-पूजा कोठें आढळते ? पुष्कर सरोवराचे काठीं ब्रह्मदेवाचें एक स्थान असून तेथें मोठा उत्सव होत असतो. पण साऱ्या हिंदुस्थानभर उत्पत्तिच्या देवाचा उत्सव होतो तोच गणपतीचा उत्सव होय. वेदामध्यें ब्रह्मणस्पतिः– गणाना पतिः– असा या देवाचा उल्लेख असून गणेशपुराण जर काळजीपूर्वक वाचलें तर हा उत्पत्तिचा देव कसा शेतीचा म्हणजे जगण्याच्या शास्त्राचा देव आहे हें चटकन् आपल्या ध्यानांत येईल. मृगनक्षत्रापासून हस्तनक्षत्राची छाया डोक्यावर घेऊन अगर डोक्यावत असता भाद्रपद महिन्यांत आपण गणपतीची–उत्पत्तिच्या देवाची--पूजा करतों ती इंग्रज सरकार किंवा कोणत्याही पाश्चात्य जमाखर्चाच्या पद्धतींत ज्याला दुरुस्त अंदाजपत्रक म्हणतात त्या तत्वानें कृतज्ञ होऊन करीत असतों. जगणें आणि चांगल्या तऱ्हेनें जगणें हें कोणालाही अत्यंत आवश्यक असल्यामुळें, गरीब हिंदुस्थानला तर तें अगदीं निकडीचें होऊन बसलें आहे. या धारेणानेंच लोकमान्य टिळकांनीं १८९६ सालापासून गणपतीचा सार्वजनिक उत्सव सुरू केला. शंकराच्या संहाररूपाची म्हणजे विघातक कामगिरी झाल्यावर अभिनव सृष्टी उत्पन्न करण्याची आणि तिचें संरक्षण करण्याची विधायक कामगिरी होत असते. इमारत बांधण्यांत जें जें कांहीं ओबडधोबड म्हणून आडवें येईल तें तें काढून टाकून नवीन सृष्टी उभारण्याचें काम आणि तिची जोपासना करण्याचा भार हिंदुस्थानच्या प्रत्येक घटकाच्या माथीं येऊन पडलेला आहे, आणि म्हणूनच उत्पत्तिच्या देवाची सार्वजनिक सेवा करण्याचा उपक्रम महाराष्ट्रांत आणि त्याचे द्वारा साऱ्या हिंदुस्थानांत लोकमान्यांनीं सुरू केला. हिंदूंची आर्यसंस्कृति शांतिब्रह्म या शब्दांनीं प्रतीत होते. या शांतिब्रह्माच्या स्थापनेसाठीं आत्मिक बळाची जरूरी आतां पाश्चिमात्य राष्ट्रांनासुद्धां भासूं लागली आहे. अमेरिकेसारखें सर्व बाजूंनीं संपन्न राष्ट्र एक एक वर्ष कर्जाची तहकुबी जगांतील सर्व राष्ट्रांना देऊं लागलें आहे; आणि बेकारीचा प्रश्नच उत्पन्न होऊं नये, व ज्या त्या राष्ट्रांनीं आपआपल्या घरीं सुखासमाधानानें नांदावें म्हणून प्रेसिडेंट रुझवेल्टची २० वर्षांची योजना, रशियानें ५ वर्षांची योजना तर इटालीनें १९५० पर्यंत९० लक्ष लोकवस्ती वाढविण्याची योजना आखून ठेवलेली आहे. फ्रान्सला जर्मनीपेक्षां युरोपमध्यें महत्वाचें स्थान हवें असल्याकारणानें त्यानें जगाचें सोनें आपल्या खजिन्यांत तुंबवून ठेवलें आहे. हेतु असा कीं, यापुढें जगांत युद्धच करावें लागल्यास युद्धकाळांत अन्नसामुग्रीला व दारुगोळ्याला पंचाईत पडूं नये. पण अशा वृत्तीनें जगांत शांतता प्रस्थापित व्हायची नाहीं; त्याला सर्व जगांतील प्रमुख राष्ट्रांनीं 'शस्त्रसंन्यासच' केला पाहिजे; आणि एकमेकांबद्दल अंतःकरणांत सहानुभूती दाखविली पाहिजे. एवढ्याचसाठीं 'शस्त्रसंन्यास' परिषद भरली होती. तिच्या निर्णयाचें घोंगडें तसेंच भिजत पडून आहे. परंतु ती यशस्वी झाल्यास अमेरिका सगळ्या जगाचें पै न पै कर्ज माफ करील आणि सगळ्या राष्ट्रांनीं सुखानें व सहकार्यानें नांदावें म्हणून सगळ्याच्या जमाखर्चाच्या वह्या कोऱ्या करकरीत व अगदीं ताज्या स्वस्तिक चिन्हानें लिहिल्या जातील. तथापि इतकेंही झालें तरी ज्या शांतिब्रह्माच्या उपासनेची ही धडपड चालू आहे ती आत्मिक बळाशिवाय यशस्वी होणें शक्य नाहीं.

...क्रमणावर अत्याचाराचा उतारा देण्यानें ...पाहिलेले दोन्ही आत्मे अमर असल्याकारणानें ...म घेऊन आपला झगडा चालू ठेवतात; ...हृदयाचा बदल हाच शांतिब्रह्माच्या उपास- ...अचूक उपाय होय. हा आर्यसंस्कृतीचा ... सर्व राष्ट्रांतून फिरल्याशिवाय जगांत ...ची शांतता नांदावयाची नाहीं. म. गांधींनीं ...कार्यासाठीं प्रयत्न चालविला आहे. जगाचा ...यास यशस्वी झाला तर अगोदर ' युरोपियन ...न ' व मग वर्ल्ड् फेडरेशन ' अस्तित्वांत ..., आपल्या संस्कृतीच्या फैलावानें हिंदुस्थानला ... शांतिब्रह्माची प्रस्थापना करावयाची आहे. ...कोटी लोकांचा हिंदुस्थान व $\frac{1}{12}$ भूपृष्ठ व्याप- ... हिंदुस्थान ' वर्ल्ड फेडरेशन ' रूपी गणाचा ...म्हणजे स्वामी, नेता होणार आहे; तें त्याचें ...गलस्थान त्याला प्राप्त करून देण्यासाठीं आमि- ...भारताच्या आधारस्तंभांनीं कसून प्रयत्न केला ...गणपतीची पूजा सार्थ होणार आहे.

## ' निरोप '

१ पुष्कळ लोकांना ओळखून असणें शहाणप- ...आहे. जगाचा चालू गाडा हाकलण्यांत जे मनः- ...र्वक भाग घेतात त्यांचे विचारसंगतींत असणें हेंही ...णपणाचें आहे. या जगांत रेम्याडोक्या रडत- ...रावांना आणि जातीवंत अंतःकरणांत मूर्खपणाचीच मिजास मारीत बसणाऱ्या शिरोमणींना प्रतिष्ठेची जागा नाहीं; निदान नसावी. अशा बांधवांची कींव करावी, शक्य झाले तर जरूर त्यांना हात देऊन वर काढावे, पण स्वतांला स्फूर्तीचा अखंड लाभ व्हावा म्हणून घटकोघटकीं अशा लोकांच्याच तोंडाकडे पाहिलें पाहिजे कीं जे या जगाचें अस्तित्व मानतात, सभोंवतीं चाललेल्या प्रत्येक चीजेचें खरें स्वारस्य व महत्व ओळखतात व परमेश्वरी वरदहस्ताचे सहाय्यानें जगाची प्रगति ज्यांच्यावर अवलंबून असते. गेल्यापेक्षां येत्या संक्रांतीला दृष्टी अधिकाधिक विशाल होत राहिली पाहिजे आणि जगांतील स्वतांच्या कर्तबगारीबरोबर आपुलकीचें क्षेत्रही मोठ्या त्रिज्येनें फाकलें पाहिजे आणि जें जें सरस म्हणून असेल तिकडे डोळेझाक होतां कामा नये; जें जें कांहीं उपयुक्त आणि जें जें कांहीं भविष्याची आढी पिकवणारें असेल त्याच्या त्याच्यावर असें टपलें पाहिजे कीं बगळ्याचें ध्यान फिकें पडावें आणि घारीची चलाखी मंद ठरावी.

२ जनतेच्या या प्रेमवैभवापुढें साम्राज्यशाहीचे सोन्याचे मुगुटही रस्त्यावरील धुळीच्या किंमतीचे वाटतात. हें प्रेम अखण्ड ठेवा. तें असलें म्हणजे संकटकाळीं कांहीं मातबरी नाहीं. सात पैसेसुद्धां सरळ रोजचे खायला मिळत नाहीं म्हणून हिंदुस्थानमधील गरीब रयतेची ही स्वराज्याची चळवळ आहे. ती शिस्तीनें चालविली पाहिजे. शब्दांतसुद्धां शिस्त पाहिजे. मग इतर गोष्टींचें विचारावयास नको. आपण संदेश मागता ! तेल्यातांबोळ्याचे पुढारी होऊन हिंदी असंतोषाचे जनक लो. टिळकांनी जो संदेश सांगितला, कौन्सिलांतून लोकपक्षाचा मुत्सुद्दी म्हणून गाजलेल्या ना. गोखल्यांनीं जो संदेश सांगितला आणि बॅ. म. गांधींनीं दरिद्री नारायणासाठीं लंगोटी लावून जो संदेश दिला तोच संदेश आपण गिरवावयाला नको का ? वाल्याकोळ्याचा वाल्मीक होतांना ' मरा मरा ' तून ' राम राम ' उमटले तरी चालेल; पण बोललाबोल, लिहिला शब्द किंवा टाकले पाऊल माघारीं घेता कामा नये.

## " लोकमान्यांचें राष्ट्रीय तत्वज्ञान् "

' संपूर्ण स्वातंत्र्य हें ध्येय, व त्या ध्येयाच्या सिद्धीसाठीं कायद्याच्या अंतीम सीमेवर उभें राहून सत्ताधाऱ्यांना बेचैन करण्याइतकी चळवळ करावयाची, हा लोकमान्यांचा दंडक होता. त्यासाठीं लोक तयार नाहींत ही रडकी सबब लोकमान्यांनीं कधींच सांगितली नाहीं. ते बहुजन समाजांत शिरले, ' तेल्या-तांबोळ्यांचे पुढारी ' म्हणून मिरवले, भावनाप्रधान तरुणांना बुद्धिवादाचें योग्य वळण लावून आपल्या स्वार्थत्यागानें त्यांना उज्वल उदाहरण त्यांनीं घालून दिलें; कार्यनिष्ठेनें स्वदेशहिताविषयीं पदोपदीं दक्षता बाळगण्याबद्दल शिकवण दिली. स्वतांविषयीं व स्वतांच्या

### तेजस्वी परंपरेविषयीं

पूर्ण अभिमान राखण्यास टिळकांनीं शिकवलें आणि सरकारवर टीका केली, ती सरकारनें लोकसेवा करावी म्हणून केली खरी; पण, त्यापेक्षांही लोकांनीं सरकारचें खरें स्वरूप ओळखावें, असाच लोकशिक्षणाचा हेतु धरला. हा प्रवृत्तीपर कर्मयोग लोकमान्यांनी लोकांच्या हातीं दिला. हा आचरून सत्ताधारी बेचैन होतील तर, आजच्यासारखी ' उजाडलें पण तांबडें तरी कोठें फुटलें आहे ! ' असें म्हणण्याची पाळी कां येती ? तर स्वार्थत्यागी देशभक्तीच्या रंगापेक्षां देशद्रोहाची येथें फार चहा होते. ही नयचंदी तावडतोब बंद झालीच पाहिजे.

## " नर व्हा नर "

विश्वासाई व्हा. काय कराल तें असें करा कीं, हें पुन्हा करण्याची पाळी येऊं नये. आईचे आनन्दचन्द्र, वडिलांचें अभिमान रत्न, शाळेचे श्रेय शृंगार व्हा. चूक झाली तरी गळूं नका. चुका झाल्या तरी घाबरण्यासारखें त्यांत काय आहे ! मोठमोठ्यांनीं चुकांच्या राशी उभारल्या आणि मोठेपणा मिळवल्यावरही त्यांचें तें वळण सुटलें नाहीं. ज्यांच्या हातून चूक होत नाहीं त्यांच्या हातून कांहींच होणार नाहीं. पण, लक्षांत ठेवा

### चुका करण्याचा अधिकार

जरी एवढा असला तरी, चुका करणें हें ध्येय कर्तबगारापुढें कधींच नव्हतें. आपलीं पावलें रेखीव, जिथल्यातिथें पडावीं म्हणून कोणताही कार्यक्षम डोळ्यांतल्या बाहुलीइतका जपत असतो. तुम्ही न्याय्य तेंच करा आणि हें छातीठोकपणानें करा. स्वतंत्रवृत्ती, सत्यप्रीति, ज्ञानपिपासा, न्यायाची तळमळ, अमरत्वाची आकांक्षा यांचें नन्दनवन असें उभारा कीं, भोंवतालच्या चंदेरी दारिद्र्यानें तुमचा मायदेश पोटांत घातला तरी कार्याच्या जोरावर हिंदुस्थानचा संदेश उभ्या जगाला मिळावा. चिरंजीव विचारस्वातंत्र्याच्या हिमालयावरून धांवत येणाऱ्या धर्मनद्यांचें पाणी तें तुमचें पाणी आहे. कर्तबगारीच्या नवीनव पिकांची समृध्दी करणारी भिन्नभिन्न कटिबंधांतील माती ती तुमची माती आहे. कलाकलांची मनोरमता जगाला जे वारे पुरवी ते वारे [illegible] प्राणवायु आहे. तुम्हांला या सर्वांचें नांव [illegible] काळापासून चालत आलेल्या

### इतिहासाला साजेल असा

सद्गुण शौर्यानीं चालवावयाचें आहे. काळाच्या कारखान्यांत आणि प्रवाशांच्या स्मृतिशृंगारांत त्याचप्रमाणें भावी इतिहासकाराच्या चिकित्सापाकांत तुमचें आणि तुमच्या मायभूचें नांव जातीवंतच उतरलें पाहिजे, हें ध्यानांत धरून आयुष्याला वळण लावा.

# शेतीचा देव.

( ले० पु. पां. गोखले, कऱ्हाड. )

गणपतीची कुटाळकी मिशनरी-पाद्री-मुल्ला-मुनशी करतात याचें कारण गणपती हें ओबड-धोबड दिसणारें दैवत किती महत्त्वाचें व स्वारस्य-पूर्ण आहे हें आपण 'पटेल अशा तऱ्हेनें विशद केलें नाहीं' किंवा स्वतांही समजावून घेतलें नाहीं.

गणपतीला ओबडधोबड किंवा रानटी ह्मटल्या-बद्दल जुन्या व वडिलधाऱ्या माणसांना राग येईल व हा त्यांच्या श्रद्धेवर घाला आहे असें वाटेल. पण बुद्धी चालते तितक्या टापूंत नुसत्या श्रद्धेला कोणी मोजत नाहीं त्याला काय इलाज ? शिवाय, जाणी-वेची श्रद्धा कोठेंही विजयी असते आणि तेंच स्वरूप मी आपल्या श्रद्धेला आणूं शकेन अशी आशा आहे. मी गणपतीला रानटी म्हणतों कारण तो रानचा-शेतचा देव आहे. ग्रीकचा जसा डिमीटर, किंवा रोमन लोकांचा सीरस तसाच आपणां हिंदूंचा गणपति. गणपतीच्या मूर्तीकडे, पूजेकडे, जन्मकथेकडे — कोठेंही पाहिलें तरी कळून चुकेल कीं गणपती हा शेतीचा देव आहे. गणपतीला शमी केवड्यासारखी पत्री आवडते; दुर्वाइतका दुसऱ्या कशानेंच गणपतीला आनंद होत नाहीं ! आपण ह्मणाल कीं, हा नुसता कोटीबाजपणा आहे झालें ! रावणापासून शिवलिंग काढून घेण्यासाठीं गणपती गुराखी झाले होते ही गोष्ट मी सांगितली तर ती वरच्याच माळेला बसेल ! आपण कधीं रानात मोट सुरूं होताना पाहिली आहे काय ? त्यावेळीं शेतकरी 'गणा ! गणा !' ह्मणत असतात. त्याचा अर्थ इतकाच कीं शेतीच्या देवाची-गणपतीची नांवें घेऊन ते त्या कामाला हात घालतात. पण याच्याहीपेक्षां आपले उंदीरमामा आपली खात्री पटवतील ! गणपती त्यांच्यावर स्वार होतात ह्मणजे त्यांना आपल्या हातांत ठेवतात. उंदरासारख्या क्षुद्र प्राण्यावर स्वारी भरण्यांत कसला पुरुषार्थ ? असला प्रश्न मनुष्याचे घमेंडखोर मन विचारीत असतें. गणपतीचे भक्त असल्या 'स्वतां हसून स्वतांचेच हसूं करून घेणाऱ्या मनाची तग्रास करीत नसतात. अर्थात् ज्योतीषशास्त्राप्रमाणें मनाचा देव जो चंद्र, त्याचें ते तोंडही बघत नाहींत आणि आपल्या गणपतीपूजेच्या एकाग्रपणांत चंचल-पणा आणीत नाहींत. त्यांना ठाऊक आहे कीं वाम-नानें तीन पावलांत जसें जग व्यापलें, किंवा बरोबर भाषेंत बोलावयाचें तर जसा मिठाचा खडा हंडाभर दूध नासतो अगर विषाच्या एका थेंबानें सळसळतें रक्त जिथल्या तिथें गार होते तसेंच उंदरासारखा एवढासा प्राणी खरा, पण तो आपल्या कुरतडण्या कर्तबगारीनें उभीं शेतें बेचिराख करतो. मग शेतीचा हा शत्रू त्याच्यावर स्वार होऊन ताब्यांत ठेवणारा गणपती शेतीचा देव नव्हे का ? शेतीच्या उसाच्या फडावर कोल्हीं वगैरे डोळा ठेऊन अस-तात त्यांच्या पारिपत्यासाठींच गणपतीच्या हातीं त्रिशूल असतो. पिकाच्या गारव्याला पडून राहणारा व वेळप्रसंगीं शेतकऱ्याचा चावा घेणारा साप गण-पती आपल्या मुठींत धरून असतो. आणि त्याच्या हातांतील मोदक व लाडू ? ते 'उत्तम शेतीचें चिन्ह आहे. कशावरून ? नारळ, गूळ व तांदूळ याच्यापासून मोदक होतो, शेतीशिवाय त्यापैकीं एकही पदार्थ दुसरीकडे पैदा होत नाहीं. लाडवाची तऱ्हा तीच ! मार्डनसाहेब सांगतात कीं हिंदुस्था-नांत पहिला लाडू मुगाच्या पिठाचा आला. मुगाचा लाडू तरी तुपगुळांनींच होतो आणि या सगळ्यांना

शेतीशिवाय जगातआणते कोण ! आपण विचाराल गोडच पदार्थ हातीं घेण्याचा हेतु ? शेतीचा शेवट गोड होत असतो हें दाखविण्याचा. गणपतीला चार हात आहेत किंवा ज्ञानेश्वरीच्या पहिल्या अध्यायांत वर्णन केल्याप्रमाणें अगर चिंतामणराव वैद्यांना उत्तरेकडे आढळल्याप्रमाणें गणपतीला सहा हात असतात, यावरून काय दिसतें ? इतकेंच दिसतें व ठसतें कीं कमींत कमी चार अगर सहा 'हात' —Hands— माणसें असल्याशिवाय शेतीचा जम नीट बसत नाहीं. गणपतीचें गण—पती हें नाव किती सार्थ आहे हें यावरून पटेल. त्याच्या १०८ नावांची सार्थकता अशीच स्पष्ट करतां येईल. परमेश्वर —जगाची उत्पत्तिस्थितिगतिकर्ता—चित्स्वरूप म्हणून समजलेल्या मुसलमानांच्या अल्लाला अरबी भाषेंत 'एकूण शंभर' नांवें आहेत तर हिंदूंच्या फक्त शेतीच्या देवाला त्याच्यापेक्षां नऊ नांवें सार्थ आहेत. धान्य पिकवून आणि पोटापाण्याचा प्रश्न सोडवून देणारा देव सुखकर्ता आणि दुःखहर्ता नव्हे काय ? त्याच्या कंठामध्यें मुक्ताफळाची माळ झळकते. याचा अर्थ उत्तम शेती खाऊनपिऊनच सुखी राखते असे नव्हे, तर सेवूनसवरूनसुद्धां तेज देते. पण हें असें व्हावयास पेवांनीं, कोठारांनीं खंडींनीं धान्यें पिकवावीं लागतात. गणपतीचें गरगरीत लंबोदर हेंच शिकवितें. हें साध्य व्हावयाला बारीक नजर हवी. कोणत्यावेळीं काय पाहिजे हें हेरून त्यावर योग्य उपाय, तरतूद केल्याशिवाय खंडोगणती मोत्याचा दाणा कोठून उत्पन्न करतां येईल ? त्याला डोकें लागतें व तें तरतरीत असावें लागतें. तरतरीत मेंदूचें डोकें विशाल असतें. वाटेल तसलें ओझें सहन करण्याची शक्ती विशाल डोक्यांतच असतें. तें डोकें चालवून बारीक नजरेनें स्थळाकाळाचें धोरण राखून शेतकऱ्याला आपल्या शेताची नांगरणी, पाणी पाजणी आणि वाढवणी करावयाची असते. गणपतीचा एक दात हा नांगराचा द्योतक असून सोंड ही मोटेच्या सोंडेशीं आणि त्याचे ते सुपासारखें कान वाढवणीशीं समरूप आहेत. तात्पर्य बारीक नजरेचा, विशाल डोक्याचा, वाटेल तसलें ओझें सहन करणाऱ्या ताकदीचा, जरूर त्या हत्यारांनीं सज्ज असलेला शेतकरी चारचौघांना हात देतो, इतकेंच नव्हे, तर आपण केलेल्या कोठाराच्या जोरावर बसला राहूनही जगाचें क्षेम चालवतो. गणपतीच्या ध्यानाचा हा अर्थ आहे. धोरणबाज शक्तियुक्तींनीं उद्योग केल्यावर ऋद्धिसिद्धी पाणी कां भरणार नाहींत आणि कोटीसूर्यांचें तेज अंगीं कां येणार नाहीं ! आणि मग विघ्नांची वार्ता तरी कशाला उरेल ! असा संपन्न देव जो गणपती तो स्वावलंबनाची, संग्रहाची, शक्तियुक्तीची विद्या देत असतो आणि जे त्याचें नितांत सुंदर उदाहरण डोळ्यापुढें ठेवून त्याची अनन्यभावानें भक्ती करतात त्यांना आपल्यासारखाच करतो. अर्थात् प्रत्येक शुभ आणि मंगल गोष्ट करतांना गणपतीच्या —समृद्धीच्या देवाची पूजा होत असली तर नवल कसलें ? गणपतीच्या उत्सवाचें राष्ट्रीयत्व या अभ्युदयाच्या दृष्टीनें आहे. लो. टिळकांनीं तेवढ्यासाठींच हा उत्सव महाराष्ट्रांत सार्वजनिकरीतीनें सुरू केला.

शेतीचा देव गणपती याला आणखीही प्रमाण आहे. मंगल कार्यारंभीं सुपारीला गणपती होण्याची सुपारी देण्यांत येते हें तर झालेंच, पण गणपतीची जन्मकथा काय सांगते ? पार्वतीनें—पर्वताच्या

मुलीनें—नदीनें आपल्या अंगच्या मळींपासून केलेला हा उद्योग जगाचें कल्याण करणाऱ्या परमेश्वरानें इतका चैतन्यमय केला कीं, सगळया जगाला त्याच्या पायीं लागावें लागलें. शेती नसती, तर—तर बोलून काय करावयाचें ? हिंदुस्थानांत दिवसेंदिवस पोटापाण्याची पंचाईत पडत चालली आहे, तो अन्नाचा प्रश्न सोडवावयाला गजानन आपणां सर्वांना बुद्धि देवो ! पोटोबा झाल्याशिवाय विठोबा सुचत नाहीं हा मानवी मनाचा धर्म आहे. पावसाळयाच्या अखेरीअखेरीला भाद्रपदाच्या महिन्यात पिकापाण्याचा अंदाज लागल्यावर कृतज्ञबुद्धीनें शेतीच्या देवाची—गणपतीची पूजा आपण करतों ती गोड करून घेऊन गणपतीनीं अन्नान्न दशेला लागलेल्या हिंदुस्थानावर कृपा करावी अशी त्याची अनन्यभावानें प्रार्थना करून आपली सर्वांची रजा घेतों.

---

## तुकारामाची कविता.

वामनाचा श्लोक, मयूरपन्ताची आर्या आणि तुकारामाची प्रसिध्द अभंगवाणी यांना एका माळेचे मणी केल्याचें मराठी भाषेला श्रेय आहे. ‘ कंठीं नादतटी जिला कटिं पटी खोवोनी पोटीपुटी ’ असला पंडिताचा सुश्लोक किंवा केवळ आर्यांनाच रुचणारी पंताची आर्या यमकश्लोकादिकांच्या गर्दीनें बिचाऱ्या ‘ शूद्रकवी ’ च्या – ( हा मी केवळ विष्णुशास्त्री चिपळूणकरांचा आवडता प्रयोग वापरीत आहे. ) प्रसिध्द अभंगवाणीवर ताण करीत असली तरी तुकारामाची सहज मनोहरता त्यांत नाहीं. कृत्रीमपणाचा लवलेश नसलेली, प्रत्येक प्रसंगीं सहज उत्स्फूर्त झालेली, वेदांत्यापासून धादांत्यापर्यंत, भोळया जिवापासून चिकित्सकाच्या मुगुटमणीपर्यंत सगळ्यांच्या नितान्त आदरास पात्र झालेली मराठी भाषेची जर एखादी रत्नमालिका असेल तर ती तुकारामाची कविता. ‘ वेदांतीचा अर्थ आम्हासीच ठावा । इतरांनीं वहावा भार माथां ॥ ’ ही तुकारामाची आत्मविश्वासाची जाहीर घोषणा ‘ कीर्तनारंभीं तुकोबाराय म्हणतात ’ या प्रत्येक हरदासाच्या तोंडीं असलेल्या पालुपदावरूनच नुसती पटेल असे नव्हे; तर विल्सनसारखा इंग्रज, ॲबटसारखा अमेरिकन, न्यायमूर्ती रानड्यासारखे स्थितप्रज्ञ इतिहासज्ञ, चंदावरकरासारखा मोहनिर्मळ, डॉ. भांडारकरासारखा गाढा पंडीत, प्रो. वा. ब. पटवर्धनासारखा अज्ञेयवादी आणि प्रो. रामभाऊ रानडयासारखा वेदांतमार्तंड, तुकारामाच्या अभंगवाणीची पारायणें करितात व करीत यावरूनही पटते. सगळया विश्वाला आर्य करून टाकण्याची वेदांताची आज्ञा विश्वबंधुत्वाच्या फैलाव्यानें अमलांत आणणारा थिऑसफिस्टहि ज्यावेळीं तुकारामाची गाथा पढतांना दिसतो तेव्हां तुकारामाच्या अभ्यासू भक्तांना खात्री पटत जाते कीं, जगभर पसरलेल्या इंग्रजी भाषेंत तुकारामाचे नितांत सुंदर भाषांतर होईल तर विठाई माउलीचा घोष घेत सगळ्या जगाची यात्रा पंढरीची वारी करील ! ‘ काया हे पंढरी । आत्मा हा विठोबा ॥ ही आत्मश्रध्दा उत्पन्न झाल्यावर ‘ सुखें घालावें गर्भवासी ’ म्हणून प्रत्यक्ष परमेश्वराला सवाल देऊन देवाच्या दारांत आपल्या भक्तीचा निर्व्याज हिशेब देत कोण बसणार नाहीं ! त्याला वृत्तीमात्र कशी हवी, ठाऊक आहे ? ‘ नम्र झाला भूता त्यानें कोंडिले अनंता ’ अशी वृत्ती जागृतीची हवी. ‘ मऊ मेणाहुनी आम्ही विष्णुदास । कठिण वज्रास भेदूं

ऐसे ॥ ' ' अणुरेणु या थोकडा । तुका आकाशा एवढा ॥ मिळुनी साठिले कळीवर । भवभ्रमाचा आकार ॥ ' अशी द्वैताद्वैतातीत वृत्ती तुकारामासारखी होण्याला मानसशास्त्राच्या कोणत्या अभ्यासक्रमातून जावयाला पाहिजे हें अजून बिनचूक ठरलें नाहीं. प्रार्थनासमाजाच्या निरूपणातून आणि हरी-कीर्तनातून तुकारामाची कविता फुलली. भोजराज पारितोषिक पटकावलेल्या केळकर-कृत तुकाराम चरित्रांत उतरली, प्रो. पटवर्धनांच्या टिपणावरून प्रो. गणपतराव केळकरांनीं प्रसिद्ध केलेल्या पुस्तकातून उजळून निघाली, तरी तुकारामाची कविता पांगारकरांहातीं जशी बहारीनें मोहोरली, पहाटेच्या रम्य वेळीं न्यायमूर्ती रानड्यांच्या मनाशीं जशी रुणझुणली, किंवा शास्त्रीबोवांनीं साक्ष भरल्याप्रमाणें भाविक प्रेमळांच्या भजनांत जशी रसरंगानें महिरून निघाली व निघते तसा आनंद कोठेंच नाहीं. कारण तुकारामाची कविता ' रसात्मकं काव्यम् ' या संस्कृत कसोटीला जितकी उतरते त्यापेक्षांही “ That which troubles the waters of the heart ” अगर वर्डस्वर्थ कवीची “ Sponteneous overflow of powerful feelings ” या इंग्रजी व्याख्यांचें नमुनेदार उदाहरण म्हणून मिरवतें. एवढ्याचकरितां तुकारामाच्या गाथेचें मंथन करून मानसिक उत्क्रांतीच्या पायरीनें त्याच्या अभंगाची मांडणी करणें ब्राह्मणांनींच तेवढा वेदांचा अर्थ किंवा पॉटिम्सनी ट्वेल्व्हटेबल्सचा अर्थ बसविण्याइतकें अवघड आहे. इतक्या साधेपणाच्या वैभवामुळेंच तुकारामाच्या कवितेला महाराष्ट्रवेदाची योग्यता प्राप्त झाली. हिंदुसमाजाचा बेताल व बेतोल झालेला एकमेळ सावरण्यासाठीं स्त्रीशूद्रादिकांनासुध्दां ब्राह्मणाबरोबरीचे हक्क देऊन महाराष्ट्राच्या दृढीकरणासाठीं भावभक्तीच्या शिस्तींत चंद्रभागेच्या तीरीं ज्ञानेश्वरांनीं जी ध्वजा उभारली तिचा हिरेमोल दिमाख आपल्या उज्ज्वल कवितेनें तुकारामानें जडविला. पावसाआधीं ढग व फळाआधीं फुलें तसें स्वराज्यसिध्दीचे शिवबा-समर्थांचे धकाधकीचे मामले सुरू होण्यापूर्वीचे संत-कवींच्या कामगिरीचे प्रवाह होते; आणि त्यांत तुकारामाच्या कवितेचा लवचीक प्रवाह सर्वसंग्राहक आणि स्थितीस्थापक होता. अंतःकरणाचा ठाव घेण्याचा पोंच जितका दूरवर तितकी त्या नाटकाची प्रबलता असें ब्रँडर मॅथ्यूनें म्हटलें आहे. तें लक्षण तुकारामाच्या कवितेला लावले तर तुकारामाच्या अभंगवाणीचा अभ्यास जीव तोडून करण्याची इच्छा एखाद्या अरसिकालाहि होईल. जशी “ सुमनी सुखवी सुचवी परिपूर्ण स्त्री विकासली सहजा ” तशीच तुकारामाची कविताही करते; अर्थातूच मराठी भाषा जिवंत राहील किंवा अभ्यासली जाईल तेथपर्यंत व तेथें तेथें तुकारामाची कविता अमरपणानें त्याणें वाटत राहीलच राहील.

---

**निरोप**:—परक्या भाषेतील कवितांचें भाषांतर आपल्यापुढें अचूक उभें रहावें, तसा भास एकादा माणूस आपल्यापुढें राहिला असतां होतो, तेव्हां त्याच्याकडे आपलें लक्ष वेधतें. महात्मा हा ईश्वरी आविष्काराला दुसरा शब्द आहे. मग, ऊठ माझ्या बाळा, ऊठ आणि पुरुषासारखा कामाला लाग. पुढें चल, जे भोग वाट्याला यावयाचे असतील ते छातीठोकपणानें भोगायला तयार रहा. तुझ्या हातीं जें काम करण्यासाठीं पडेल तें न डरतां शिकस्तीनें आपली प्रत्येक नस ताणून कर. असें करशील तेव्हांच परमेश्वर तुझ्या पाठीशीं उभा राहील आणि तूं पुरुषोत्तम होशील.

# हिंदूंच्या त्यागतत्त्वाची सुंदर फोड

" मित्रहो, प्रो. सत्राळकर यांनीं ख्रिस्त धर्म हा त्यागावर उभारलेला धर्म आहे ह्मणून सांगितले. पण, कोणता धर्म त्यागाचा महिमा सांगत नाहीं? संन्यासाश्रम हा हिंदुधर्माचा एक आवश्यक आश्रम केवळ त्यागमय आहे. पण, त्याची तयारी जन्मभर करावयाची असते. 'अनृणी मरण' ही मानवी जन्माची एक कसोटी हिंदुधर्मानें सांगितली आहे. " परऋणाः सावीः अथमत्कृतानि, माहं राजन् अन्यकृतेन भोज्यम् " इत्यादि ऋग्वेदांतील ऋचा संन्यासाची ऊर्फ जगत्कल्याणाकरितां

लोकांच्या सेवेसाठीं सर्वस्वाचा त्याग

करावयास शिकविणाऱ्या शाळाच आहेत. प्रो. सत्राळकर आगरकरांना गुरु मानतात. त्या आगरकरांनीं देखील 'स्वलोकांत, स्वधर्मांत आणि स्वाचारांत' राहून सुधारणा करण्यास शिकविलें आहे, फार काय 'मुमुक्षु आत्म्यास धर्माच्या नांवानेंच मरणें असेल तर आह्मी हिंदु ह्मणूनच मरूं' असा आगरकरांनीं निर्वाळा दिला आहे. कारण, हिंदु धर्म त्यागमय आहे; यज्ञावर अधिष्ठित आहे. पण, हिंदुधर्माचा त्याग लाचारीचा नाहीं. निश्चित ध्येयाचा आहे. समाजाच्या धारणेसाठीं, राष्ट्राच्या धारणेसाठीं व्यक्तीचा सर्वस्वनाशहि हिंदुधर्म पत्करतो. पण 'तूं घेतलें नाहींस तरी माझें सर्वस्व मी तुला देणार, तुझ्या गळ्यांत बांधणार" असला

व्यापारी जाहिरातीचा त्याग

हिंदुधर्माला मंजूर नाहीं. असल्या खोट्या त्यागाची ढोलकीं बडविणारी ख्रिस्तीराष्ट्रें जगावर कसली संकटें आणूं पाहताहेत हें डोळस माणसांना सांगावयास नको. हिंदुस्थानांत व दक्षिण अमेरिकेंत ख्रिस्तानुयायांच्या परोपकारी राजकारणाचा अनुभव खास पटला आहे. परोपकाराच्या आणि लोककल्याणाच्या गप्पा मारतां मारतांच सहवासी, सहकारी अगर

जित राष्ट्राची बुद्धि भ्रष्ट

करण्याचा भरभसाट उद्योग ख्रिस्ती ह्मणविणारांनीं जगभर चालविलेला आहे. जगांत शांति नांदावी ह्मणून ज्या ख्रिस्तप्रभूनें स्वतःला वधस्तंभावर लटकावून घेतलें, त्या ख्रिस्ताचे अनुयायी जागतिक युद्धें पेटण्यासारखे राजकीय डाव तरी खेळत बसले आहेत; किंवा हिंदुस्थानसारख्या जित राष्ट्रांत 'असुनि जिवंतहि मेली माणसें' कशी नांदतील याची काळजी घेत आहेत. महाभारतांत सांगितल्याप्रमाणें

शस्त्रैर्हतास्तु रिपवो न हता भवन्ति
प्रज्ञाहतास्तु रिपवः सुहता भवन्ति

याचा अनुभव हिंदुस्थानांत पदोपदीं येत आहे. मेकॉले साहेबांच्या शिक्षणक्रमावरील 'मिनिटा'-पासून थेट आजवर तेंच प्रज्ञा मारण्याचें काम चालू आहे. मेकॉलेनें आपल्या वडिलांना लिहिलेल्या पत्रासारखे वाङ्मय तरुणांनीं इतिहासबुद्धीनें जरूर वाचावें. गेलें शतकभर प्रज्ञाहननाचें काम चालू असल्याकारणानेंच स्वराज्य, लोकांचें, लोकांच्या हितासाठीं चालविलेलें स्वराज्य, हाच एक हिंदी राष्ट्राच्या अभ्युदयाचा मार्ग आहे, असें लो. टिळक ह्मणत. प्रो. सत्राळकरांना राजकीय, सामाजिक, नैतिक, वाङ्मयिक आणि औद्योगिकदृष्टि कां नाहीं कोणास ठाऊक? महाराष्ट्र आणि हिंदुस्थान खालावलेला दिसतो, याचें कारण चालू शिक्षणक्रमांतूनच काय पण प्रत्येक क्रमांतून प्रज्ञाहननाचें

काम चालू आहे. तेव्हां राष्ट्राची बुद्धी तेजस्वी राखून, राष्ट्राला स्वराज्यच तेवढें जगांत डोकें वर करूं व राखूं देईल असा टिळकांचा अढळ सिद्धांत होता. "पाने कां कुजतात, भाकरी कां करपते, घोडा कां बुजतो अशा सर्व प्रश्नांना जसें 'फिरवलें नाहीं ह्मणून' हें एकच उत्तर, तसेंच औद्योगिक, राजकीय, शैक्षणिक, नैतिक वगैरे

## सर्व दुःखांवर स्वराज्य हें एकच निदान

टिळक सांगत." या स्वराज्यासाठीं टिळकांचे धोरण अचुक असें, असें प्रो. सत्राळकर आज कबूल करतात. लोकमान्यांच्यावेळीं सत्राळकर आणि त्यांचे बंधु ह्मणजे त्यांचे मतबंधु टिळकांच्या राजकारणाच्या वाऱ्यासही उभे रहात नव्हते. टिळक सामाजिक सुधारणा करीत नाहींत ह्मणून टिळकांचें राजकारण कुचकामाचें असा यांचा त्यावेळीं टाहो होता. आजकाल कम्युनिस्ट जें बोलतात तेंच हे लोक टिळकांच्या वेळीं जरा निराळ्या भाषेनें बोलत होते आणि टिळकांना विरोध करीत होते. पण,

## आज यांना टिळकांचें प्रेम आलें

आहे. ना जिनांना अनेक गोखले हवेसें वाटूं लागलें आहे. 'मेल्या ह्मशीला दोन पायली दूध' अशी ह्मण आहे. त्यांतलाच हा प्रकार आहे. शत्रूवर मात व मारा करीत रहाणें हा टिळकांच्या राजकारणाचा गाभा होता. महाराष्ट्रीय राजकारणाचा तसाच रोख पाहिजे. सत्राळकरांनाही हें मत मान्य आहे. मराठयांनीं पूर्वी अटकेवर झेंडे लावले. पण आज मी बोलत नाहीं, असे ते ह्मणतात. मराठयांनीं आपले झेंडे 'लंडन'वर लावावे असें कां त्यांचें आज ह्मणणें आहे! असेल तर तसें ह्मणण्याची त्यांची छाती आहे काय! ते खरे ख्रिस्ती असतील तर त्यांनीं आपलें मत स्पष्ट निर्भीडपणानें प्रतिपादून 'वधस्तंभा'वर लटकावून घेणाऱ्या

## ख्रिस्ताला शोभणाऱ्या शिष्याचें वर्तन

केलें पाहिजे. पण ख्रिस्ताच्या त्यागाचा त्यांनीं अर्थच मुळीं ... मी 'बावळट' ह्मणत नाहीं पण 'भलता' केला आहे. ह्मणून महाराष्ट्राचा भगवा झेंडा तेवढा त्यांना मान्य आहे. कारण, त्यांत 'निःश्रेयस' आहे. 'जरीपटका' त्यांना खपत नाहीं. कारण, त्यांच्या मतें त्यात अभ्युदय, स्वार्थ आहे. जरीपटका जर सत्राळकरांना मान्य नाहीं तर लोकमान्याचें राजकारण, स्वराज्याची चळवळ, तेवढी योग्य होती, हें ह्मणण्याचा तरी त्यांना काय अधिकार पोंचतो? अटकेला झेंडे लावणारा महाराष्ट्र गुजराथी गांधीच्या पाठीमागून गेला ह्मणून रडण्याचा तरी काय अधिकार पोंचतो? वस्तुस्थिति अशी आहे कीं, अभ्युदय निःश्रेयस अगर सत्राळकरांच्याच शब्दांनीं बोलावयाचें तर अभ्युदय व अध्यात्मीकरण हीं

## दोनहीं अंगें मानवी जीवनाला आवश्यक

असल्याकारणानें तीं हिंदुधर्मानें लक्षांत घेतलीं आहेत आणि हिंदुधर्माचा बच्चा ह्मणूनच महाराष्ट्राचा सुपुत्र निःयश्रेयसाइतकेच स्वराज्याला व राष्ट्रीय अभ्युदयाला महत्त्व देत असतो. हा अभ्युदय साधावयाचा ह्मणजे पराक्रम करावा लागतो. ह्मणूनच गडकऱ्यांनीं देखील, सत्राळकरांच्या लाडक्या कवीनें देखील, लोकमान्यांला इंग्लंडहून "मागुनि आणा शिवरायाची भवानी तलवार" असा हिंदमातेचा संदेश सांगितला होता. पराक्रम दाखवावयाचा, तेज प्रगट करावयाचें ह्मणजे नुसते पूर्वजांचे पराक्रम गात बसावयाचें नाहीं. तर पूर्वजांच्या पराक्रमाबद्दल अभिमान बाळगतां बाळगतांच

आपल्या पराक्रमानें नवा इतिहास निर्माण कराव-याचा असतो. महाराष्ट्रीय तरुणांमध्यें ही महत्त्वाकांक्षा असल्यामुळेंच लोकमान्यांच्या पाठीमागें महाराष्ट्रांत तितक्याच तोलाचा धुरीण उरला नाहीं, ह्मणून सत्राळकरांच्याप्रमाणें

**डोळ्याला हातरुमाल लावून न बसतां**

महाराष्ट्रीय तरुण सर्वंकष अशा महात्मा गांधींच्या चळवळींत डोळसपणानें पडले. राष्ट्राचें पाऊल थोडेंतरी प्रगतिपथावर पडतें आहे, असें पाहिल्यावर जातिवंत महाराष्ट्रीय तरुण चळवळींत भाग घेतल्याशिवाय राहणार नाहीं. गांधींच्या मागें महाराष्ट्रीय तरुण त्या बुद्धीनेंच गेले. राजकारणाला अध्यात्माची जोड मिळाली पाहिजे ही नामदार गोखल्यांची इच्छा. महात्माजींनीं हिमालयाच्या उत्तुंग शिखरापासून कन्याकुमारीपर्यंत, गरीबांच्या झोंपडींत टिळकांचा 'स्वराज्य' संदेश पोंचवून सत्य व अहिंसेच्या जोरावर शक्य तितकी

**गोखल्यांची राजकारणाला अध्यात्माची**

जोड देण्याची इच्छा पुरी केली आहे. फार काय, हिंदुस्थानांतल्या या लोकशक्तीकडे महात्मागांधींनीं सर्व जगाचें लक्ष वेधून घेतलें. अर्विनसाहेबांशीं पॅक्ट करून, घटकाभराचा कां होईना ब्रिटिश सरकाराबरोबरीचा दर्जा कांग्रेसला प्राप्त करून दिला; आणि नोकरशाही खेडेगांवच्या सुधारणेच्या सेवेला लागल्याशिवाय गत्यंतर नाहीं, अशी खात्री पटवून दिली. महात्माजींची ही कामगिरी ऐतिहासिक दृष्टयाही अभिमानास्पद आहे. पण, आतां जवाहिरलालाकडे आशेनें तरुण पाहूं लागले आहे,त ह्मणून सत्राळकरांना अतिशय दुःख वाटूं लागलें आहे. कारण काय? तर जवाहिरलाल हे धार्मिक दृष्टया 'नास्तिक' आहेत. त्यांच्या राजकीय मतांचा कल कम्युनिझमकडे आहे ह्मणून! अरेरे, महाराष्ट्रा, आतां तुझें कसें होणार? ह्मणून ते एकाद्या जुनाट

**पोरक्या विधवेप्रमाणें रडत आहेत.**

आपला येशूचा धर्म इतकी धडकी आपल्या अंतःकरणांत कशी उत्पन्न करतो, असें मी प्रो. सत्राळकरांना विचारतों. नास्तिकपणा, कम्युनिझम यांच्या लाटा कितीही आल्या तरी हिंदुधर्माचा बच्चा क्षणभरहीं डगमगणार नाहीं. गीतेनें दैवी संपत्तीचें पहिलें लक्षण 'अभय' सांगितलें आहे. ह्मणून सत्राळकरासारख्यांना जेथें भीति वाटते त्या सर्व लाटांना न डगमगतां हिंदुधर्माचा छावा खडाखंब उभा रहात असतो. आणि 'कम्युनिझम' मध्यें भिण्यासारखें काय आहे? देशकाल परिस्थिति प्रमाणें

**रीत व रूप यांत भेद**

असतील; पण, कम्युनिझमच्या प्राणभूत तत्वाबद्दल कां मतभेद असावा? 'तुझें आहे तें मी घेणार, आणि दिलें नाहींस तर डोक्यांत सोटे मारून घेणार' हें सत्राळकरांनीं कोठल्या कम्युनिझमचें तत्व सांगितलें, तें त्यांच्या प्रोफेसरीलाच माहीत! 'तूं आपल्या निढळाच्या घामानें जग' अशी भगवान ख्रिस्ताची आज्ञा आहे. निढळाचा घाम गाळून सुद्धां पोटाला भरपूर मिळत नसेल तर ती समाजव्यवस्था, राज्यव्यवस्था बदलली पाहिजे आणि श्रमाला क्षेत्र व भरपूर मोबदला मिळालाच पाहिजे, हें कम्युनिझमचें प्राणभूत पहिलें तत्व आहे. या तत्वाला धिक्कारण्याची

**अन्न खाणाऱ्या कोणत्याही माणसाची**

छाती नाहीं. अत्रे-कर्वे-फडके यांच्या वाङ्मयानें समाजाची नीति सुटत चालली, हा सत्राळकरांचा

ओरडा तसाच सापवाद आहे. समाजाची नीति व आस्तिक्यबुद्धी सुटूं नये अशी सत्राळकरांच्या प्रमाणें ज्यांची ज्यांची इच्छा असेल त्यांनीं त्यांनीं समाजाच्या, राष्ट्राच्या उत्कर्षमय धारणेसाठींच जगण्याला व मरण्याला सुद्धां शिकविणाऱ्या हिंदुधर्माची कास धरली व त्याचा फैलाव केला तर पुष्कळ काम सुकर होईल. उगीच गुजराथी विरुद्ध महाराष्ट्रीय, हिंदु विरुद्ध मुसलमान, ख्रिस्ती विरुद्ध ख्रिस्तीतर, उत्तरेकडचा विरुद्ध दक्षिणी अशा

**कलागतींचें विष पेरून**

आपली झाकी मिरविण्याचा सत्राळकरांनीं प्रयत्न करूं नये, अशी त्यांना माझी शेवटीं विनंती आहे.

## पाडवा साजरा कां करावा ?

आज वर्षप्रतिदेचा दिवस आहे. हा दिवस स्फूर्तिदायक आहे. हा दिवस आपण सर्व हिंदु लोक पाळतो. हा दिवस दक्षिण हिंदुस्थानांत पाळण्याचा प्रघात आहे. हा दिवस उत्तर हिंदुस्थानांत पाळत नाहींत. तिकडे दिपवाळीचा पाडवा पाळतात. हा दिवस शालिवाहान राजाच्या राज्यारोहणाचा दिवस आहे. शालीवाहन राजानें दक्षिण दिग्विजय केला ह्मणून त्याची आठवण राहावी या करितां आपण हा दिवस पाळतों.

आज आपण गुडी उभारतो. शालिवाहानाची आठवण राहावी ह्मणून आपण गुढी उभी करतो व तिची पूजा करतो. हे केवळ वडिलांची कीर्ति सांगण्यापैकी नाहीं. गुढीची पूजा करतो, त्यावेळीं धर्माचा ध्वज हा अखंड राहील याची जबाबदारी आपल्यावर आहे.

हल्लीं जगांत नवमतवाद सुरू आहे. या शब्दानें बिचकू नका. त्यांत भिण्यासारखें कांहीं नाहीं. विचार करून जें ठरविलें त्याला मत ह्मणतात. कारण-परिणाम-परंपरा युक्तिवादानें सांगता आली ह्मणजे त्याला मतवाद ह्मणतां येईल. जुन्या परंपरेतील सामाजिक प्रगतीला जें बाधक असेल तें काढून टाकण्यासाठीं जी विचारसरणी व आचारसरणी पुढें येते तिला नवमतवाद ह्मणतात. राष्ट्रगुरु समर्थ रामदास स्वामी हे नवमतवादाचे पुरस्कर्ते होते. रामाचे पराक्रमाचा ध्वज हाही नवमतवादाचा प्रकार आहे.

राष्ट्रगुरु जे समर्थ यांनीं ह्मटलें होतें कीं, "प्रतिमापूजनं मूर्खाचें लक्षण" "यज्ञ तो देव जाणावा" हीं वचनें नवमतवादाशीं विसंगत आहेत काय ? प्रतिमापूजनांतील विभूतिपूजा ही नवमतवाद्यांनाही मान्य आहे.

समाजशास्त्रांतही जुन्यांतून आपण नवे काढतों. त्यालाही नवमतवाद ह्मणतां येईल. ह्मणून वर्षप्रतिपदेच्या दिवशीं मत प्रतिपादन करावयाचे आहे कीं, जुन्या व नव्याचा मेळ घालावयास शिका. मनुष्य ह्मटला कीं, तो पराक्रमी पाहिजे, विचारी पाहिजे, अशालाच मनुष्य ह्मणतां येईल. पशूचा परमेश्वर होणे हे जर हिंदु धर्माचे लक्षण आहे, तर मग तें आचरणांत आणावयास पाहिजे.

हल्लींच्या नवमतवादामध्यें नवीन फार थोडे आहे असें माझें स्वतःचें मत आहे. आपण जर समर्थांना राष्ट्रगुरु मानता तर त्यांचें वचन व वाक्यही तुह्मी आपल्यापुढें ठेवा. पूर्वीचा इतिहास हा अभिमानानें आपण पाहिला पाहिजे. 'बापसे सवाई बेटा किंवा गुरुसे सवाई शिष्य' व्हावयास पाहिजे.

गेल्या वर्षीं आपण काय केले व पुढील वर्षीं काय करावयाचे याचा आढावा घेण्याचा हा दिवस आहे.

## निरोप.

ही विष्णुशास्त्रींची पुण्यतिथी असल्या कारणानें 'त्या मराठी भाषेच्या शिवाजीचें उदाहरण' स्वावलंबन, स्वाभिमान आणि स्वातंत्र्यवृत्ती या दृष्टीनें विद्यार्थ्यांनीं गिरवावें; व "आपल्या खाजगी अगर सार्वजनिक वर्तनांतील बारीकसारीक गोष्टींतही मी शाळेला कमीपणा आणणार नाहीं, तर उलट स्वतःचा अभिमानच शाळेला वाटेल अशी काळजी घेईन अशी शपथ प्रत्येक विद्यार्थ्यानें घ्यावी" असा उपदेश करून बाबूरावजींनीं मराठी भाषेचा उत्कर्ष, निढळाच्या घामानें जीवन आणि

**समाजानें नमस्कार करावा इतकें आदर्श चारित्र्य**

सांभाळण्याबद्दल जगाच्या अवघडपणाचा इषारा देऊन विनंति केली व आपलें भाषण संपविलें.

## विद्यार्थीमित्र.

मुलांनीं लिहिलेल्या हस्तलिखित मासिकाकडे आम्ही नागरिक मोठ्या आशेनें पहात असतों. तुमचे देशपांडे वगैरे मास्तर तुम्ही चांगले लेखक व्हावें म्हणून फार मेहनत करतात. पण लक्षांत ठेवा कीं, शिक्षक नेहमीं "व्यवहारी अपूर्णांक" शिकवितात आणि या अपूर्णांकांतून पूर्णांक कसे निघतील हे आम्ही तिऱ्हाईत कौतुकानें पहात असतो. तुमच्या हस्तलिखित मासिकांतील हस्ताक्षर उदाहरणादाखल आहे. या शाळेचे एक माजी विद्यार्थी श्री. वेलणकर यांनीं हस्ताक्षराबाबत नांव कमावलें होतें. नियतकालिकांची शक्ति छापखान्याच्या जोरावर आजकाल फार प्रभाव दाखवीत असते. उद्यांचे कवि, लेखक, चित्रकार वगैरे तुमच्यातून निघणार आहेत. श्री. पाठक मास्तर यांनीं सांगितल्याप्रमाणें तुमच्या हृदयाला जें वाटतें तें लिहा. पण तुमच्या भावनेचा बरोबर प्रतिनिधी शब्द योजून चितारा; ती हल्लीं अभिमानास्पद वाङ्मय फार कमी निपजतें. तेव्हां कांतीव, कापीव, रेखीव असा तुमच्या भावनेचा निखालस प्रतिनिधी तुम्ही योजीत चला. असे कराल तर मला आशा आहे कीं, रवींद्र बाबूंना जसें नोबेलप्राईज मिळालें तसें महाराष्ट्रांत प्रा. शाळेंतील विद्यार्थ्याला ते मिळेल. वाटर्लूची लढाई जिंकण्याची कला विलिंग्डनला क्रिकेटच्या मैदानावर साध्य झाली होती तर नोबेल-प्राईजचे कौशल्य हस्तलिखित मासिकांच्या लिखाणानें कां प्राप्त होऊं नये ?

## नव्या घटनेचा धिःकार

युरोपियनांचा पागलदिन आणि आपली रंगपंचमी अशा या शुभाशुभ मुहूर्तावर आज नवीन सुधारणांचा आरंभ होत आहे; यांत हिंदुस्थानच्या लोकांना 'बनविण्याचा' ब्रिटिश मुत्सद्यांचा बेत होता कीं काय कोणास ठाऊक ! पण हिंदी लोक फसले नाहींत. कारण हिंदी लोकांची प्रातिनिधिक संस्था जी काँग्रेस ही ब्रिटिशांना चांगलीच ओळखते. १८५७ च्या स्वातंत्र्ययुद्धानंतर हिंदुस्थान ताब्यांत घेतांना हिंदी लोकांचे विश्वासू म्हणून इथला

**राज्यकारभार इंग्रजांनीं हातीं घेतला**

आणि हिंदी लोक लोकशाहीला लायक झाल्याबरोबर त्यांचा कारभार त्यांच्या स्वाधीन करण्याची तयारी दाखविली. आज पाऊणशें वर्षें झालीं तरी ही लायकी इंग्रजांच्या दृष्टीनें हिंदुस्थानांत आली नाहीं. अजूनही सॅम्युअल होअरसारखे कंठरवानें सांगत असतात कीं, सनदी नोकरांच्या मार्गदर्शनाचा काल अजून संपलेला नाहीं. मुलगा वयांत आल्यावरही आणि तो जगांत कान आणि डोळे उघडे ठेऊन वावरत असतांही, फुटक्या कानाच्या

बापाला तो नालायक वाटत असला तरी तो दोष त्या बापाचा आहे, मुलाचा नव्हे. स्वयंनिर्णय व संपूर्ण स्वातंत्र्य यांच्या घोषणा व क्रांत्या जगभर चाललेल्या हिंदुस्थान पहात असतां तो गुलामगिरीत खितपावयास कसा तयार होईल ? म्हणून काँग्रेसनें

**अर्जविनंत्यापासून कायदेभंगापर्यंत**

सर्व मार्ग चोखाळले आणि क्लाइव्ह वारन हेस्टिंग्ज यांच्या परंपरेत कांहीं हरिश्चंद्रत्व आहे कां पाहिलें. पण निराशेशिवाय कांहीं हातीं लागलें नाहीं. तेव्हां उघडया डोळयांच्या आणि कानांच्या सज्ञान मुलाप्रमाणें आपल्या घरचा कारभार आपल्या हातीं घेण्याचें हिंदुस्थानच्या लोकांनीं ठरवलें. यालाच

**लोकमान्य होमरूल म्हणत असत.**

कोणत्याही देशाचे होमरूल—स्वराज्य—स्वातंत्र्यसार जर कशांत असेल तर लष्करवरची, तिजोरीवरील हुकमत व परराष्ट्रीय संबंधावरील हुकमत या तीन हुकमतींत आहे. या तीन गोष्टी जेथें नसतील त्या राजकीय सुधारणा एकाद्या मखराप्रमाणें कितीही बेगडीनें मढवलेल्या असल्या तरी देवद्वारांच्या फळकुटापेक्षां त्यांना कवडीचीही किंमत नाहीं. असल्या देवद्वारी फळकुटया सुधारणा इंग्रजांनीं हिंदुस्थानास प्रसंग बेतले तशा दिल्या आहेत. वंगभंगाच्या असंतोषाला उतारा ह्मणून मार्लेमिंटो सुधारणा दिल्या तर महायुद्धाच्या वेळीं हिंदुस्थाननें इंग्लंडला केलेली मदत ह्मणून मॅंटेग्यूचेल्म्सफर्ड सुधारणा दिल्या.

**" इंग्लंडची अडचण तीच हिंदुस्थानचें संधिसाधन "**

या लोकमान्यांच्या वचनाप्रमाणें इंग्लंडला, राजनिष्ठ हिंदुस्थाननें लोकमान्य व महात्मा गांधी यांच्या नेतृत्वाखालीं वित्ताचित्तानें साहाय्य केलें; पण हिंदुस्थानला मिळालें काय, तर

**" उजाडलें पण सूर्य कोठें आहे ? "**

असा लोकमान्यांना प्रश्न पडला आणि जो तो म्हणू लागला कीं " दिल्ली तो बहोत दूर है. " पुढें भरीला रौलेट ॲक्ट व जालियनवालाबाग हीं वाटणीला आलीं. साहेबाच्या राज्यांतील नोकरशाहीचा कारभार ह्मणजे प्रतिष्ठित वचनभंगाचा चित्रपट अशी महात्मा गांधींची खात्री झाल्यामुळें त्यांची व त्यांच्यामुळें काँग्रेसची मनोवृत्ती असहकाराची बनली. सरकारनें दिलेल्या सुधारणा राबवाव्या ह्मणजे नोकरशाहीच्या मनांत असो वा नसो आपल्या मर्जीप्रमाणें तिला वागवावयास लावावें ही लोकमान्यांची वृत्ती होती. हिलाच प्रतियोगी सहकार म्हणतात. सत्ताधारी ज्यावेळीं लोकहिताचें काम करतात त्यावेळीं सहकार करावयाला प्रजेला सांगावे लागत नाहीं. तसा सहकार प्रजा न करील तर ती मूर्ख ठरेल.

**असा मूर्खपणा काँग्रेसनें कधींच केला नाहीं.**

सरकारनें सहकार्याकरतां मनापासून कधीं हात पुढें केलाच नाहीं. सरकारला मी हट्टी अगर दुराग्रही ह्मणत नाहीं. नोकरशाही फार अभिमानी आहे. सद्गुण अतिरेकाला गेला ह्मणजे दुर्गुण ठरतो. आपल्याच मर्जीप्रमाणें लोकांनीं चाललें पाहिजे असा नोकरशाहीचा कटाक्ष असतो. जालियनवाला झाली तरी आपल्याच कलानें लोकांनीं घेतलें पाहिजे असा नोकरशाहीचा कटाक्ष होता. उलट हिंदी लोकांना स्वाभिमान आहे आणि तो स्वाभिमानच स्वयंनिर्णय, खरा होमरूल, खरे स्वातंत्र्य स्थापील असें जगाचा इतिहास सांगत असल्याकारणानें कौन्सिल बहिष्कार किंवा कौन्सिलप्रवेश

**नोकरशाहीला अधिकारसंन्यास**

करावयास लावण्यासाठीं करावयाचा असा हिंदी

जनतेचा दंडक ठरला होता व ज्यावेळीं पंडित नेहरू व विठ्ठलभाई पटेल असेंब्लींत शिरले त्यावेळीं नोकरशाहीला सळो का पळो झालें.

**'सुटलों बुवा मी पटेलपंडितांच्या तडाक्यांतून'**

असे उद्गार हेलसाहेब गव्हर्नर होऊन गेले त्यावेळीं त्यांनीं काढले. अशा तऱ्हेनें हिंदी राष्ट्रानें संप करतां करतां स्वराज्य म्हणजे आपल्याला कमींत कमी काय पाहिजे याची एक नेहरूरिपोर्ट लिहून योजना तयार केली आणि एक वर्षाच्या नोटीशीनें ती सरकारनें अमलांत आणण्याचें मनावर न घेतल्याकारणानें संपूर्ण स्वातंत्र्याचें ध्येय जाहीर केलें. इतक्या सगळ्या करण्याचा सरकारवर खास परिणाम झाला होता. मांट-फोर्ड सुधारणामध्यें दहा वर्षांनीं हिंदी लोकांच्या लायकीची परीक्षा घेण्याचें ठरविलें असतांना सातव्या वर्षीच सायमनसप्तक नेमलें व त्यांत एकाही हिंदी माणसाला विश्वासांत घेऊन काम केलें नाहीं; म्हणून मवाळासुद्धां सर्व हिंदी राजकीय पक्षांनीं त्याचा धिःकार केला. आज ज्या सुधारणाना आरंभ होत आहे त्यांचा प्रारंभ

**" प्रसादचिन्हानि पुरःफलानि "**

या न्यायानें असा झाला आणि आजच्या सुधारणामध्यें कांहीच चांगले नाहीं असेंच सर्वपक्षीय मत आहे. सायमनसप्तकानें सुरवात केलेल्या त्या दीर्घसूत्री सुधारणांच्या टिमक्या तर इतक्या जोरांत वाजू लागल्या कीं, १९३०ची कायदेभंगाची चळवळ करणारी कॉंग्रेस खुळी असून नोकरशाहीच्या कलानें घेणारी राजकीय वेदाभ्यासजड मंडळी शहाणी ठरली. कारण हिंदी मुत्सद्दी निदान वसाहतीचें स्वातंत्र्य मागत असतां लॉर्ड सॅंकीसारख्या

**शद्धचतुर बिरटिश मुत्सद्यानें**

हिंदुस्थानला फेडरेशन देऊ करीत असल्याचें जाहीर केलें. झालें; आमच्या मंडळींना "दक्षिणार्थ भिक्षुकगण पळत सुटावा " यासारखें झालें. पण दुसऱ्या गोलमेजाला म. गांधी गेल्यावर

**" गांठ पडली ठका ठका ! त्याचें वर्म जाणे तुका "**

अशी अवस्था दृष्टोत्पत्तीस आली; आणि ज्या सुधारणा देऊं केल्या होत्या त्या " संरक्षक बंधनानीं " जखडलेल्याच आढळल्या. तिसऱ्या गोलमेजाला म. गांधीसारखी टणक माणसें न सापडतां मऊसूत सज्जन माणसें सांपडल्याबरोबर जी सुधारणाघटना झाली ती पाहून डॉ. सप्रू स्वतःला

**" राजकीय पोरकी "**

म्हणवूं लागले. कारण प्रस्तुतच्या सुधारणांत स्वराज्याचे प्राण जे परराष्ट्रीय राजकारण, स्वसंरक्षण ऊर्फ सैन्य आणि तिजोरी यावरील ताबा तर बिलकूल नाहींच पण,

**प्रांताप्रांताला स्वातंत्र्य देण्याचें सोंग केलें आहे.**

त्यांतही गव्हर्नरला सुलतानच करून ठेवला आहे. ताज्या निवडणुकी व त्यानंतरच्या दिवाणगिरीच्या बाटाघाटीं हें त्याचें प्रत्यंतर आहे. पहा, कीं आतांपर्यंत सरकारची घमेंड अशी कीं लोक सरकारच्या मागें आहेत, कॉंग्रेसच्या मागें नाहींत. कालच्या निवडणुकींत

**कॉंग्रेसच्याच मागें लोक आहेत**

हें निर्विवाद सिद्ध झालें. आतां बादशाही आज्ञेप्रमाणें बहुमतवाल्या कॉंग्रेसपक्षाचीच प्रधानमंडळें व्हावयास पाहिजेत. पण आपण सनदशीर मर्यादेंत काम करीपर्यंत गव्हर्नरनीं आपल्या जादा अधिकारांचा उपयोग न करण्याचें आश्वासन कॉंग्रेसनें मागितलें. हेतु इतकाच कीं, हिंदी लोकांवर शांतता व सुव्यवस्था यांच्या बाबतींत

**विश्वास टाकण्याइतका दिलदारपणा**

नोकरशाहीजवळ आला कीं काय पहावा आणि संरक्षक बंधनें खरोखरच हिंदुस्थानच्याच हिताकरितां आहेत अशी जी शेखी मिरविण्यांत येते तिची सत्यता खडा टाकून पहावी. परंतु इच्छा असून सुद्धां

**काँग्रेसपक्षानें मागितलेलें वचन**

कायद्यानेंच देतां येत नाहीं असा बहाणा करून गव्हर्नरसाहेबानीं

**कायदेशीर कायदेभंग**

करून अल्पसंख्यांकांचीं मंत्रीमंडळें गव्हर्नर आतां बनवीत आहेत. काँग्रेसपक्षाच्या हक्काची पण शब्दजंजाळाच्या आणि हिंदी लोकमताबद्दलच्यां सहानुभूतिशून्यतेनें विटाळलेलीं दिवाणपदें स्वीकारणारे थोर " उष्टया पत्रावळी " चाटणारेच आहेत कीं काय हें तुम्ही ठरवा. मी मात्र इतकेंच ह्मणतों कीं, नोकरशाहीच्या शद्बसूतपणानें आणि न्यायास आवश्यक असलेल्या मर्मसूतपणाच्या अभावानें नोकरशाहीनेंच

**नव्या घटनेच्या नरडीला नख**

दिलें आहे. जन्मदिवशींच मुलाच्या आईचा व आपला प्राण वाचविण्याचा प्रसंग जसा एखाद्या सुईणीवर किंवा नर्सवर यावा तसा हा प्रसंग घडला आहे. चर्चिलचे समाधान करतांना ज्या सुधारणाघटनेबद्दल " अभेद्य तटाची " असें वर्णन करण्यांत आलें होतें तिला काँग्रेसच्या धोरणानें असें भगदाड पडलें कीं, घटनासंरक्षणाच्या नांवाखालीं खुद्द गव्हर्नरानांच घटनाभंग करावा लागला आहे.

---

# विनय

" अधिकार तैसा करूं उपदेश, साहे ओझें त्यांस तेंचि द्यावें " एवढीच आपणां सर्वांस माझी प्रेमाची विनंति आहे 'विनय' या चिजेचा लाभ विद्येपासून आहे; मग ती शाळांत मिळो नाहीं तर अन्यत्र मिळो. सरकार, शिक्षक, पालक आणि विद्यार्थी हे विद्येचे घटक आहेत, आणि प्रत्यक्ष वा पर्यायानें प्रत्येकाला या चार अवस्थानांतून जावयाचें असतेंच असतें. पूर्वीच्या संस्कृत ग्रंथांतून आश्रमांच्या जमिनीवर मुळींच कांहीं कर नसे, असे उल्लेख आढळतात आणि आजकाल प्रत्येक सुधारलेलें सरकार सक्तीच्या मोफत प्राथमिक शिक्षणापासून तों थेट लष्करी शिक्षणापर्यंत काळजी करीत असतें. यावरून विद्येच्या बाबत तें बांधलें गेलें आहे हें कळून येईल. इतकेंच नव्हे तर 'प्रजानां विनयाधानात्' वगैरे वचनावरून सरकारचें 'विद्यादान' हें पहिलें कर्तव्य मानले जातें हें उघड होईल. शिक्षकांची जबाबदारी तर विशेष आहे. तो स्वतः तर विद्वान—तयार असावा लागतोच, पण त्याला शिकवण्याची हातोटी साधावी लागते. थोडक्यांत बोलावयाचें ह्मणजे कै. प्रिं. वासुदेवराव पटवर्धन ह्मणत त्याप्रमाणें शिक्षकानें आपल्या 'विषया' बरहुकूम झगडायला तयार पाहिजे. ( He must be ready for the battles of the class room. )
एवढयानेंहि पण माझ्या मतें भागत नाहीं. त्याला चारित्र्याचीहि जोड हवी. सौ. शीलवतीबाई केतकरांनीं एके ठिकाणीं ह्मटल्याप्रमाणें

**'शाळा' ह्मणजे 'गृहशिक्षणा' ची पुस्ती**

होय. यावरून शिक्षकाप्रमाणेंच पालकाची जबाबदारी आपल्या लक्षांत येईल. 'वडिलांचें नांव काढणारा मुलगा' किंवा 'पितृमान' या शब्दप्-

चारावरून पालकांनीं-घरंतील वडील मंडळींनें आपल्यापासून-प्रत्यक्ष वा अनुक्रमानें शिकणारां साठीं तरी किती कळकळीच्या जबाबदारीनें वागलें पाहिजे हें उघड होईल. पण सर्वांत मोठी जबाबदारी विद्यार्थ्यांचीच आहे. विद्यार्थिनः कुतः सुखम्। हें त्यांनीं नित्य ध्यानीं वागविलें पाहिजे. जी विद्या शिकायची, जे पाठ घ्यायचे ते आपलेसे करून त्यांची वरचेवर उजळणी केल्याशिवाय तादात्म्य येत नाहीं, आणि तादात्म्य आल्याशिवाय मात्र विनय नाहीं. विनय ह्मणजे अक्षरशः बोलावयाचें तर जें अभिजात, बीजरूपाचें आहे त्याचें प्रकटीकरण. ज्याला इंग्रजींत Education असें ह्मणतां येईल, तें साधल्याशिवाय उत्कृष्ट नागरिकत्व हें अंतिम ध्येय साध्य होणें अशक्य. राष्ट्रीयपणा ही नागरिकत्वाची पार्श्वभूमी आहे आणि राष्ट्रीय शिक्षणाशिवाय मला अभिप्रेत असलेला विनयहि साध्य नाहीं. राष्ट्रीय शिक्षणाची व्याख्या जर्मन बादशहानें केली आहे; तींत German या शद्बाऐवजीं 'मराठा' हा शब्द वापरून मी असें ह्मणतों कीं, We want to create young Marathas and not young Romans or Greeks.

### महाराष्ट्राच्या इतिहासाचें सार

बाणेदारपणा आहे. आणि जातीच्या विनयाचें ते एक प्रमुख अंग आहे. 'लीनता' हा जो विनय शद्बाला प्रचलित अर्थ आहे तोहि बाणेदारपणाचाच सोबती आहे. तथापि आजकाल विनय ह्मणजे 'दुबळेपणा' असा जो कित्येकांच्या वर्तनावरून व शिकवणीवरून अर्थ निघतो त्यापासून आपण पूर्ण अलिप्त राहून खरा 'वि-नय' अंगीं बाणवून 'नागरिक' बनण्याचा प्रयत्न आपण सर्वजण एकदिलानें श्रीशारदेला स्मरून करूं या. ह्मणजेच आपण आपल्या देशाचें कांहीं तरी ऋण फेडलें असें होईल."

## संतति-नियमनाचे मार्ग !

जपानचे सुप्रसिद्ध रसायनशास्त्रज्ञ ह्मणजे आजकाल मि. शिगेरु कोमात्सो. घनस्वरूप दगडी कोळशाला द्रवरूप देण्यांत त्यांनीं जिंकली, सगळ्या जगाचे डोळे जपानकडे लागून राहिले आहेत ते या एका शोधामुळें ! मनुष्याच्या विचारांना आणि सिद्धांतांना तत्वज्ञानाच्या घनस्वरूपापेक्षां आचरणाचे प्रवाहरूप येते त्यावेळीं त्याच्याकडेही सगळें जग भेदक कुतुहलानें पहात राहतें. लोभ सहसा कुणालाच सुटला नाहीं; अनेक मुखानीं महासागराला मिळणाऱ्या गंगेच्या उगमाशी असलेल्या झऱ्याइतकें नांवापुरतें महत्व तरी आपल्याला मिळावें अशी सूक्ष्मतम दृष्टी अभ्युदयात्मक कर्तबगारीच्या बुडाशी खास असतेच ! तथापि स्थूलमानानें पाहतां लोभापेक्षां त्याग कल्याणकारक असतो. ह्मणूनच विचारांत आणि आचारांत उत्क्रांतीच्याच सनदशीर मार्गानें जग क्रांती घडवून आणते, त्यावेळीं मि. कोमात्सुपेक्षांही त्याकडे अधिक आदरानें तौलनिक बुद्धीनें पहावेंसें वाटतें.

उदाहरणादाखल "संतती" ची गोष्ट घेऊं.

### मुलाबाळांनीं घर गजबजून जावें

अशी कोणत्या तरुण जोडप्याला पूर्वी हाव नव्हती ? बायबलच्या "जुन्या करारांत" तर उठलासुटला माणूस "खंडीवर पेंडी" पोरांची इच्छा अक्षयी करीत असलेला आढळून येतो. ग्रीक व रोमन लोकांना तर घर ह्मणजे मधाच्या पोवळ्यासारखें माणसांनीं फुलून निघावें असें वाटे.

चीन, जपान या देशांत तरी ही कल्पना अजून अमृतासारखी गोड लागते; अख्ख्या युरोपखंडांत या भावनेचें साम्राज्य सबंध सतरावें शतकभर नांदत होतें. हिंदुस्थानांत अजूनही ' अष्टपुत्रा सौभाग्यवती भव ' या आशिर्वादाला खंड पडला आहे असें नाहीं. पूर्वी तर काय, शंभरपुत्र होऊन त्यांचा विद्याभ्यास करून देणाऱ्या व त्यांना संसार थाटण्याइतकें समर्थ करणाऱ्या पित्याला " प्रजापति " ही बहुमानाची संज्ञा होती. पण आतां या सर्व प्रकारचें अदमुरें तरी कोठें पहावयास सांपडतें ? किंबहुना ' अद-मुरें ' च पहावयास सांपडतें, इतकेंच फार तर ह्मणतां येईल.

पुष्कळवेळां कानापेक्षां डोळा विरघळतो लवकर ! व मनुष्य तर बोलूनचालून स्वताच्याच डोळ्याचा एक भाग. तेव्हां " संतती " कडे नजर देतांच त्याची नजर अलिकडे

## एकत्र कुटुंब-पद्धति—

वरून चळूं लागली ! एकत्र कुटुंब-पद्धति हा शब्द आपल्या इकडे श्रेष्ठायत्त कुटुंब—पद्धतीला लावतात! आणि श्रेष्ठायत्त कुटुंब ह्मणजे एकखांबी भव्य तंबूंतील प्रत्येक घटकाच्या कर्तबगारीचा शिस्तवार खेळ. पण वहिवाटीनें, परावलंबनाच्या तिटकाऱ्यानें व कदाचित् महत्वाकांक्षेच्या अमर्यादपणासाठीं, श्रेष्ठायत्त कुटुंबांतील नेता ह्मणजे बाकीच्या आळशी धनकोचा प्रतिष्ठितपणें शेंदूर फासलेला ऋणको तरी होऊन बसला एक; अगर बाकीच्या कर्तबगारांची कुचंबणा करून आयत्या बिळावरचा नागोबा तरी झाला हें दुसरें !! त्यामुळें "सं-तति" ह्मणजे चांगली ओळ किंवा प्रतिष्ठित परंपरा चालविणारी प्रजा दिवसेंदिवस लोप पावूं लागली. एकत्र कुटुंबांतील वैयक्तिक कुचंबणेचा दोष काढून टाकण्यासाठीं सर्वतंत्र—स्वतंत्र वातावरणाच्या भुलाईनें " बिब्बी मिय्या " चे झाडावरील झोलासारखे संसार थाटण्यांत आले. पण त्यांतहि स्वैरपणा कंठाशीं येऊं लागल्याचा कटु अनुभव सुधारकांना येऊं लागला. आर्थिक उधळपट्टी ज्याची त्यालाच खाऊं लागली आणि "सामुदायिक सहवास 'अगर' जमावाचे जीवन" ही कल्पनाच विभक्त कुटुंबपद्धतीला वावडी असल्याकारणानें सोबतच्या कारणसमुच्चयामुळें

## " प्रजा—प्रतिबंधना " चा आश्रय

करण्याकडे प्रवृत्ति होऊं लागली. अर्थातच मूलतः ' सं-तती ' ची शुध्द कल्पना दोन्ही कुटुंब पद्धतींतून कानामागें टाकण्यांत आली, असें मात्र नव्हें. उत्कृष्ट परंपरेच्या पालनासाठीं एकत्रकुटुंबपध्दतीत संख्याबलावर भर देऊन सर्व अर्थानीं ' प्रजा ' असणाऱ्यावर मदार होती, तर विभक्त कुटुंबपद्धतीत स्वताच्याच पण मोजक्या, सुदृढ, मेंदूनें तरतरीत, छातीनें बेफाट व भावनेनें बहादर अशा प्रजेची हाव धरण्याकडे अनुभवाच्या टप्याटप्यानें प्रवृत्ती होऊं लागली ! राजकीय परिभाषेंत मुद्दाम बोलावयाचे असेल तर, असें सहज ह्मणता येईल कीं, एकत्र कुटुंब—पद्धती (Patriarchal) ही बहुसंख्यातंत्र पार्लमेंटसारखी; तर " मूठभरच असले तरी दणगट लोक फड मारतात " या सीनॉर मुसोलिनीच्या सिद्धांताचे बूड घेऊन केलेली विभक्तकुटुंबपध्दती. मनुष्यस्वभावांत काय गौण, घसर अगर वाटचूक असेल ती असो, अनेक दर्दीनीं प्रयोगावर प्रयोग करूनही एकंदर मनुष्यस्वभावाच्या वैचित्र्यामुळें जशी कोणतीही राज्यपद्धति तशीच कोणतीही कुटुंबपद्धति सर्वकाळीं सर्वांच्या कसोटीला उतरलेली नाहीं. तिंबुनानाच्या

अंगरख्यासारखी सैल असलेली एकत्र-कुटुंबपद्धति आणि जणू अंगावरच 'इस्तरी' केल्याप्रमाणें असलेल्या तंग पोशाखासारखी विभक्तकुटुंबपद्धति आपआपल्यापरी जाचक ठरल्यामुळें, दोहोंतील गुणांची बाळबाटी करून "सहकारी कुटुंबपद्धति" अमलांत आणण्याकडे मानवी मनाचा कल होऊं लागला आहे.

व्यक्तिस्वातंत्र्याच्या प्रतिष्ठित मर्यादा राखून सामुदायिक जीवनाची जबाबदारी व गोडी लावून देणारी अशी

" सहकारी-कुटुंबपद्धति "

ही कामधेनु आहे. या पद्धतीला एकाच गोत्राची, किंवा एकाच पंथाची " घरें " लागतात असें नाहीं किंवा तीं तशीं असलीं ह्मणून नडतही नाहीं. " सहकारी पत-पेढया " च्या नैतिक मर्यादा पाळल्या ह्मणजे साधारणतः समानशील अशा सर्व घरांना सहकारी-कुटुंबपद्धतीचा फायदा मिळणें क्रमप्राप्त आहे.

" अभ्युदयनिःश्रेयसहेतुः स धर्मः "

हा सिद्धांत असल्यामुळें, घराबरोबरच समाजाचा व राष्ट्राचा आपण एक घटक आहों याची जाणीव व्यक्तिमात्रास हवी. ती जाणीव सहकारी कुटुंब-पद्धतीनें घडीघडीला राहण्याचा व त्यामुळें उदात्त कर्तव्यपालनाचा मार्ग निकोप साधेल अशी अपेक्षा आहे. संतति-नियमनाला ह्मणजे चांगल्या प्रथेच्या संगोपनसंवर्धनाला सहकारी कुटुंबपद्धती " गुणाः पूजास्थानं गुणिषु नच लिंगं नच वयः " या न्यायानें अधिक उपयोगी पडेल असें वाटतें. अंग-रखा दाटका झाला ह्मणून टाकण्याची पाळी आली तर स्वतांच्या प्रगत पुष्टीबद्दल मनुष्य मनांतल्या मनांत आनंदच मानतो. समाजदेखील तशाच ठेव-णींतला असल्याकारणानें, सहकारी कुटुंबपद्धतींतून नवीनच एकादी

" संतति-नियामक " पद्धति

उत्क्रांत झाली तर मला तरी निदान आश्चर्य वाट-णार नाहीं. तिकडे आतांच थोडासा कल दिसूं लागला आहे. " पुत्र व्हावा ऐसा गुंडा । ज्याचा तिन्ही लोकीं झेंडा " या सात्विक इच्छेनें असो, " एकश्चंद्रस्तमो हंति न च तारागणोऽपि च " या न्यायानें कलाकलानें विकसत जाणारा एकच बाळ झाला तरी तो अभिमानाचे डोळे निववितो म्हणून असो, किंवा दारिद्र्याच्या अगर महागडया चैनबाजीच्या रामरगाडयांत ज्यास्त जीवांचें भरण-पोषण झेपणार नाहीं या कमकुवतीच्या जाणीवेमुळें असो, जगांतील बुद्धिजीवी लोकांचा कल प्रजा-प्रतिबंधाकडे, नियमित सं-भवाकडे, ब्रह्मचर्यावृत्त विवाहाकडे, किंबहुना मातृभगिनीभावस्थित सह-कारी व्यक्तीजीवनाकडेहि वाढूं लागला आहे, हें किंचितमात्रही खोटें नाहीं. तथापि संतति-निय-मनाचा मूळ स्वभाव मनुष्यांतून नाहींसा झालेला नाहीं. आल्फ्रेड दि ग्रेटपासून ज्या जमिनीच्या तुकडयावर माझे पूर्वज वाढले त्या तुकडयावरच मी आपली गुजराण करीत आहे असें सांगणारे लोक अजूनही इंग्लंडांत भेटतात. **बापजाद्यांच्या वारसदारीचा अभिमान** हिंदुस्थान किंवा पौर्वात्य देश यांनाच बिलगून बसला आहे, असें नाहीं. संतति-नियमनाच्या ह्मणजे उत्कृष्ट परं-परेच्या निकोप प्रवाहासाठीं, निसर्गानें स्वतांला प्रजाच दिली नसेल किंवा ठेवली नसेल त्यावेळीं ती उसनी ऊर्फ दत्तक घेण्यांत येई व येते. असल्या उसनवारीपेक्षां पोषण-विद्यादानादि मार्गांनींही प्रजा उत्पन्न केली जाई. हिंदु धर्मशास्त्राप्रमाणें दहा

प्रकारचे पुत्र असूं शकतात, त्यांतील रहस्य संतति-नियमनांतच ह्मणजे प्रतिष्ठित परंपरेच्या रक्षणांतच आहे. शंकराचार्यांसारख्या धर्मगुरूनीं किंवा अनेक पंथोपपंथांच्या प्रस्थापकांनीं व संचालकांनीं स्वतां संन्यासी अगर ब्रह्मचारी असूनही " गादी " चालविण्यासाठीं शिष्यशाखा उभारावयाची व तींतून एकाला आपल्या जागीं बसवून आपण विराम पावावयाचें यांतील बीज काय ? संतति-नियमन. मग तें रोमचा पोप करो नाहीं तर कान-पूरचा टोपकर करो ! !

तथापि संततिनियमनाचें बीज कायम राहून बुद्धिजीविजगानें व्यवहार मात्र बदलला आहे. एकत्र कुटुंबपद्धतीच्या लोकांबरोबर व्यक्तिमहात्म्यही लोपलें; विभक्तकुटुंबपद्धतीबरोबर समाजाच्या एकसूत्रीपणासाठीं तत्वमहात्म्य पूर्वी पडद्यामागें होतें तें प्रत्यक्ष व्यवहाराच्या रंगभूमीवर उतरलें. त्यायोगें नेमणुकीचा मामला जाऊन निवडणुकीची उतारपेठ सुरूं झाली. कोणत्याही पंथाच्या, पक्षाच्या किंवा परंपरेच्या पुढारीपणाची माळ तत्त्वनिष्ठेच्या लोकप्रचीतीचे हातीं जाऊन बसली. राजाची गादी बिनवारशीं राहिल्यास हत्तीच्या सोंडेंत माळ देऊन ती ज्याच्या गळ्यांत पडेल त्याला राज्यपद देण्याची एकेकाळीं चाल होती ह्मणतात. तिचीच प्रतिष्ठित आवृत्ति ह्मणजे लोकनिवडणुक. " लोक हा ओक धरतां धरवेना " हे तुकारामाचें वचन दुर्लक्ष्यें नाहीं. एडमंड बर्क म्हणतो, " लोक चूकच करीत नाहींत असें मी म्हणत नाहीं. फार काय, कित्येकवेळां आणि तेंसुद्धां हम करेसो कायदा या न्यायानें लोक धडधडीत अन्याय करीत असतात. " आगरकरांनींही सांगितलें आहे कीं, " लोकमताच्या गणितशास्त्रांत दोन आणि दोन चारच होतात असें नाहीं; ते कधीं पांचही होतात व कधीं तीनही होतात. " आणि असें असलें तरी

### लोकमत लाथाडून उपयोग नाहीं.

" पाचांमुखीं परमेश्वर " ही ह्मण कानामागें टाकून चालणार नाहीं. मनुष्यस्वभाव इथून तिथून सारखाच असल्यानें आपल्या तत्त्वाशीं व तत्त्वनिष्ठेशीं जनतेला प्रयत्नांतीं समरूप करतां येणार नाहीं हें ह्मणणें खोटें आहे. आणि ह्मणून स्वत्वस्थ आत्मे आपल्या प्रचंड शक्तीआत्मबलावर विसंबून " सह नौ अवतु । सह नौ भुनक्तु ॥ सहवीर्यं करवावहै । तेजस्विनावधीत मस्तु । ॐ शांतिः शांतिः शांतिः ॥ म्हणत मार्ग आक्रमीत असतात. त्यांत स्वताला नांवासकट नाहींसें होण्याची पाळी आली तरी त्याचे त्यांना कांहीं एक वाटत नाहीं. ते पाहतात एकच आणि ते ह्मणजे संतति नियमन—प्रतिष्ठित परंपरेचा निकोप प्रवाह कीं ज्यानें अंतीं जगाचेंसुद्धां कल्याण व्हावें.

## दिवाळखोर देवनागरी.

' देव नागरी ' ही लिपी लिहिण्यास लेखनकलांत आपल्याला उत्कृष्ट उपयोगीं पडली आहे. पण पेशवाई थाटानें राहण्यास चटावलेल्या सरदाराप्रमाणें आजच्या यांत्रिक युगांत ती दिवाळखोर बनली आहे. वेळ व पैसा आणि त्याबरोबरच जिकीरीचें काम ती किती खाते याचें प्रत्यंतर छापखानेवाले व विशेषतः त्यांतील जुळारी यांना विचारा. मराठीचा ' हस्तलेखक ' अगर 'टंकायंत्र' तर शुद्धस्वरूपांत अजून होणें असाध्य दिसतें. रेमिंग्टनच्या टंकायंत्रांत कांहीं अक्षरें नाहींत व कांहीं तर साधतांच येत नाहींत. इकडे छापखा-

नवाले व विशेषतः त्यांतील जुळारी यांना विचारा. मराठीचा ‘हस्तलेखक’ अगर ‘टंकायंत्र’ तर शुद्धस्वरूपांत अजून होणें असाध्य दिसतें. रेमिंग्टनच्या टंकायत्रांत कांहीं अक्षरें नाहींत व कांही तर सांवतांच येत नाहींत. इकडे छापखान्यांत जुळणाऱ्यांना इंग्रजीच्या तीन ओळी जितक्या वेळांत व श्रमांत जुळतां येतात तितक्या वेळेचा व श्रमाचा बळी मराठीची एक ओळ घेते. बरें, बाळ-बोध ह्मणजे मुलांना सर्वथैव समजण्यासारखी आजची लिपी खरोखरच आहे काय? १९१२ साली मनोरंजनांतून श्री. मधुपांनीं ओरड केल्याप्रमाणें जोडाक्षरें हीं तर बाळबोधपणावर बोळा फांसत असतात. तेव्हां या देवनागरी लिपीच्या शुद्धीकरणासाठीं वे. शा. सं. काशिनाथशास्त्री लेले, रा. द. कृ. देवधर, हिंदु मिशनरी वैद्य, श्रीसिद्धरामदत्त आणि प्रो.माधवराव पटवर्धन यांनीं प्रयत्न केले. पण त्यांत कांहीं कांहीं अपुरेपणा राहिला. व या सर्वांच्या प्रयत्नांचाच परिपाक ह्मणजे माझा या बाबतींतील अल्प प्रयत्न होय. पण तो काय गोष्टी लक्षांत ठेऊन केला आहे तें अगोदर सांगितलें पाहिजे. आजच्या लिपींतील गुण (१) भिन्न उच्चारासाठीं स्वतंत्र वर्ण व एका वर्णाचा एकच उच्चार (२) प्रचलित ध्वनिपैकीं बहुतेक ध्वनि व्यक्त करण्यास वर्ण आहेत. हें गुण कायम ठेऊन सध्यां असलेले दोष शक्य तर घालविले पाहिजेत. मग

### दोष तरी कोणते ?

तें मी पुढीलप्रमाणें मांडीत आहें. (१) ध्वनीच्या कमी अधिक सामर्थ्याप्रमाणें आकृति—सामर्थ्य नाहीं. (२) च, छ, ज, झ हे तालव्य व दन्ततालव्यहि आहेत. (३) जोडाक्षरे लिहिण्याची एक पद्धत नाहीं. (४) जोडाक्षरांत ट, ठ, ड, ढ,द व ह कायम राहातात(५) ‘र’ हा र ॅ ‸ इतक्या प्रकारांनीं गोंधळ घालीत असतो. (६) क्त, त्त, क्ष, ज्ञ, सारखीं जोडाक्षरें ठराविक सांचाचीं आहेत. (७) व्यंजनयुक्त स्वरांचीं चिन्हें आणि स्वतंत्र स्वरांचीं चिन्हें भिन्न आहेत. (८) ञ, ऋ, लृ, हीं अक्षरें बहुतेक फालतू आहेत.

### हे दोष कसे काढावयाचे ?

‘ञ’ चें ‘न्’ नें काम भागतें. जसें ‘चंचल तरी ‘ञ’ अजिबात उडवावयाचा ! ‘लृ’ ची कधींच भेट होत नाहीं ’ तेव्हां त्याची वाट लावावी किंवा कोठें क्वचित् येतच असल्यास तसा त्याला ठेवावा. ‘ऋ’ मात्र संकृताकरितां हवा. ट, ठ, ड, ढ, यांच्या जोडीला ‘द’ आणि ‘ह’ बसवून त्यांची दुसऱ्यावरची मुस्कटदाबी बंद करावी. ह्मणजे ‘उद्वेग’ व ‘ब्राह्मण’ अशा शद्बांतील अवघडपणा नाहींसा होईल. व अर्धे ह्मणून असलेले ‘द’ व ‘ह’ दुसऱ्यांना अर्धे खाऊन टाकणार नाहींत. जोडाक्षराची पद्धत ह्मणजे अर्धे अक्षर अर्धे काढून पुरें अक्षर पुरें काढावयाचें हीच होय. ‘बाळबोध’ लिपीसाठीं झटणाऱ्या शिक्षकांनीं,छापखान्यांत जुळणाऱ्या लोकांनीं, आणि जगाच्या झगडयांत ‘देवनागरी’ टिकावी अशी इच्छा धरणारांनीं याचा अवश्य विचार करावा.

---

## खेडेगांवची सेवा.

हिंदुस्थानांतील शेंकडा ८९ जनता खेडयांत. तिची सेवा जो करील तो खरा हिंदुस्तानचा सेवक. ही कल्पना पूर्वीच लोकमान्य होती. आतां ती राजमान्य झाली आहे. पण राजमान्य कल्पना अजून खोलांत शिरलेली दिसत नाहीं. ग्रामसुधारणा

करावयाची ह्मणजे खेडोपाडीं अन्नस्वावलंबन, वस्त्रस्वावलंबन व सुखस्वावलंबन उत्पन्न करावयाचें. ह्मणजे खेडयांतील लोकांची मूळापासूनच मनोवृत्ती बदलावयाची राघोबादादा आणि नारायणराव पेशवे यांच्यामधील भाऊबंदकीची वृत्ति आपल्याला सगळीकडे दिसते. ह्मणून प्रत्येक खेडेंगांव आपल्याला दुभागलेले दिसते. त्याऐवजीं थोरले माधवराव आणि राघोबादादा किंवा शिवाजी, व्यंकोजी यांच्यामधील भाऊबंदकीची वृत्ति आपल्याला उत्पन्न करावयास पाहिजे तरच सहकार होऊं शकेल.

पण यापेक्षांही प्रत्येकजण स्वाभिमानानें जगला पाहिजे. १८ वर्षांवरील आणि ६० वर्षांच्या आंतील प्रत्येक स्त्रीपुरुषाला काम करण्याची ताकद असेल त्या मानानें काम केल्याशिवाय जेवावयाची लाज वाटली पाहिजे. अशानें राष्ट्राची उत्पादक शक्ति वाढते. उत्पादक उद्योग ह्मणजे पैसा देणारा उद्योग जमला नाहीं, तरी उपयुक्त असा अनुत्पादक उद्योग तरी केलाच पाहिजे. पैसा खर्च करावा लागला नाहीं, ह्मणजे केलेल्या कामांत तो पैसा आपण मिळविल्यासारखेंच होते. एवढयाचसाठीं शेतकीसारख्या मुख्य धंद्याला चरख्यासारख्या घरगुती व्यवसायाची जोड देण्याची क्लृप्ति आहे. चरख्यामुळें प्रत्येकजण वस्त्रस्वावलंबी होईल असा महात्मा गांधींचा कयास आहे. पण तो धंदा सगळ्यांनाच साधेल किंवा आवडेल असें गृहीत धरणें धाडसाचें आहे. तेव्हां खेडयाखेडयाच्या बेकारांची, अर्ध बेकारांची आणि असमर्थांची खानेसुमारी करून आणि गांवाच्या परिस्थितिप्रमाणें कोष्ट्याचा, साळ्याचा, दोर वळण्याचा, मोटा करण्याचा, खतें बनविण्याचा किंवा दुसरा धंदा ज्याला जो झेपेल तो घेऊन गांव शक्य तितका स्वावलंबी केला पाहिजे. सुखी श्रीमंतांना सुद्धां गांवसेवेचा एक मार्ग आहे. तो ह्मणजे खेडेगांवांतून जे जिन्नस तयार होतात तेच विकत घ्यावयाचें. पण एवढयानेंच खरी ग्रामसुधारणा कशी होणार ? मनुष्य सुखलोलुप आहे. त्याला आरोग्याचें सुख जरूरीनें लागते. मी वैयक्तिक आरोग्याबद्दल बोलत नाहीं. ज्याची तो ती काळजी घेऊन चालतोच. सार्वजनिक आरोग्याची जबाबदारी खेडेगांवांतून प्रत्येकावर आहे. तेव्हां स्वतःच्या पोटांतील सकाळच्या प्रहरीं झाडून टाकावयाच्या मलापासून घरागोटयांतील केरकचऱ्यापर्यंत सारी घाण नियमानें काढून तिचे खत करण्याकडे लक्ष ठेवलें पाहिजे. मग प्रत्येकानें आपापल्या घरापुढील रस्ता दुरुस्त व सडा घातलेला ठेवावयास पाहिजे हें कांहीं सांगावयास नकोच. तनदुरुस्तीसाठीं नर्स, डॉक्टर, वैद्य यांची जरूर आहेच. पण आजीबाईंचा बटवा व त्यापेक्षांही एकंदर कुवत ( व्हायटॅलिटी ) वाढली पाहिजे. तथापि या बाह्य आरोग्यापेक्षांही मानसिक आरोग्याची खेड्यापाड्यांतून फार जरूरी आहे. आजच्या जगांत मागें राहील तो पापी. ह्मणून प्रत्येकाला सर्वसाधारण अशी तारीखतागायत माहिती हवी. आज मॅट्रिकची इयत्ता आहे ना ? बस् तितक्या माहितीचा प्रत्येक खेडेकरी कमींत कमी झाला पाहिजे. एवढयासाठीं ज्यांनीं त्यांनीं " सदा येतां, जातां, बसत उठतां, काम करतां " तात्पर्य, संधि सांपडेल तेथें तेथें आपल्याला जें जें कांहीं ठाऊक असेल, तें तें सांगत सुटलें पाहिजे. याच्याही अगोदरची गरज ह्मणजे साक्षरता. ना. गोखल्यांची ही अपुरी राहिलेली इच्छा आहे. प्रत्येक जाणत्यानें वर्षांतून एक तरी माणूस साक्षर केलेंच पाहिजे. त्याचप्रमाणें शेतकऱ्याला आपलें गुंतवलेलें भांडवल, झालेले

श्रम, गेलेली दलाली आणि आपल्या मालाचा मिळालेला मोबदला याचा खरा हिशेब ठेवावयास त्यास शिकाविलें पाहिजे. शेतकरी आणि खेडकरी असा हिशोबी बनेल तर तो स्वावलंबी बनेल व राष्ट्राचा एक जोरकस घटक होईल.

# सेनापती बापू गोखले.

खूप शर्तीनें राज्य राखणाऱ्या नाना फडणवीसाबरोबर मराठेशाहीची मुत्सद्देगिरी लोपली, तशीच सरदार नरहर गणेश गोखल्यांच्या बरोबर महाराष्ट्राची तरवारबहाद्दरी लोपली ! ! भावनाप्रधान हृदयाच्या या ऐतिहासिक समजुती एकांगीं आहेत, सत्तावनच्या शिस्तसूट स्वातंत्र्ययुद्धांत महाराष्ट्राची चमकलेली समशेर आणि युक्तिबाजी डोळ्याआड केली किंवा झाली; क्लाइव्ह, हेस्टिंग्ज यांच्या वारसदारांनीं रचलेल्या हिकमतीनें आपल्या यशाच्या पायीं येथील सुखलोलुप प्रस्थें आक्रांत केलेली पाहिली; नव्या इंग्रजी राजवटीच्या गरजत्या प्रवाहानें बाजूस सारून कुठल्यामुळें वेरून टाकलेली स्वातंत्र्यभक्तीचीं पाळेंमुळें बिलकूल लक्षांतच आणलीं नाहींत म्हणजे स्वराज्यसेवेंत शेवटीं तळपलेल्या तळेखाजणाऱ्या तरवारीनंतर महाराष्ट्र तसल्या दिमाखाला पारखा झाला म्हणून भाववश हृदयाला हळहळ वाटणें स्वाभाविक आहे. तथापि नुकतेंच सूचित केल्याप्रमाणें फल्गुनदीसारखाच हिंदी मुत्सद्देगिरीचा व रणबहाद्दरीचा प्रवाह अखंड वहात असल्याकारणानें प्रयत्नांति महाराष्ट्रास पुन्हां राष्ट्रीय-राजकीय प्रयोग करतां येईल अशी खात्री आहे; आणि म्हणूनच झालें तरी बापूसाहेब गोखल्यांच्या " जवानमर्दी"चें पुण्यस्मरण करावयाचें !

सदाशिवरावभाऊ पानपतच्या घनघोर संग्रामांत बेपत्ता झाले, तसेंच गोपाळअष्टमीच्या तुंबळांत बापूसाहेब गोखले स्वराज्याच्या कामास आले. भाऊसाहेब पेशव्यांच्या पत्नी पार्वतीबाई पतीचा मागमूस नाहीं म्हणून सौभाग्याच्या वेड्या आशेनें अहेवपणें राहिल्या यांत नवल तरी नाहीं; पण बापूंच्या पत्नी यमुनाबाई यांनीं गोपाळअष्टमीला बापूंचा घोडा रक्तबंबाळ पाहिला असूनही पतीच्या रणाहुतीची खात्री धरली नाहीं व १८४२ मध्यें ब्रह्मावर्ती कैलासवास येईपर्यंत त्यांनीं सौभाग्य लेण्याची प्रतिष्ठा सोडली नाहीं. बापूंच्या पत्नीची निगा व्यवस्थित राहावी आणि बापूंचें नांव पुढें चालण्यासाठीं यमुनाबाईनीं दत्तक घ्यावा व त्याबद्दल त्यांचा सरंजाम पुढें चालू रहावा अशी इच्छा स्वराज्याचें उदक माल्कमसाहेबांच्या हातावर सोडतांना खुद्द रावबाजींनीं व्यक्त केली होती व कुंपणीसरकारचें प्रतिनिधी ' एल्फिनस्टन ' साहेबांनींही माल्कमप्रमाणें त्या इच्छेस दुजोरा दिला होता. नाना फडणवीस अगर खुद्द कारभारी पेशवे यांनीं सदाशिवराव भाऊंच्या संशयी विश्वेला सूख लागावें म्हणून " प्राणांचे कोट " उभारले, यांत आपुलकीचा, स्वाभिमानाचा व जनलज्जेचा काहीं भाग असल्याचें तरी म्हणतां येईल. पण बापूसाहेब गोखल्यांच्या बाबतींत त्यांची कसास उतरलेली स्वामिनिष्ठा आणि शत्रूसही आदरणीय वाटलेले चारित्र्य व शूरत्व याशिवाय कशास अधिक गुण देतां येतील ? रावबाजींचा आणि कुंपणीसरकारचा शेवटचा संग्राम होण्याचा वक्त गुदरला असतां, बापूसाहेब गोखल्यांनीं रावबाजींना रामराम ठोकावा म्हणून फोडाफोडीचा कुटिल डाव टाकण्यास इंग्रजी नीति चुकली नव्हती. लिंगो भगवान् नांवाचें वकील

सरदार गोखल्यांच्याकडे आले आणि बोलणें करूं लागलें कीं, " तुह्मी पेशव्यांच्या नोकरीस लागला, त्यावेळीं आह्मी आपल्यासंबंधीं खातरजमा दिली होती. ही गोष्ट न विसरतां, आमची दोस्ती ओळखून हल्लींच्या प्रसंगीं वागावें. " फितुरीच्या या इंग्रजी निरोपाला बापूंनीं काय उत्तर दिलें ठाऊक आहे ? बापू गोखले ह्मणाले, " तुह्मी खातरजमा दिली ही गोष्ट खरी; पण आज मी आपल्या ह्मणण्याप्रमाणें वागल्यास आपणांसच बट्टा; व शिवाय मला हरामपणा येईल. नोकरानें केव्हांही इमानानें वागलें पाहिजे. आपण मला दौलत द्याल; पण स्वामिद्रोहानें लोकापवाद तर येईलच, शिवाय नीतिदृष्ट्या अधःपात होऊन परमेश्वराजवळ मी गुन्हेगार ठरेन. स्वामिकार्यांत प्राण गेल्यासही हरकत नाहीं, पण माझ्या हातून आपण ह्मणतां तसें होणें शक्य नाहीं. " राजतरंगिणींत ह्मटल्याप्रमाणें " श्लाघ्यः स एव गुणवान् रागद्वेषबहिष्कृतः । भूतार्थकथने यस्य स्थेयस्येव सरस्वती " असा बरकंदाज ब्राह्मणभाई बापू गोखले आहे हें कुंपणीसरकारच्या धुरंधरांना ठाऊक होतें. टिपूसुलतानाचा बीमोड करण्यासाठीं मराठ्यांनीं व इंग्रजांनीं ज्यावेळीं दोस्तीनें खांद्याला खांदा भिडविला होता, त्यावेळींच आर्थर वेलस्लीस — आणि बापू गोखले यांस ' वसली ' साहेब म्हणत — बापूंची योग्यता कळली होती. आणि असें असूनही " अतीत्यही गुणान् सर्वान् स्वभावो मूर्ध्नि वर्तते " या न्यायानें इंग्रजी कारस्थान शेवटीं आपल्या वळणावर गेले, त्याचा उल्लेख मागें आलाच आहे. इंग्रज–मराठ्यांचे गोपाळअष्टमीला शेवटचें तोंड लागावयाचें — अशा लगीनघाईला खुद्द मालक रावबाजी बापूंना कमी नव्हते टाकून बोलले !

" उत्खातान् प्रतिरोपयन् कुसुमिताश्चिन्वन् शिशून् वर्धयन्
प्रोत्तुंगान् नमयन् नतान् समुदयन् विश्लेषयन् संहतान् ।
तीव्रान् कंटकिनो बहिर्नियमयन् म्लानान् मुहुःसेचयन्
मालकार इव प्रयोगनिपुणो राजा " रावबाजी

नसल्याकारणानें व हुशार, शूर आणि बापू गोखल्यासारख्या रणनोवऱ्याबरोबर रणांगणीं राहाण्यांत कसूर करणारा नसला तरी व्रात्य व सुखलोलुप असल्याकारणानें, निपाणीकर सरलष्करांच्या बोलण्याला भाळून पेशवाईचा हा मेरुमणी बापू गोखल्यांचा सल्ला झिडकारून खुशाल जेवण झोडपीत बसला. इंग्रजांचा छापा नेमका कसा त्यावेळीं आला ! तेव्हां बापूंनी इषारा केला असतां तो न खपून श्रीमंत खेकासले कीं " आपण शूर, सावध व कुशल हे जाणून तुमच्यावर आम्ही विश्वास ठेवून बेफिकीर असावें तों आपण नेहमीं निष्काळजीनें वागून आयतेवेळीं गडबड करावी. " पुऱ्यांत मसाला कमी घातल्याबद्दल आपल्या पुतण्याला शमसुद्दीनानें सुळीं दिलें अशी अरबी भाषेंत एक गोष्ट आहे, तिची या प्रसंगीं आठवण होते. रावबाजींच्या शद्बाला नोकरजातीनें एकच जाबाब दिला कीं– " दुसऱ्यांचें ऐकून कालचा बेत बिघडविला, व आमच्यावर आतां रोष झाला. सेवकावर स्वामींची गैरमर्जी झाली असतां त्यानें लढाईंत स्वामिकार्यीं मरावें किंवा जय संपादून त्यास भेटावें हेंच योग्य. तेव्हां, आपण भोजन सावकाश करून निघावें; आपलें चरणदर्शन पुनरपि होईल तर ठीकच; नाहींतर हेंच शेवटचें. " ( पाच्छापूरकर ) या जबाबानिशीं बापूंनीं घोड्याला टांच दिली आणि प्रति-

पक्षी इंग्रजांस—

" प्रहर नमतु चापं प्राक्प्रहारप्रियोऽहं ।
मयि तु कृतनिघाते किं विदध्याःपरेण ॥ "

असें महा-वीर-चरित सांगितलें व आपला शब्द खरा केला. लोकहितवादींनीं संग्रहित केलेल्या ऐतिहासिक गोष्टींत ( क्रमांक ८ ) हरिभाऊ देशमुखांची अशी साक्ष भरली आहे कीं " लढाईची बातमी ऐकतांच आनंदानें नाचत जाणारे दोन शिपाई पाहिले. एक बापू गोखला व दुसरा परशुरामभाऊ पटवर्धन. या दोघांनीं लढाईची बातमी ऐकतांच त्यांचे बाहू स्फुरण पावत असत ! आंगरख्याचे बंद तुटत असत ! जमीनींतून गोळ्या उसळत असल्या आणि तसेंच चहूंकडून गोळ्यांचा वर्षाव सारखा होत असला तरी हे दोघे पुरुष तेथें जाऊन छाती करून उभे रहात. घोडा गोळी लागून जरी पडला तरी तेथेंच दुसरा घोडा आणवून त्यावर स्वार होत, पण दोन पावलेंही मागें घेत नसत ! ! " गोपाळअष्टीलाही अशीच मातबर लढाई बापूंनीं दिली. विश्वासरावांसारखा उद्यांचा पेशवा रणांगणीं पडल्यामुळें निकराचा हल्ला चढविण्याच्या उद्देशानें सदाशिवराव भाऊनीं उदगीरच्या इर्षीमीनें घोडा घातला. लढाईच्या धुमश्चक्रींत जुन्नरप्रांती एकुलता एक मुलगा गोविंदराव ऊर्फ बाबासाहेब ज्वराला बळी पडला, सून सती गेली तरी स्वराज्यसेवेच्या इर्षीमीनें बापूंनीं जीवाच्या करारावर आपली रणमस्त ' तोफ डागली. ' स्वतां धुतल्या तांदळासारखा नीतिशुद्ध असा हा नर-हरि आपलीं ह्मणविणारीं माणसेंही नीतिशुद्ध राखण्याची अत्यंत खबरदारी घेई. या कामीं बापूंची जरब अशी विलक्षण होती कीं ठाकूरदास बोवांचे शिष्य बापू गोखले पायांत चाळ बांधून भजन करीत तेव्हां त्यांच्यामागें पखवाज वाजविणारा त्रिंबा कोंडितकर गुरव कोणाही कसबिणीच्या मागें वाजवावयास चुकूनसुद्धां जात नसे. असा चारित्र्याची कदर ठेवणारा रणशूर गोपाळअष्टीच्या संग्रामाचा नायक होता. मराठ्यांच्या नजरेनें १७६१ चें पानपत, १८१७ ची गोपाळअष्टी दोनही नामुष्कीची झाली असें कोणी ह्मणेल; पण युद्धनीतीविशारदांस, पहिलें पुनरुज्जीवनाची पाऊलवाट ठेवणाइतकें कल्याणकारक तर दुसरी पारदर्शक पण प्रथमदर्शनीं दृष्टी अंध करणारी व मोहणारी नी भोंवणारी अशी कथा झाली असें वाटेल. चुलत्याला यमसदनाला पाठविणाऱ्या धोंडजी वाघाचें डोकें छेंचणारा आणि आपल्या रणकंकणाची राख त्याचवेळीं डाव्या डोळ्यावरील जखमेनें बांधणारा बापू गोखल्यासारखा सिंहाचा बच्चा, छत्रपती शिवाजीमहाराजांच्या स्वराज्याचा शेवटचा आधारस्तंभ होता. सतराव्या शतकाच्या पन्नाशींत छत्रपतींच्या लढायांनीं हिंदवी स्वराज्याचें बीजारोपण झालें, अठराव्या शतकाच्या आरंभकालीं समाप्त झालेल्या " तीस वर्षांच्या मराठ्यांच्या स्वातंत्र्ययुद्धानें " स्वराज्याचा वृक्ष महत्वाकांक्षेच्या अमर्यादपणानें मोहोरला; अटकेपार गेलेल्या पराक्रमविस्ताराची छाटाछाट अठराव्या शतकाच्या ' एकसष्टीनें ' पानिपतीं केली; आणि एकोणिसाव्या शतकाच्या ऐनविशींतच तो स्वराज्यवृक्ष बापू गोखल्यांसारख्यांच्या हाडारक्तांचा उपयोग न होतां उन्मूळून पडला ! महाराष्ट्राच्या कर्तबगार पुत्रांनीं आणि निराशलेल्या अंतःकरणांनीं, वरील प्रत्येक प्रसंगीं सुंदोपसुंदी नव्हती असें नाहीं; प्राटेस्टंटचा क्याथालिक, क्याथालिकचा प्राटेस्टंट झालेल्या रेनॉल्डबंधूसही लाजविणारी आपआपसां-

तील भाऊबंदकीची पाटीबदलही कमी नव्हती; पण "हंसें मुक्ता नेली — मग केला कलकलाट काकांनीं" या पदवीला पात्र होऊन आपली, आपल्या देशाची आणि मानवी संस्कृतीची मान-हानी होऊन द्यावयाची नाहीं अशी सत्यनिष्ठ व स्वदेशसेवक कांहीं अंतःकरणें होतीं. लढाईची ताकद तुझ्या अंगांत असतांना, महाराष्ट्रा ! बापू गोखल्यांच्या मृत्यूबरोबर तुझ्या स्वातंत्र्याचा अंत झाला, तो माघ शु॥ पौर्णिमेला झाला ! आजच्या निःशस्त्र स्थितींतून कोणत्या संवत्सरीं, कोणत्या तिथीला आणि कोणत्या उत्क्रांतीनें तुझ्या भावी स्वराज्याचा उदय होऊन तें यावच्चंद्रदिवाकरौ टिकावयाचें आहे, तें काळाच्या कपाळीं तुझे जातिवंत पुत्र जे कर्तबगारीचे शिक्कामोर्तब करतील, त्यावर सर्वथैव अवलंबून आहे.

## नामदार गोखले

ना. गोपाळराव गोखल्यांची आठवण झाली कीं, अभ्यासू अंतःकरणांतून उद्गार सहज निघतात कीं, "परदुःखेन दुःखिता विरलाः।" प्रयत्नशील विद्यार्थीदशेचा परिपाक स्वार्थाचा सह्याद्री उभा-रण्यांत सहज होण्याचा संभव असतांना व हात जोडून स्वागत करीत असलेल्या सुखसंपत्तीला रामराम ठोकून, सुधारलेल्या राष्ट्रांनीं कःपदार्थ लेखलेल्या आपल्या मायदेशाची वकिली यशस्वी व मुद्देसूदपणानें करण्याचें गोखल्यांनीं पत्करलें; इंजिनियर होण्यापेक्षां गोखल्यांनीं राष्ट्रीय कल्याण साधण्यासाठीं विधायक आराखडा काढून चिरंतन असें कार्य केलें; नोकरीची लालसा सोडून गोखल्यांनीं "नम्र भारतसेवक" होण्यांतच भूषण मानलें आणि आपल्या भारतसेवक संस्थेच्या स्थापनेनें दुसऱ्यांनाही तसेंच वाटावयास लावलें त्याबद्दल राष्ट्रभूमीला कृतज्ञता वाटते. हिंदुस्थान परतंत्र आहे अशा स्थितींत आपल्या विनयशील पण तेजस्वी अभ्यासानें 'हिंदुस्थानचा ग्लॅडस्टन' म्हणवून घेण्याइतका दर्जा ना. गोखल्यांनीं प्राप्त करून घेतला होता. खंबीर बुद्धि, पीळदार स्वभाव व उत्कृष्ट भावना हे त्यांचे गुण तरुणांनीं मुद्दाम लक्षांत वागवावे. तोंडाबाहेर काढलेल्या आपल्या प्रत्येक शद्बाला ना. गोखले आत्मविश्वासानें इतकी किंमत आणीत कीं लॉर्ड कर्झनसारख्यासही गोख-ल्यांच्या अंतःकरणशुद्धतेबद्दल नितांत आदर वाटे. ऐन एकोणिसाव्या वर्षांपासून गोखल्यांनीं स्वतःस सार्वजनिक कार्यास वाहून घेतलें होतें, हें तरुणांनीं लक्षांत ठेवण्यासारखें आहे. लो. टिळकांनीं म्हट-ल्याप्रमाणें "इंद्रियशक्ति शाबूत आहेत, शरीर स्वार्थासाठीं उद्योग करण्यास समर्थ आहे, वार्धक्य अजून दूर आहे, आणि संसारांतील सुखाचें स्वरूप अद्याप मनोहर असून तिकडे चित्ताची प्रवृत्ति होणें साहजिक आहे. अशा वेळीं आणि विशेषेंकरून या दिशेनें गेलें असतां आपणास यश मिळण्याचा कांकणभर अधिक संभव आहे, अशी मनास खात्री वाटत असतांही या सर्व मनोहर देखाव्यावरून दृष्टी मागें ओढून यथाशक्ति आप-णास देशकार्यास वाहून घेणें, त्यांत आलेलीं संकटें सोसण्यास कबूल असणें किंबहुना त्यांतच आनंद मानून त्यासाठीं सतत परिश्रम करण्यास तयार होणें याला एक प्रकारचा बळकट मनोनिग्रह लागत असतो. आणि तो मनोनिग्रह ज्यानें दाख-विला इतकेंच नव्हे तर आमरण कायम ठेविला, तोच पुरुष धन्य होय." न्या. रानडे यांचें जीवन-रहस्य म्हणजे मायभूमीच्या चरणीं त्याग आणि कार्य यांचीं सुमनें वाहणें हें होतें असें

गोखल्यांनीं एके ठिकाणीं सांगितलें आहे. तेंच त्यांनीं स्वतां आचरून दाखविलें. त्यांच्याच पावलावर पाऊल टाकण्याची बुद्धि महाराष्ट्राला होवो अशी प्रार्थना आहे.

## ' महाराष्ट्राचे पंचप्राण '

अधुनिक काळाचा विचार करतां न्या. रानडे, शास्त्रीबोवा, लोकमान्य, आगरकर, गोखले हेच आज महाराष्ट्राचे पंचप्राण वाटतात. महाराष्ट्रांत पेशवाईचा लोप होऊन जरी १८१८त महाराष्ट्रावर

### पारतंत्र्याचें जोखड

बसलें, तरी महाराष्ट्राच्या स्वातंत्र्यासाठीं नानासाहेब वेडया आशेनें कां होईना १८५७ पर्यंत धडपडत होता. पण त्यावेळीं अपयशानें जेव्हां निराशेचा दाट काळोख पसरला तेव्हां इंग्रजांच्या व पाश्चिमात्यांच्या पराक्रमानें, युद्धसामुग्रीनें, वैभवानें व संस्कृतीनें लोक दिपून गेले आणि आपल्याला कांहीं हातपाय हालवितां आलेच तर ते येथें आलेल्या पाश्चिमात्य संस्कृतीच्या अनुरोधानें आपल्यांतील दोष आपण काढून टाकले तरच येणार आहेत, या कल्पनेनें ' लोकहितवादींनीं ' समाजाला डिवचावयाला सुरवात केली. परंतु इतिहासपरंपरेच्या अनुरोधानें व पाश्चात्य संस्कृतीच्या चिकित्सेनें महाराष्ट्रावर

### " सूर्योदय खास होईल "

असा संदेश न्या. रानडे यांनीं प्रथम दिला. या संदेशाला मूर्त स्वरूप देण्यासाठीं त्यांनीं आपण पडद्यामागें राहून औद्योगिक, सामाजिक, राजकीय चळवळीचीं सूत्रें हालविलीं. प्रार्थनासमाजाच्या रूपानें धार्मिक चळवळ प्रत्यक्ष नेटास लाविली. तरी पण या वेळीं सुशिक्षित समाज इंग्रजी तेवढें चांगलें या भुलाईनें भुलून गेला होता. आपले राष्ट्रोन्नतीचे विचार रानडयांनींदेखील इंग्रजींतूनच मांडले. या परावलंबीपणाला कलाटणी देण्यासाठीं विष्णुशास्त्री चिपळूणकरांनीं आपल्या निबंधमालेनें सुरवात केली व ' न्यू स्कूल, ' ' चित्रशाळा ' ही अस्तित्वांत आणून रानडयांच्या चळवळीस मूर्तस्वरूप दिलें. यानंतर

### लोकमान्य व आगरकर

यांच्या कामगिरीकडे लक्ष जातें. लोक स्वावलंबी, बाणेदार, निस्पृही, धाडसी आणि दोन हात करण्यास समर्थ व्हावेत अशा हेतूनें आगरकरांनीं समाजाला दोष दाखवून टोंचणी लावली. तर ज्या लोकांच्याकारितां आपण धडपड करावयाची त्यांचा पाठिंबा मिळावा म्हणून लोकांत राजकीय जागृति उत्पन्न करून नोकरशाहीशीं दोन हात करण्याची तयारी लोकमान्य टिळकांनीं केली. न्या. रानडे यांचे राजकीय पंथास ना. गोखले यांनीं पूर्णत्व देऊन

### कर्झनशाहीसारख्या सुलतानशाहीला

तोंड देऊन लोकपक्षाची बाजू राखली. या सर्व गुणांची महाराष्ट्राच्या उन्नतीच्या दृष्टीनें अत्यंत आवश्यकता आहे. हे सर्व ' पांचजन्य ' होते. आणि या सर्वांत मिळून ' सत्यं ब्रह्मऋतमुग्रं दीक्षा तपो ब्रह्मयज्ञः ' हे पृथ्वीधारणेचे गुण होते.

## साहे ओझें त्यास तेंचि द्यावें

श्रीतुकाराम महाराजांचा एक अभंग असा आहे कीं, अधिकार तैसा करूं उपदेश । साहे ओझें त्यास तेंचि द्यावें ॥ या अभंगाच्या उत्तरार्धावर मी आज चार शद्ब सांगणार आहें व त्याचाच अर्थ किंचित फिरवून माझ्यावरील हें ओझें आपण माझ्या वकुबाप्रमाणेंच ठेवा एवढें प्रथम मला आपणांस विनयपूर्वक सुचवावयाचे आहे.

स्वातंत्र्य हें हिंदुस्थानचें ध्येय ! सळसळत्या रक्ताची आत्यंतिक दृष्टी सोडून दिली, तरी ' उच्च ध्येय ' या दृष्टीनें तरी व्यवहारी राजकारण्यांना तें पटतच असतें. " परत खेडयांत " हें राष्ट्रीय चळवळीचें आतां सूत्रच आहे. पण खेडकऱ्यांना आणि शहऱ्यांना हिंदुस्थानच्या स्वातंत्र्यासाठीं कांहीं तळमळीनें करतां आलें पाहिजे. देशांतील अणूरेणू राष्ट्रीय ध्येयानें दुमदुमून निघाल्याशिवाय पाऊल पुढें पडणें मुष्किलीचे असतें. ह्मणून प्रत्येकजण कृतीचा देशभक्त झाला पाहिजे. ज्याला जें येत असेल अगर ज्या कलेची हौस असेल तें त्यानें इतक्या प्रवीणतेनें केलें पाहिजे कीं त्यांत इतर देशाची तुलना करतां त्याचा नंबर वर लागला पाहिजे; इतकी जरी महत्त्वाकांक्षा प्रत्येक हिंदवासीयानें धरली तरी हिंदी राष्ट्राच्या उद्धाराचे कार्यांत तें रुजूं होईल. ज्याची जितपत कुवत, तितपत त्याच्याकडून राष्ट्रकार्य करवून घेणारा योजक छत्रपतींच्या तोलामोलाचा भेटल्याशिवाय तें साध्य व्हावें तसें होणार नाहीं. तसा योजक उत्पन्न व्हावयास तपस्या लागते. ती आपण कितीशी करतों ? आजकाल देशभक्तांची एक निराळी जातच निघाल्यासारखी झाली आहे. तशी स्थिती असून चालणार नाहीं, चालत नाहीं असें जगाचा इतिहास कंठरवानें बोलतो. शक्तिमंतांचे शक्तमंतसुद्धां जुलूमजबरदस्तीच्या योगें धुळीला मिळतात, या लॉर्ड सॅलिसबरीच्या वचनाप्रमाणें साहेबाच्या पकडींतून आपण खात्रीनें सुटूं. परंतु साहेबाच्या पदरीं अन्यायाचें माप घालतांना आपली पुण्याई आपण दाखविली पाहिजे. या हिशेबासाठीं देशांतील प्रत्येक व्यक्तीनें रोजच्या रोज अल्पस्वल्प काळ तरी राष्ट्रकार्यासाठीं दिला पाहिजे. म्हणून स्वातंत्र्याच्या ध्येयाची ध्वजा " परत खेडयांत " रोवतांना, प्रत्येकाच्या आटोक्यांत असतील असे मार्ग ग्रामसंघटकांनीं आखून दिले पाहिजेत. " साहे ओझें त्यास तेंचि द्यावें " हा शिष्टाचाराचा राष्ट्रीय आज्ञार्थ समजूनच " सदा येतां जातां " भगवच्चिंतनाबरोबर राष्ट्रसेवा करण्याचा उपदेश प्रत्येकानें आपल्या मनास केला पाहिजे. साहेबाचे बूट पुसण्यांत आणि चाटण्यांत ज्यांचा काळ जातो आहे त्यांनीं देखील मायभूमीच्या हाकेसरशी कायसरच्या जर्मनाप्रमाणें अगर लेनिनच्या रशियनाप्रमाणें खडी तालीम देण्याची तयारी राखली पाहिजे, तरच तेहत्तीस कोटीचा हिंदुस्थान पारतंत्र्यांत असल्याबद्दल जपानसारखीं राष्ट्रें आपल्याला हिणवतात तें हिणवणें हिणकस ठरविणें हातचा मळ होऊन बसेल."

## प्रगतीची व्याख्या.

" प्रगतीची निश्चित व्याख्या ठरत नाहीं. यामुळेंच सर्व प्रकारचे वाद निर्माण होत आहेत. एकदां प्रगतीची व्याख्या ठरली ह्मणजे फारसें महत्त्व रहात नाहीं. क्रांति करणारा नेहमीं बंधनांच्या पलीकडे असतो. याला ३०० रूबलसवर काम करणाऱ्या लेलिनचें उदाहरण देतां येईल. आपल्या महाराष्ट्रांतही ज्यावेळीं पुनर्विवाह हा भयंकर गुन्हा समजला जात असे त्यावेळीं श्री. अण्णासाहेब कर्वे यांनीं पुनर्विवाह करून एक सामाजिक बंधन झुगारून दिलें. प्रगतीची व्याख्या ज्याच्यापुढें स्पष्ट असते तो बंधनाच्या पलीकडे जातो; व प्रगतीच्या मार्गावर झपाटयानें पुढें जाऊन तोच समाजाला नवीन बंधनें घालूं शकतो. पण ही प्रगतीची व्याख्या ठरावयाची कशी ? माझ्या

मतें, ' व्यक्ति, कुटुंब आणि समाज यांनीं चांगल्या तऱ्हेनें जगावयाचें कसें हें ज्यानें ठरेल तीच खरी प्रगती होय. ' ज्याच्या अंगीं कर्तबगारी आहे तो सर्व बंधनें तटातट् तोडून पुढें निघून जातो. पुढें जातांना मेलों तरी पर्वा नाहीं असें त्याला वाटतें. आपली संस्कृति कुजलेली नाहीं, ती प्रगतिपर आहे म्हणूनच इतके दिवस टिकून राहिली आहे."

## निरोप.

" तरुण म्हटला म्हणजे तो ताज्या रक्ताचा पाहिजे. तरुण म्हटला म्हणजे तो कणखर हाडाचा पाहिजे. तरुण म्हटला म्हणजे तो मर्दानी मनाचा पाहिजे. तरुणाची तरतरी तीराला लाजविणारी हवी. तरुणाची विचारशक्ति समुद्रासारखी रत्नाकर हवी तरुणाचें सिंहावलोकन इतिहासाला मुरड घालणारें हवें. तरुणानें पायाखालीं धरणी नमवावी. तरुणानें गगनाला हात घालावा. तरुणानें आपले डोळे भविष्याकडे लावावे. तरुणानें अरुणांला हुंगावे आणि तरुणानें आपले कान वरुणांकडे लावून ठेवावे. तरुणानें आपल्या पाठीवर भूतकाळाचा हात राखावा आणि पोटांत वर्तमानकाळाची बोधफळें तरुणानें घालावीं. तरुणानें मरणाला मारावें, भीरुपणाला लाजावें, कीर्तीला भजावें, वीरपरंपरेला साजावें आणि तरुणाच्या दीपवत्या कर्तबगारीनें अक्कलमंदांनीं थिजावें ! असा असतो तोच तरुण चिरंजीव होतो, विजयी होतो. बाळ, तूंही असाच विजयीभव चिरजीव तरुण हो आणि आपल्या माय-भूमीचें नांव राख. यापेक्षां आगगाडींतील प्रवासासारख्या या भुरट्या सहवासांतून भुरकन् उडून जाण्याची वेळ आली असतां, दुसरा कोणता आशीर्वाद माझ्यासारखा पामर तुला देऊं शकेल ? "

२ जगाला जितकीं वर्षें लोटताहेत, तितकें नांवानांवानें शहाणपण पुढें चाललें आहे. अर्थात् आपले वाडवडील त्या मानानें पोर होते तर आपलीं पोरेबाळें वडीलधारी होतील. असें होत राहणें हाच मुळीं जगण्याच्या शास्त्राचा पाया आहे. एरवीं, शिष्य सवाई होण्यांत गुरूला आणि बेटा सवाई होण्यांत बापाला, कसा आनंद वाटला असता ? तो तसा जिथें वाटतो, तिथेंच जगण्याचें शास्त्र व्यवहारांत आहे. नाहीं तर ' असुनि जिवंतहि मेला ' हाच मामला सुरू आहे, असे धडधडीत होतें. आपण, आपल्या कुलानें, समाजानें, राष्ट्रानें, जगानें मरावें, असें कोण्या माणसाला वाटेल ? वाटणार नाहींच नाहीं. तर मग प्रत्येक मनुष्याला काय जबाबदारी येते, पहा. आपलीं मुलें-बाळें असोत किंवा आपल्या पावलावर पाऊल टाकून येणारीं दुसरीं कोणी असोत, तीं आपल्यापेक्षां सवाई निघालीं पाहिजेत, अशी काळजी मनुष्यानें पावलापावलागणीक घेणें जरूर आहे. माणुसकीचा हा पहिला धडा आहे. तो ज्यानें गिरवला, हातचा मळ केला आणि अशा रुबाबानें जगला, तोच माणूस म्हणून जगला.

३ निराशा ! छट् ! हवी कशाला ती ? निराशा म्हणजे जितें मरण, जित्या मनाचा महारोग म्हणजे निराशा. नैतिक अधःपाताची पहिली ठिणगी म्हणजे निराशा. ईश्वरी स्फूर्तीचा आविर्भाव म्हणजे कला. होय ना ? बस् तर मग. त्या ईश्वरी स्फूर्तीला मूठमाती देण्याची तयारी करणारा विषबिंदू म्हणजे निराशा. कलावंतांच्या मालिकेंत एका टोंकाला चित्रकार तर दुसऱ्या टोकाला शिल्पकार असतो. आणि या दोघांचा मध्य व किरण साधून झुबक्यासारखा कवि नांदत असतो.

म्हणूनच एकाच्या वेडानें व दुसऱ्याच्या शहाणपणानें त्याला आपल्या शब्दसृष्टीचा शृंगार थाटतां येतो. हा कविच सांगतो कीं— " काय निराशा असे बरें ? बुजगबाहुलें जगांतलें । मूर्ख भिउनिया त्या गेले ! " मला वाटत नाहीं कीं स्वतांला माणूस ह्मणवून घेणारा ही अति शहाण्यांची पंगत साजरी करूं इच्छिल ! आणि हें जर खरें, तर कोणीही भेटीबरोबर निराशेला सांगेल कीं '- जाई परतोनी. "

४ डोक्यांच्या केसांची कुरळ संसारांतील चंचल मनाला भुरळ पाडणारी; कपाळाची भव्यता भोंवतालच्या बागडणारांत भावभक्ति उत्पन्न करणारी; भुवयांची कमान परिस्थितीला काबूंत ठेवणारी, टांचणीटोंच जमीन लक्षांत राहील इतकी बारीक नजर, मुंग्यांची कुजबुज समजेल इतके टवकारलेले कान, एकंदर चेहऱ्याचा मोहरा फुलांनीं तोरे होण्यासारखा, नाकांतला श्वास लोकांना ध्यास लावील— ओठांवरील हास्य लोकांची खुलावट करील- जिभेवरील शब्द लोकांच्या गळीं उतरेल — विशाल छातीचा, पिळदार दंडांचा, गोल मनगटाचा, भजबूत कमरेचा, घटावलेल्या मांडीचा, टेसदार पावलांचा आणि एकंदर अवयवांच्या रेखीव आखीवपणानें देवांनीं हेवा करावा असा -- असा पुरुषोत्तम ज्या वेळीं आपल्या कर्तबगारीच्या शेजावर विसावतो तेव्हां निसर्गलक्ष्मी त्यांचे पाय चुरत असते. हो, बाळ असा पुरुषोत्तम हो.

---

## शाळा सोडल्यावर.

माझ्या बालमित्रांनो, तुह्मांला मी आरंभींच सांगून टाकतों कीं, तुह्मी शाळाच सोडूं नका. कित्येकजण म्हणतील काय वेडेपणाचा उपदेश हा ? पण मी मनापासून सांगतों तुम्ही कधींच शाळा सोडूं नका. निष्काळजीपणाचें निकोप असें ' रम्य तें बाळपण ' शाळेंत असतें, एवढ्यासाठीं हें मी सांगत नाहीं; कारण जन्मभर आपण शाळेंत राहायचें ठरले तर तें बाळपण थोडेंच तग धरणार आहे ? तें जर धरील तर किती तरी दुःखापेष्टांनीं सतावलेले जीव शाळेंत येऊन गर्दी करतील ! इष्टापत्तीच आहे ती ! पण मला कांहीं शक्य दिसत नाहीं नी त्या अर्थानें मी शाळा सोडूं नका असें ह्मणत नाहीं. कांहीं एक वर्षें तुमच्या वयाला झालीं, कांहीं एक इयत्तांचे टप्पे तुह्मी ओलांडले, कांहीं एक मर्यादेपलीकडे शिक्षणाचा खर्च वाढूं लागला, किंवा शिक्षणापेक्षांही दुसरीं निकडीचीं कर्तव्यें तुह्मांला खेचूं लागलीं ह्मणज तुह्मांला लोकदृष्ट्या शाळा सोडणेंच भाग आहे. तरीपण माझें सांगणें असें कीं शाळा सोडूं नका.

शाळा सोडणें तर भाग, आणि शाळा सोडूं नका याचा अर्थ काय ? बाळांनो, याचा अर्थ इतकाच कीं जे शाळा धरतात त्यानांच शाळा सोडण्याचा न सोडण्याचा प्रश्न पडतो; त्यांच्यासाठींच माझा हट्ट असा कीं त्यांनीं शाळा सोडूं नये ! कांहीं बहाद्दर असे असतात कीं ते चार भिंतींच्या आणि अठ्ठावीस खोल्यांच्या शाळागृहांत येतात, एखाद्या गुरूच्या देखरेखीखालीं नेमलेला अभ्यास करतात पण त्यांना शाळा लागलेली नसते ! " अमक्या तमक्या गोमाजीच्या घरची शाळा कांहीं चांगली नाहीं " असे शब्दप्रयोग आपण ऐकले असतील ! तोच मासला कांहीं कांहीं हुषार विद्यार्थीही स्वतःच्या शाळेसंबंधीं उडवीत असतात ! नसते त्यांना स्वतःच्या शाळेची पुरी माहिती ! नसतो स्वाभिमान ! नसते शाळेची

कळकळ ! नसते कृतज्ञता कीं, आपण शाळेचें नांव राखावें ! पूर्वीच्या काळीं गुरुजवळ राहून बारा बारा वर्षे विद्याभ्यास करण्याची चाल असे व निरपेक्षबुद्धीनें शिकविणाऱ्या गुरुगृहीं पडेल तें काम पार पाडून शिष्य त्या त्या वेळीं आणि पुढें सर्व आयुष्यभर गुरूंची कीर्ति राखीत ! गेला तो काळ ! आतां देवघेवीचा — तोला मोलाचा — पैशापासरीचा काळ आला ! फी — पगारापुरतांच शिक्षणाचा वकूब राहिला, गुरु — शिष्यांचा संबंध बाजारबसवा झाला ! तरी पण लक्षांत ठेवा, त्यांतला प्रेमळ कृतज्ञतेचा धागा अजूनही तुटला नाहीं, पुढेंही तुटेल असें वाटत नाहीं ! केरुनाना छत्रे, विष्णुशास्त्री चिपळूणकर, गोपाळराव आगरकर हीं गुरु-शिष्य प्रेमाचीं सुप्रसिद्ध उदाहरणें आहेत ! तुह्मीही बदली झालेल्या शिक्षकांना पानसुपारी करतां आणि तुमचा निरोप घेतांना कित्येकदां कित्येक गुरुशिष्यांना गहिंवर येतो ! बाळांनों हें अेस कां होतें ? तर शिक्षकाच्या खुर्चीवर बसणाऱ्या कोणाही जातिवंताला ‘ जें जें कांहीं आपणांसी ठावें ’ तें तें शिकवल्याशिवाय राहवतच नाहीं ! मिळणाऱ्या मोबदल्यापेक्षां आपलें काम अधिक उठावें अशी तळमळ वसिष्ठ, हारिश्चंद्रांच्या परंपरेंतील ह्या मनाला लागलेली असते. मग अशा गुरूंच्या पायापाशीं पाटीपेन्सील घेऊन बसणाऱ्या विद्यार्थ्यांच्या अंतःकरणांत कांहींच कृतज्ञता उत्पन्न होत नसेल काय ? पण कोणी मला विचारील— कीं, काय हो तुह्मी अगदींच हिंदू आहांत ; आजच्या व्यापारी युगांत हें काय उपयोगीं ?

त्यालाही माझें उत्तर एकच, कीं, त्या दृष्टीनेंही माझा सिद्धांत चूक नाहीं. ज्या इंग्रजांनीं ही शिक्षणाची व्यापारी पद्धत सुरूं केली त्यांचाच एक सिद्धांत असा आहे कीं राष्ट्रांची रचना शाळांच्या मधून होत असते. शिवाय शाळा ही गृहशिक्षणाची पुरवणी आहे. या दोन सिद्धांतांचा एकत्र विचार केला ह्मणजे आपल्या फी-पोटाला घालणाऱ्या आई-बापांशीं बेईमान न होण्यासाठीं तरी शाळेंत आपणांस लागणारी शाळा आपण सोडतां उपयोगी नाहीं. प्रत्यक्ष शाळागृहांत जाण्याचें सोडल्यावर प्रामुख्यानें जर कांहीं करावयाचें असेल तर तें हें कीं लागलेली शाळा सोडावयाची नाहीं !

ह्मणजे तरी काय ? आपला अभ्यास पुढें चालू ठेवावयाचा ? हो, ठेवावयाचा. शाळेंतील पुस्तकी पोपटपंचीनें पुरें ज्ञान होतें कोठें ? जग ही एक शाळा आहे. तेथें पुढें येणाऱ्या प्रश्नांचा साधकबाधक अभ्यास केल्याशिवाय कर्तबगारीच्या परीक्षा पास होत नाहींत. शाळागृहांतून पाय काढल्याबरोबर पुस्तकसंग्रहालयाला गंधफूल—नव्हे धूळकेंबळें वाहण्याची चाल अत्यंत घातुक आहे. आतां साऱ्या विषयांचा अभ्यास सारख्या प्रेमानें होणें शक्य नाहीं, हें मला कबूल आहे. आणि तशी धडपड केली तर भाराभर चिंध्याच वेळेला हातीं रहावयाच्या, असाहि संभव अधिक ! आणि ह्मणूनच आपल्या अत्यंत आवडीचा असा एकादा विषय घेऊन त्याचें परिशीलन असें सांगोपांग करावें कीं त्यांतलें अधिकारी होऊन बसावें ! “ कांहीं एक उत्कटेंविण । कीर्ती कदापी नोहे जाण । ” हें लक्षांत वागवून ‘ यत्न तो देव जाणावा. ’ असें करण्यानें त्या एका विषयांत आपला हात कोणीं धरणार नाहींच; पण रोज पुढें येणाऱ्या प्रश्नांचें सर्वसाधारण आकलन चटकन होऊन व्यवहार सुतराम् साधेल. इतकेंच काय एका अभ्यासाच्या अनुषंगिक असलेल्या शिस्त,

नियमितपणा, उद्योग, हुरूप, विनय इत्यादि गुणांचा विकास होऊन आपलें व आपल्या भोंवतालच्या मंडळींचें कोटकल्याण होईल. आणि न जाणों, आपल्या विषयांमध्यें असेही कदाचित् शोध लागतील कीं, ज्यांच्या योगानें जगाचें कल्याण व्हावें !

आपल्या शाळेला कमीपणा येणार नाहीं, तर शाळेचें नांव निघेल अशी आपली वागणूक ठेवणें हा पहिला आणि अत्यंत आवडत्या विषयाचा अभ्यास हा दुसरा उद्योग सांगितला;तिसरा उद्योग गुरुगिरी. ह्मणजे पुन्हा शाळाच. जागत्या बुद्धीचा प्रत्येक मनुष्य हा जसा जन्मभर विद्यार्थी असतो तसा तो शिक्षकही असतो. त्याच्या भोंवतालीं जी चार मंडळी असतात, ती त्याचें अनुकरण करीत असतात. छत्रपती संभाजी महाराजांना उपदेश करतांना समर्थांनीं सांगितलें कीं "शिवरायांचें कैसें चालणें" तें पाहून स्वतः चालावें. माणसाचा स्वभाव अनुकरणप्रिय असल्याकारणानें आपल्यांतील प्रत्येक संभाजी, प्रत्येक राजाराम, प्रत्येक तानाजी आपआपला शिवाजी हुडकून काढीतच असतो ! हंसू नका. आपण सर्व तानाजी आणि शिवाजीच आह्मां ! परमेश्वराची कृपा तशी भगीरथ भाग्यानें आपणां सर्वांच्या मस्तकीं विराजत नाहीं, हा भाग वेगळा ! पण ध्यानांत धरा, महाराष्ट्राचा शिवाजी, फ्रान्सचा नेपोलियन, इंग्लंडचा ग्लॅडस्टन, अमेरिकेचा वाशिंग्टन, रशियाचा पीटर, जर्मनीचा कैसर, इजिप्तचा झगलूल, तुर्कस्थानचा केमालपाशा, चीनचा सन्यत्सेन, राजस्थानचा प्रतापसिंह, जगाच्या इतिहासांतील कोणतेंही रत्न घ्या, तें त्या देशांत चमकलें; याचाच अर्थ त्या तेवढ्या हिऱ्यापायीं किती तरी जातिवंत हिरकण्या तेथें होत्या. इतिहासाच्या नजरेंत त्या सगळ्या भरत नाहींत, त्याला नाइलाज आहे. दरेक रणगाजीची नोंद इतिहासाजवळ नसते अशी पाश्चात्य ह्मण आहे. शेंकडों शिपायांच्या रक्तांनीं सेनापतीचें नांव काळाच्या कपाळावर कोरलें जातें- एवढेंच इतिहासाचें सामर्थ्य! राष्ट्रांत विभूति होते ती उगीच नाहीं, ती उत्पन्न होण्याचा काळ त्या राष्ट्राला आलेला असतो; असें जें इंग्रज ग्रंथकार कार्लाइल याचें अर्ध सत्य आहे, त्याचा खरा खुलासा नामशेष झालेल्या छोट्या विभूतींच्या प्रयत्नवंत चरित्रांत आहे. छत्रपतींच्या स्वराज्यस्थापनेची अर्धीअधिक तयारी सहाशें वर्षें संतमंडळी करीत होती असें न्या. रानडयांनीं ' मराठीसत्तेच्या उत्कर्षांत ' लिहिलें आहे. त्याचा आणि स्वातंत्र्यासाठीं रानोमाळ भटकणाऱ्या प्रतापसिंहापासून थेट मालोजीपर्यंतच्या रणगाजी चरित्रांचा विचार केलात तर माझे ह्मणण्यांतील इंगित तुह्मांला पटेल. सरळ शद्बांत सांगावयाचें तर मी स्पष्ट ह्मणतों कीं, महाराष्ट्रांत नव्या काळाला साजेसे नवे शिवाजी-महाराज व्हावेत अशी इच्छा आहे, ती बेंबीच्या देठापासून असेल, तर आपण सर्वांनीं आपआपल्या परिघापुरते छोटे छोटे शिवाजी झाले पाहिजे. तसें व्हावयाचा उत्कृष्ट मार्ग ह्मणजे प्रत्येक पाऊल टाकतांना, त्याच्यावरून दुसरा आला तर घसरणार नाहीं ना, इतकी काळजी घेऊन शीलवंत काम करणें.

पण एवढया एकाच अर्थानें मी गुरुगिरी सांगत नाहीं. माझा कटाक्ष प्रत्यक्ष शिकवणीवरही आहे. शिकलेल्या लोकांपैकीं प्रत्येकजण जर आपल्या हयातींत, निदान एक माणसाला तरी साक्षर करील तर सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाचा

प्रश्न तेव्हांच सुटण्याच्या पंथास लागेल ! पण प्रत्यक्ष पाटी, पेन्सील हातीं देऊन आणि घेऊन ज्यांना शिकवतां येत नसेल त्यांनीं व्याख्यानांतून, प्रवचनांतून, कथापुराणांतून, नाटकचित्रपटांतून, खेळांतून आणि गप्पांतूनही आपण कमावलेल्या ज्ञानाचा फायदा आपल्या भोंवतालच्या जनतेस दिला पाहिजे.

कोणत्याही राष्ट्राचें दुसऱ्या राष्ट्रापाशीं जें वजन असतें तें त्यांतील विद्वान् पुरुषामुळेंच असतें, असें आगकरांनीं एके ठिकाणीं ह्मटलें आहे. पण या विद्वानांच्या प्रतिष्ठितपणाला लव-मात्र बाध येणार नाहीं असा सामान्य जनसमूहाचा शिरस्ता पाहिजे, हेंही आगकरी सिद्धांताइतकेंच सिद्ध आहे.

सहाव्या शतकांत चिनी वगैरे प्रवासी येथें येऊन गेले, आणि त्यांनीं आपलीं प्रवासवृत्तेंही लिहून ठेवलीं. आतां तर काय, प्रवासाचीं आणि छापण्याचीं इतकीं साधनें झालीं आहेत कीं, परका प्रवासी किंबहुना हिंदी पगार खाणारा माबापसरकाराचा सनदी नोकर आपल्या रोजनिशींत पुढें मागें हिंदी राष्ट्राचें चरित्र रेखाटण्याचा संभव पूर्ण असतो. तसल्या शद्बचित्रावरून पुष्कळ वेळां जग आपल्या राष्ट्राची किंमत करीत असतें. तेव्हां सामुदायिक कुवत वाढविण्यासाठीं प्रत्येक सुशिक्षितानें झटलें पाहिजे.आतां, मला इतकें कबूल आहे कीं, मी सांगितलेली गुरुगिरी सफाईनें साधली पाहिजे. पण हें ज्याच्या त्याच्या आक्रमशक्तीवर अवलंबून आहे.

लोकसंग्रह हें आणखी एक जबाबदारीचें काम आपण केलें पाहिजे. मात्र तो ' असतील शितें तोंवर जमतील भुतें ' इतका 'काचाळ' नसावा ! तर- तो ' लहान थोरें परीक्षून ' केलेला असावा ! समर्थांनीं हें परीक्षण ' भिक्षाभिषें ' करावयास आपल्या शिष्यास सांगितलें आहे. मी उपकाराचा निदान उपयोगी पडण्याचा उपाय सुचवितों. उपकार हा शद्ब अगदीं स्वार्थी नजरेच्या समाधानासाठीं मी योजला. शेजारधर्म किंवा दुसऱ्याच्या उपयोगी पडणें हें प्रत्येक माणसाचें सामाजिक कर्तव्य आहे. शेजाऱ्यानें किंवा अडीअडचणींत सांपडलेल्यानें हांक मारल्यावर मदतीला जाण्याची बुद्धी आणि त्याची अडचण पाहून आपण होऊन त्याला हात देण्याची प्रवृत्ती यांत अंतर आहे. वाईट कोणतीच नाहीं. पण पहिली किंचित् चांगल्याच अर्थाच्या गुर्मीची तर दुसरी उर्मीची. पहिली कृतज्ञतेचें नातें जोडते तर दुसरी जिवाला जीव जडविते. तेव्हां या स्वयंस्फूर्तीच्या समाजसेवेसाठीं दिवसाकांठीं आपण कांहीं तरी काळ खर्च केलाच पाहिजे. समाजसेवेची अगदीं पहिली संधी, मग ती अतिशय क्षुद्र का असेना— आपण हातची निसटूं न देण्याचा जर रोज परिपाठ ठेवला तर स्वतःची आत्मिक उन्नती होतेच, पण जनतेच्या सहानुभूतीचे धागेदोरेही आपल्या ह्रदयाशीं संलग्न होतात. जनतेच्या या सहानुभूतीचा उपयोग केवढा आहे हें टिळकांनीं आपल्या लोकमान्यतेनें दाखविलें आहे. जनतेच्या या सहानुभूतीबरोबर ' आपलीं ' ह्मणून कांहीं माणसें राखावीं लागतात. आपल्या

हांकेला करोल तयार असलेलीं

हीं माणसें कशी मिळवावयाचीं ? ' कर्त्याच्या अकर्तेपणानें. ' जरा अवघड आहेत हे शब्द! स्पष्ट करतों ते. जगांत गंमत अशी आहे कीं, कांहीं माणसें ' महत्व देऊन गौरवावीं ' लागतात. पडद्याआडचीं सगळीं सूत्रें आपण हालवावयाचीं,

पण लोकदृष्टींच्या रंगभूमीवर त्यांनीं कर्तबगारी करावयाची. अशा शिरस्त्यानें आणि त्यांच्याशीं आपुलकी ठेवल्यानें तीं आपल्या खांद्याला खांदा लावावयास सदैव सज्ज असतात.

असो. मी आतांपर्यंत सांगितलेल्या उद्योगासंबंधीं बोलावयाची अपेक्षा या माझ्या प्रिय गुरुपीठाची आहे कीं नाहीं कोणास ठाऊक ! पण मी आतां सांगणार असणाऱ्या उद्योगासंबंधीं मात्र खास अपेक्षा असणार. तो उद्योग पोटाचा ! बाब्या ह्मणून गांवांत फिरणारा पोऱ्या पैसे मिळवायला लागला कीं बाबासाहेब झालाच! इतकें महत्व या धंद्याचें आहे. खरेंच आहे तें ! आपल्या पोटापुरतेही हातपाय हालवीत नाहीं, तो समाजावर एक निष्कारण ओझें होऊन राहतो. दारोदार भीक मागो किंवा न मागो ! तो प्रतिष्ठित गलेलठ्ठ भिकारीच होय ! समाजाला लागलेली ती एक कीड होय ! असली कीड आपण होऊं नका. नौकरी आणि उद्योगधंद्याच्या या टंचाइच्या दिवसांत निदान एवढी तरी काळजी घ्यायला हवी कीं, "कांहीं कष्टें करून" आपण आपल्या घासाचा अधिकार प्राप्त करून घेतला आहे ! तथापि आजकालच्या आपल्या अवनत स्थितींत एवढयानेंही भागणार नाहीं. सपन्न राष्ट्रांतसुद्धां उत्पादक उद्योगांची चलती असावी लागते, मग आपली गोष्ट तर बोलावयासच नको ! उत्पादक उद्योग ह्मणजे शक्तियुक्तीच्या जोरावर आणि नीतिच्या मार्गानें ' चवलीची पावली 'करण्याचा उद्योग. असा उद्योग नौकरी नव्हे हें उघड आहे. हां ! कांहीं दिवस उमेदवारी करावी लागली तर निराळी ! पण माणसानें स्वतंत्र उद्योग केला पाहिजे. कांहीं धंद्याचीं मूलतत्वें तरी शाळांतून शिकविण्याची सोय होईल तर किती बरें होईल !

शेती हा आपला प्रमुख उद्योग आहे खरा, आणि सुधारलेली शेती कांहींशी किफायतशीर होईल हेंही खरें; पण निव्वळ रानपिकू राष्ट्र कधींच उदयाला येत नाहीं. आजच्या यांत्रीक युगांत यंत्रशास्त्र आपल्या हातचा मळ होऊन बसलें पाहिजे. तें ज्यांस शक्य नसेल त्यांनीं सुतारकी आणि लोहारकी तरी करावी. हा प्रत्येक खाक्या असा आहे, कीं माणूस डोकें चालवील तर नांव करून जाईल! तेंही ज्यांच्या आटोक्याच्या बाहेर असेल त्यांनीं ' जुळारी" व्हावें! छापखान्यांत मराठी ठसेपेटीवर बसून खिळे जुळणें किती जिकीरीचें आहे हें " जावें त्याच्या वंशा तेव्हां कळें " ! मराठींतलि ग्रंथसंपत्ति न वाढण्याचें कारण मराठी ठशांची अवजड जुळणी होय. सुशिक्षित माणसें या कामांत लक्ष घालतील आणि व्यावहारीक सुलभता आणतील तर मराठी भाषेवर त्यांचे फार उपकार होतील.ही खिळेजुळणी किंवा इतर सांगितलेले धंदे अगर भांडवलाचा प्रत्यक्ष व्यापार ज्यांना शक्य नाहीं त्यांनीं जरूर लागल्यास हमालीही करावी, कोणत्याही तऱ्हेचा कमीपणा मानूं नये.

माझ्या बालमित्रांनों,आतांपर्यंत ज्या चार गोष्टी मला सुचल्या त्या सांगितल्या. आपल्या सारखाच मींही या शाळेचा विद्यार्थी होतों आणि वयाच्या वडीलकीपलीकडे कसलाही अधिकार मला येथें येऊन उपदेश करण्याचा नाहीं. तथापि मला फिरून फिरून एवढेंच सांगावयाचें आहे कीं, आपली शाळा सोडूं नका— शाळेच्या बाहेरचें मीं कांहींच सांगितलें नाहीं. आणि शक्य तितकें उच्च ध्येय डोळ्यांपुढें ठेवून स्वावलंबनानें प्रयत्नांचा पर्वत उभारा! मग यश देणें न देणें परमेश्वराच्या मर्जी-

वर आहे. " यत्ने कृते यदि न सिध्यति कोऽत्र दोषः। " तथापि यत्नसुद्धां सरळ मार्गानें झाला पाहिजे. सुयत्नरचित ध्येयाबद्दलच ह्मटलें आहे कीं,

" नोच्चैर्यो विफलोऽपि दूषणपदं
दुष्यस्तु कामो लघुः । "

## कृष्णकालीन शारीरिक शिक्षण.

ऐतिहासिक व्यक्ति त्या त्या काळाच्या प्रतिनिधि असतात. तेव्हां त्यांच्या चित्राच्या काचेंतून तत्कालिन समाजावस्था पाहावयास सांपडते. श्रेष्ठायत्त पद्धतींत वाढलेले कृष्णकालीन आर्य ' शतायुर्वै पुरुषः ' हें वचन सार्थ करणारे होते. खुद्द कृष्णाचें वय निर्वाणसमयीं १२५,१२० किंवा १०१ होतें अशीं निरनिराळीं अनुमानें आहेत. वसुदेवाचें वयही दीडशेंच्या घरांत होतें. लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट इतकीच कीं, हें दीर्घायुष्य दणकट असें. वयाच्या ८३ व्या वर्षी श्रीकृष्णानीं अर्जुनाचें सारथ्य केलें होतें. आणि त्रेसष्ठाव्या वर्षी अर्जुन भारतीय युद्ध मारीत होता. अशा तऱ्हेचें दणकट दीर्घायुष्य मूळ धरीत असें तें श्रेष्ठायत्त पद्धतीच्या गृहशिक्षणानेंच ! तें कसें होतें ?

श्रेष्ठायत्त कुटुंबपध्दति यशस्वी होण्यास त्याला आंपल्या पुरस्कारासाठीं स्त्रीजातीची नेक मदत लागत असते. 'भोज्येषु माता, कार्येषु मंत्री' अशी स्त्री असल्याशिवाय श्रेष्ठायत्त कुटुंबपद्धति यशस्वी होत नाहीं. तेव्हां कृष्णकालीं अशीं स्त्रीपुरुषें निर्माण करण्याची शाळा होती काय? होती. स्त्रीपुरुषांच्या शारीरिक शिक्षणाकडे त्यावेळीं विशेष लक्ष दिलें जाई. मल्लविद्या हा त्यावेळचा विशेष होता. जरासंधासारखा जख्खड ह्मातारा कुस्तीसाठीं दंड थोपटावयास तयार होत असे, मग इतरांची गोष्ट कशास बोलावयास पाहिजे? गवळी मंडळींपासून तों तहत राजदरबारापर्यंत कुस्तीचा शोक भयंकर होता आणि कुस्तीचे आखाडे पाहाण्याची हौस पुरुषांनाच काय, पण स्त्रियांनाही होती. चाणूरमुष्टिकासह रामकृष्णांचीं कुस्ती पाहाण्यासाठीं कंसाच्या रंगांत स्त्रियांना स्वतंत्र सोय करून दिली होती हें ध्यानांत धरलें पाहिजे. भ्रामण, लंघन, क्षेपण, आस्फोटन, विकर्षण असे कुस्त्यांचे प्रकार त्यावेळीं प्रचलित असून वरचेवर फड उठत असत. कुस्तीप्रमाणें धनुर्मुख पाहण्याचीही लोकांना आवड असे. तो पाहण्यासाठींच रामकृष्णाबरोबर नंदालाही कंसानें निमंत्रण दिलें होतें. या विद्येंतही त्याकाळीं कमी निपुणता नव्हती ! शिवधनुष्याचा भंग श्रीरामचंद्रांनीं जसा बोलबोल ह्मणतां केला, तसाच कंसधनुष्याचाही चक्काचूर कृष्णांनीं एका निमिषांत केला. धनुर्मुखामुळें लष्करी आयुधांशीं आपला परिचय होता आणि एकंदरीनें विचार करतां, त्यावेळीं लष्करी शिक्षण बरेंच प्रसृत होतें असें दिसतें. द्रोणाचार्यासारख्या ब्राह्मणापासून अर्जुनासारखा नरवीर धनुर्विद्या शिकला होता. भीम, दुर्योधन, रामकृष्ण हे गदायुद्धाचे पटु ह्मणून प्रसिद्ध आहेत. बलरामदादा नांगरानें व मुसळानेंही युद्ध करीत असत ! चक्र हें देखील एक लष्करी आयुध असून शत्रूला वार करून तें नेमकें फेकणाराच्या हातीं परत आलें पाहिजे, अशा तऱ्हेनें त्याचा उपयोग करण्याचें कसब होतें ! श्रीकृष्णाचें सुदर्शनचक्र आपल्याला माहीत आहेच; पण पौंड्रग वासुदेव ऊर्फ तोतया कृष्ण त्यावेळीं पुढें आला होता. तोही या चक्र-

विद्येंत वाकबगार होता. पायदळापासून घोडदळापर्यंत आणि गजदळापर्यंत सर्व तऱ्हेचें सैन्य त्यावेळच्या लष्करांत असें, हें भारतीय युद्धाच्या वर्णनावरून सर्वांस माहीत आहेच. अर्थात् रथाश्वविद्येंतील कुशलता साहजीक असली पाहिजे. कृष्णांनीं अर्जुनाचें, अर्जुनानें उत्तराचें, सुभद्रेनें अभिमन्यूचें, शल्यानें कर्णाचें सारथ्य साधलें होतें आणि कर्णार्जुनयुद्धांत 'रथचक्र उद्धरूं दे' अशी कर्णानें अर्जुनाची विनवणी केली आहे, यावरून स्त्रीपुरुषांना लष्करी शिक्षण किती बारकाईनें मिळे हें स्पष्ट होईल. हिडिंबेच्या वनांत सुभद्रा आणि नरकासूरवध प्रकरणीं सत्यभामा या प्रत्यक्ष युद्धांत हात हलवितांना आढळतात. त्यावरून इच्छा व कुवत असणाऱ्या स्त्रियांना तरी धनुर्विद्येचें शिक्षण मिळत असावें, असें अनुमान निघत नाहीं काय? उत्तरा व रुक्मिणी यांच्या शिक्षणपद्धतीचें सूक्ष्मावलोकन केलें तर तत्कालेन स्त्रियांना घोड्यावर स्वारी भरण्यापासून नृत्यगायनादि कलापर्यंत सर्व कांहीं शिकवीत असत असें ह्मणावयास बिलकुल प्रत्यवाय नाहीं. श्रीकृष्णांनीं खेळलेल्या लहानपणाच्या रासावरून अगर सागरतीर्थावर कृष्णरुक्मिणी, अर्जनसुभद्रा व प्रद्युम्न व त्याची पत्नी यांनीं नृत्य केलें त्यावरून, स्त्रीपुरुषांनीं एकत्र मिसळून नाचण्याची पद्धत प्रतिष्ठित मानली जात असे, आणि या रंगाला समवयस्क माणसेंच लागत नसून वडिलधाऱ्यांनीं लहानांबरोबर मिसळावयालाही प्रत्यवाय नसे. गायनाची कला बरीक इतकी सर्वव्यापी नसावी! चित्ररथगंधर्वासारखे कांहीं अपवाद सोडले तर पुरुषांत नांव घेण्यासारखें जवळ जवळ कांहींच नव्हतें! स्त्रीजातीचे तें स्वतंत्र मिरासपत्रच होतें ह्मटलें तरी चालेल! वाद्यवादनाचा मक्ता मात्र पुरुषांना दिलेला दिसतो! टाळ्यांचा ताल धरण्याची विद्या स्त्रियांना माहित होती, पण कृष्णाची वेणू, अर्जुनाची बन्सी वगैरे वगैरे जसें प्रसिद्ध आहे तसें कोणा स्त्रीचें वादन नामांकित नाहीं. खेळकरमणूकींच्या प्रांतीं स्त्रीपुरुषांना समान गोष्ट ह्मणजे पोहण्याची सांपडते. वस्त्रहरणाचा प्रसंग लक्षांत घेतला तर जलक्रीडा करण्याइतक्या स्त्रिया समर्थ होत्या हें लक्षांत येईल. श्रीकृष्णांनीं तर कदंब-वृक्षावरून कालियाच्या डोहांत उडी टाकली आहे, या पोहण्याच्या अत्यंतिक धाडसावरून त्या कलेच्या तत्कालीन विकासाची कल्पना येईल.

कंसरंगाच्या दाराशीं कुवलयापीड हत्तीशीं श्रीकृष्णांनीं मुष्टियुध्द केलें म्हटलें तरी चालेल! किंबहुना कुस्ती व मुष्टियुध्द यांचा सुंदर मिलाफ ह्मणजेच 'नियुध्द'. याशिवाय पक्षी मारण्याची विद्या त्यावेळीं मुलांना येत होती. राजघराण्यांतून अर्थात् ती कमी प्रतीची मानीत असावेत! भागवत स्कंद २ प्र० २ श्लोक २५ 'पक्षीमारा' च्या दृष्टीनें मनन करण्यासारखा आहे. 'पूतना' ही एक दांडगी Heronlike पक्षीण होती! कृष्णाला 'पक्षीमाऱ्या' ह्मणून रुक्मीणी टोला मारते असा महाभारतांत उल्लेख आहे; त्याला पूतनाप्रकरणच कारण. गोफणगुंडा अर्थात् ओघानेंच लक्षांत येईल. शिंगरासारखा हुतूतू घालणें, आज जसा मुलें आपआपसांत 'घोडाघोडा' खेळतात तसें 'गाईबैल' खेळणें, निसर्गाचा आस्वाद घेऊन कमळांचीं फुलेंपानें किंवा मोरपिसे यांचे अलंकार लेणें, हें त्यावेळच्या मुलांचे सर्वसाधारण खेळ होते ह्मटलें असतां वावगें होणार नाहीं. बैलांच्या झुंजीप्रमाणेंच 'हरिणाक्रीडन' हा एक लहानथोरांचा त्यावेळीं करमणूकीचा खेळ

दिसतो ! स्वतांस पाठीवर घालून पळवून नेत असतां बलरामानें ' प्रलंबा , स मारिलें नाहीं काय? द्यूत ऊर्फ जुगार हें त्यावेळीं देखील घातकी व्यसन मानीत; पण आव्हान आल्यावर माघार घेणें निपुण क्षत्रिय कमीपणाचें मानी ! धर्मराजांनीं वनवास व अज्ञातवास या द्यूतापायींच ओढवून घेतला होता !

## ' महाराष्ट्राचा इतिहास. '

"बाबर, अकबर, औरंगजेब जशी मोंगलशाही तशीच शिवाजी, बाजीराव व नाना फडणवीस ह्मणजे मराठेशाही. या मराठेशाहींतील गुणाविकृती ह्मणजे महाराष्ट्र संस्कृती. समर्थ— तानाजी— सारख्यामुळें तिची उभारणी झाली. राष्ट्रांतील मुलें तानाजीच असतात. तीं समर्थ व्हावीं लागतात, कर्तबगार व्हावीं लागतात. कर्तबगारीची इच्छा असल्यास आत्मविश्वास लागतो व तो इतिहासाचा उपयोग होतो. मागच्यापेक्षां पुढचा अधिक शहाणा होणें हाच खरा इतिहासाचा बोध आहे. आपल्याला धडाडीचा, युक्तीबुद्धीचा पण भाऊबंदकीला फांटा दिलेला इतिहास करावयाचा आहे."

## ' वर्तमान व भविष्यकाळ. '

हिंदुस्थानास वर्तमानकाळ जगाच्या बाजारांत नाहीं. ज्याला आस्तित्व ' आहे, असें जगाला पटतें त्याला वर्तमानकाळ असतो. असा वर्तमान-काळ असावयाला आपण आपल्याजवळ कांहीं विशेष आहे असें दाखविलें पाहिजे. ह्मणजे लोकां-पेक्षां आपल्याजवळ कांहीं न्यारा गुण आहे, हें आपण जगाला पटविलें पाहिजे. मात्र तुकारामानीं सांगितल्याप्रमाणें " तरिच जन्मा यावें । दास ई-श्वराचें व्हावें ।।, " कविवर्य टिळक ' जनसेवा ती ईश्वरसेवा ' ह्मणतात हें लक्षांत घेतलें तर अगर तुकारामानीं ह्मटल्याप्रमाणें 'नम्र झाला भूतां, तेणें कोंडिलें अनंता, ' या चरणाचें मर्म ध्यानीं वागवि-लें तर ईश्वर मेला, ईश्वर रजेवर, पेन्शनींत निघाला, या हकाटीकडे लक्ष देण्याचें कारण नाहीं. जनसेवेनें जन्मा आल्याचें सार्थक केलें जाईल. ' वेदांतीचा अर्थ आम्हांसीच ठावा ' असें ह्मणणाऱ्या तुकारामाचा ' जन्मा येणें ' प्रयोग ज्ञानदृष्टीचा जन्म घेणें हा होय. ' जन्मना जायते शूद्रः संस्काराद्द्विज उच्यते' तेव्हां उप-नयन संस्कारानें असो, डोळ्यांनी जगाचा ग्रंथ पाहून असो, कान उघडे ठेऊन सगळ्या जगाचें ऐकण्यानें असो, नाहींतर प्रत्यक्ष गुरुमु-खांतून व गुरूच्या आचरणांतून शिकल्यामुळें असो, आपण जें जें कांहीं नवीन ज्ञान मिळवितों त्यानें आपण अगदीं निराळेंच होतों. ह्मणजे शरीरनांव वगैरे सर्व कांहीं पूर्वीसारखेंच असतें; फक्त अक्कल, कर्तबगारी ही वेगळयाच दर्जाची बनतात. यालाच आर्यांचा ' दुसरा जन्म ' ह्मटलें आहे. हा जनसेवें-त लावावयाचा ह्मणजे ' जें जें कांहीं आपणांसि ठावे, तें तें दुसऱ्याशीं शिकवावें, शहाणे करुनि सोडावें, सकळजन ' असें केलें पाहिजे. आपण असें व्रत करूं तर आपला भविष्यकाळ आपणच वर्तवूं. आपल्या वर्तमानकाळांत आपण ' मेष-वृषभ' यांच्या राशींत पडतों तें ' सिंह-धन ' राशीचे स्वामी होऊं. आकाशांतील ग्रहांच्या फिरण्यानें कपाळाची रेषा उमटण्यापेक्षां मनगटाच्या जोरावर, बुद्धीच्या तल्लखपणावर आणि अंतःकरणाच्या वि-शालतेवर आपण सगळया जगाच्यावर डोकें काढूं व नैतिकदृष्टयाच काय पण यथार्थतेनेंही जगाचे जगद्गुरु व स्वामी होऊं. "

## पूर्वगोलार्धातील युद्धानें
# पाश्चात्यांचाच फायदा होणार.

सर्व आशियांतील राष्ट्रांचें एकीकरण व्हावें असें दासबाबूंसारखे पुढारी ह्मणत; कारण जगांत प्राचीन संस्कृती असलेली, अवाढव्य विस्तार व लोकसंख्या असलेली, तसेंच कच्या मालाचे आणि तो सुद्धां भरपूर, आगर अशीं चीन व हिंदुस्थान हींच राष्ट्रें आहेत. तेव्हां अशा राष्ट्रांचें एकीकरण होईल व त्यांत जपानसारख्या राष्ट्राचें पाठबळ असलें तर हीं राष्ट्रें ह्मणतील तसें इतर राष्ट्रांनीं ऐकलें पाहिजे अशी स्थिति होईल. हल्लीं युरोपांतील एकाहि राष्ट्रास आपल्या भागांत युद्ध नको आहे.

पूर्व भागांत युद्ध होईल व त्यांत जर आपल्याला फायदा करून घेतां येईल तर त्यांना पाहावयाचें आहे.

महायुद्धानंतर निघालेल्या प्रे. वुइल्सनच्या तत्वांला जर काळिमा माखूं नये असें वाटत असेल तर राष्ट्रसंघानें ह्या गोष्टींत लक्ष घातलें पाहिजे; व हें बजावण्यासाठीं ' चीन–दिन ' पाळला पाहिजे. शक्तीनें किंवा इतर साधनांनीं आम्ही हतबल झालों असलों, तरी 'प्रज्ञाहत' झालों नाहीं. ह्मणून साम्राज्यशाही स्थापन करण्याच्या इच्छेनें, पाश्चात्य राष्ट्रांसारखे परठिकाणचा देश न मिळतां शेजारच्या आपल्या भाईबंदावर जेव्हां जपान प्रताप गाजवीत आहे तेव्हां चीनबद्दल सहानुभूति दाखविणें आपलें कर्तव्य आहे.

---

# बोलघेवड्यांचा बाजारभाव.

बोले तैसा चाले, त्याचीं वंदावीं पाउलें." तुकाराममहाराजांचें हें विधान विध्यर्थी आहे. इष्ट काय, करावयास पाहिजे काय ? एवढेंच त्यांत सांगितलें आहे. आणि हा विध्यर्थही अगदीं धात्वर्थानें घ्यावयाचा आहे. निषेधाचा त्याला चुकूनही वास लागतां कामा नये असा हा विध्यर्थ आहे. "तालीराम जन्मभर अडखळत बोलला आणि अडखळत चालला " तेव्हां तो दारुबाज वंदनीय ठरविण्याकरतां तुकोबांची उक्ति नाहीं. सदर उक्ति विध्यर्थी ठेवण्यांत ह्मणजे व्यावहारिक व व्याकरणदृष्टयाही विध्यर्थी ठेवण्यांत सामाजिक मानसशास्त्राचा सूक्ष्म अभ्यास तुकारामांनीं दाखवला आहे. जिभेनें शद्ब उच्चारावा तशी पायानें वाट चालावी हा ज्यांचा शिरस्ता असे सज्जन वंदनीय होत; मग आपला व सज्जनांचा कितीही मतभेद असो; मतभेद नसला तरी मार्गभिन्नता असो; किंवा बोलण्याची सफाई व पायउचलीची पद्धती आपल्याला पाहिजे तितकी कुशल वा जलद नसो, समाजशास्त्राच्या दृष्टीनें व्यक्तिव्यक्तींच्या परस्पर व्यवहाराची ही गुरुकिल्लीच तुकारामांनींच लोकांच्या हवाली केली आहे. व्यक्ति स्वतंत्र तर समाजही स्वतंत्रवृत्तीचा होतो, बळकट होतो, असा टेंभा मिरवणारे लब्धप्रतिष्ठित या गुरुकिल्लीनें सामाजिक व वैयक्तिक व्यवहार खोलतील तर व्यक्तिपूजनाच्या पायावर पक्षभेदांचे उडणारे चिखल पार नाहींसे होतील. मनुष्य हा स्वभावतःच समाजप्रिय असल्यानें होतां होईल तो समाजाला सोडून वागण्याकडे त्याची प्रवृत्ति नसते. पण याचा अर्थ असा नव्हे कीं, त्यानें सामाजिक बहुमताचाही जुलूम विनाकारण सोसावा. आपल्या अभ्यासाच्या खोलींत बसून मनुष्याचें डोकें जितके स्वतंत्र विचार प्रसवतें, तितके विचार समाजांत बोलून दाखविण्यासही धैर्य दाखविणें त्या मनुष्याला जड जातें, मग ते सर्व विचार अमलांत–आचरणांत आणणें किती जड जात असेल बरें? वैयक्तिक मनोवृत्ति आणि

समाजमिश्र मनोवृत्ति यांत असा ध्रुवभिन्न भेद आहे. विचारारूढ व्यक्ति ज्या गोष्टी खाजगींत इष्ट वा अनिष्ट ह्मणून निर्भिळ शेरा मारते, त्याच गोष्टींवर समाजांत बसून अभिप्राय देण्याचा प्रसंग आला असतां खाजगींतल्यासारखेंच मत देईल असा बिलकूल भरंवसा नाहीं. कोणत्या निरीक्षकाला असा अनुभव नाहीं ? या वैयक्तिक आणि सामाजिक मनोवृत्ति कशा उत्पन्न कराव्या आणि उत्पन्न झालेल्या वा केलेल्या तसल्या मनोवृत्तींचा फायदा आपल्या राजकारणाला, समाजकारणाला किंवा इष्ट अन्य कारणाला कसा घ्यावा हें एक स्वतंत्र शास्त्र आहे; आणि मुत्सद्यांनीं, समाजसुधारकांनीं, समाजकंटकांनीं, संतांनीं व ढोंगधत्तुरेवाल्यांनीं त्या शास्त्राचा उपयोग केल्याचीं उदाहरणें जगाच्या इतिहासी पृष्ठापृष्ठावर रेखाटलेलीं आहेत. अर्थात् प्रत्यक्ष राहो, पण समाजाच्या अप्रत्यक्ष आक्रमणाला थोपवून धरून ' सत्यासत्याशीं मन केलें ग्वाही । मानियलें नाहीं बहुमता " अशी वृत्ति साचार धारण करणें सोपें काम नाहीं. उघडच, ही विवेक-दृष्ट सन्मार्गाचें प्रतिपादन आणि प्रतिपालन करणारी व्यक्ति खास खास कर्तबगार होय. आणि अशा स्वतंत्र वृत्तीच्या माणसांची संख्या समाजांत ज्या प्रमाणांत असेल त्या प्रमाणांत त्या समाजाचा मगदूर व मान्यता जगाच्या आखाड्यांत वाढत असते. पण समाजाचा जिवंतपणा दाखविणाऱ्या अशा व्यक्ति जेव्हां समाजांत ठळकपणें वावरतांना आढळतात, तेव्हां धोक्याचीं दोन ठिकाणें प्रत्ययाला येतात. एक या स्वतंत्र बाण्याच्या व्यक्तिव्यक्तींतच चुरस उत्पन्न होते किंवा समाजाकडून त्या स्वतंत्रवृत्तिच्या व्यक्तींचा छळवाद मांडण्यांत येतो. कोणताही प्रसंग ओढवला तरी परिणामीं समाजाला दुबळेपणा प्राप्त होण्यांत किंवा सुष्ट दुष्ट तोंडफिरवीनें समाजाचीं सहकारसुळें उखडून निघून त्याचीं अनेक अर्थांनीं शकलें होण्यांतच वरील घटनांचें पर्यवसान होतें. आणि असें झालें तर " नम्र झाला भूतां । तेणें कोंडिलें अनंता " ही अवस्था प्राप्त करून घेण्याचें ध्येय समाजसंगोपित मानवांपुढून कुठल्याकुठें चळून जातें; इतकेंच नव्हे तर मूळ माणुसकीचा मसालाच नासून जातो. अशा तऱ्हेनें हा एकतर्फी विचार झाला, तर उलट व्यक्तीलाही आपलीं मतें समाजावर लादण्याचा अखत्यार कांहीं आकाशांतून हातीं पडलेला नसतो. " पांचा मुखीं परमेश्वर " या न्यायानें, परंपरा या व्यक्तीव्यक्तीच्या डोक्यांत जें न कळत विचारचक्र सुरूं असतें, त्या सर्व चक्रांचा क्षण-संकलित सहकार ह्मणजेच समाजाचें मत असल्यानें,

स्वतंत्र असलें तरी व्यक्तीच्या

स्वतंत्र मताची मातब्बरी, अपवादात्मक प्रसंग सोडले तर, फारशी रहात नाहीं. एतावता, मानसशास्त्रदृष्ट्या विचार करतां व्यक्तिव्यक्ति आणि व्यक्तिसमाज यांच्यामध्यें मतभेदाचा प्रश्न उत्पन्न झाला असतां कृष्णार्जुनयुद्धाचा प्रसंग ओढवून मूळ जिवंतपणाची खाई पेटून राहूं नये ह्मणून किंडरगार्टन पद्धतीचा प्रत्यक्ष धडा देण्यासाठीं आचरणाची आवश्यकता भासते. तेव्हां बोलाप्रमाणें ज्यांचें आचरण घडत असेल, त्यांच्या त्या बोलाची व आचरणाची चिकित्सा करूनही त्या व्यक्तींना वंदनीय मानावें असा विध्यर्थी सल्ला तुकाराम महाराजांनीं दिला आहे. परस्परांच्या मनाची उदात्तता कायम राहून त्यायोगें समाजांत कसल्याही वितुष्टाचा वास येणार नाहीं. " बोले तैसा चाले त्याचीं पाउलें वंदा ।।" असा आज्ञार्थी उपदेश

तुकारामांनीं केला असतां, तर आपल्या एका विशिष्ट योग्यतेचा जुलूम त्यांनीं समाजावर केल्यासारखें झालें असतें. याउप्परही, कोणी आपल्या बोलाप्रमाणें चालतो ह्मणून त्याचीं पाउलें वंदावयास माणूस तयार होत नसून, त्याचे ते बोल माणसाला पटत असले तरच बोलाप्रमाणें चालणाराचीं पाउलें माणूस शिरसावंद्य करतो. हें जें आगरकरांचें मानसिक शास्त्रावर आधारलेलें विधान तें जगदुद्धारासाठीं तळमळणाऱ्या युध्यदृष्टीच्या तुकारामाला अनुभवाच्या कोशांत आढळलें नव्हतें. असें ह्मणण्याचा अनवस्था प्रसंग येईल. तात्पर्य आपल्या अभंगाचा चरण त्रिध्यर्थी ठेवण्यांत तुकारामानीं आपल्या दृष्टीचा विशालपणा तर दाखविला आहेच; पण काव्य आणि अतिशयोक्ति यांची सांगड न चुकतां घालणाऱ्या व्यवहारनिष्ठुराला समाजधारणेसाठीं जरूर असलेल्या परस्परसद्भवनेच्या तळपायरीवरून अर्थाची कितीही वजावाट केली तर, उतरतांच येऊं नये, इतका ठसठशीतपणा आपल्या विधानांत तुकारामांनीं राखला आहे.

पण, ही झाली बोलण्याप्रमाणें चालणारांची स्थिति. असली बाबुंदी जगांत जितकी भेटते, तिच्या दसपट सपीट पेरलेल्या पण साय काढून घेतलेल्या आटीव दुधाच्या चरव्याच आढळून येतात. किंबहुना बोलाचाच कढीभात घालून सहस्रभोजनाचें पुण्य जोडूं पाहणारे फार ! तेव्हां त्यांच्या दृष्टीची वाट काय करावयाची? त्यांच्यावरून जिवाभावाचें निंबलोण उतरून टाकावयास कोणीच तयार होणार नाहीं हें उघड आहे. तुकारामांच्या ज्या अभंगवचनांच्या आधारें आपण आतांपर्यंत वाटाघाट केली तींत बोलण्याची क्रिया अगोदरची असून चालण्याची क्रिया नंतरची आहे.

थोडासा श्लेष आहे हा. पण मानसशास्त्रदृष्ट्या शब्दांचा कीस तर्कावर काढतांना तो अपरिहार्य आहे. आधीं बोलावें आणि आपली नैतिक पत सांभाळण्यासाठीं तसें चालावें, हा सामाजिक सत्तेचा एक अप्रत्यक्ष प्रभाव आहे. विचार, उच्चार आणि आचार हा उत्क्रांतिचा स्वाभाविक क्रम आहे असें शिकवण्यांत येतें. आणि सर्वसाधारण गोष्टींत आणि सामान्य परिस्थितींत तें यथासांगही आहे. पण जसें हृदय भरून आलें कीं जीभ जखडून जाते, त्याचप्रमाणें कोणत्याही विचारांचें वेड मेंदूनें घेतलें कीं हातून कृतिची उभारणी झाल्याशिवाय स्वास्थ्याचा पत्ताच नसतो. अशा स्थितींत " आधीं केलें, मग सांगितलें " ही समर्थोक्ति उठावानें पुढें येते. पण येथेंही क्वचित् असें होण्याचा वा असण्याचा संभव राहतो कीं, अगोदर आपल्या हातून एकादी क्रिया घडावी आणि मग तीच योग्य होती हें ठरविण्यासाठीं तर्कशास्त्राच्या लपेटी शब्दसजावटींत जिभेनें कराव्या. ह्मणजे " चाले तैसा बोले " या प्रकरणाला शब्दपांडित्यांत गुरफटलेल्या दर्पोक्तिचा वास येत असतो. तथापि सामान्य विवेचनासाठीं अभंगवाणीसंबंधांतील सामाजिक सत्तेचा अपवादात्मक प्रसंग जसा आपण गाळला, तसाच मामला समर्थोक्तिलाही लावून, न्यायतः असें ह्मणतां येईल कीं " चाले तैसा बोले, " त्याच्या प्रत्यक्ष प्रयोगाचा कित्ता लोकांच्या पुढें असल्याकारणानें, लोकांनीं त्याला वंदनीय ह्मटलें किंवा मानलें नाहीं तरी त्याच्या बद्दलचा आदर किंवा दबदबा लोकमतांत पुष्कळ संचारत असतो. हा आदर किंवा दबदबा लोकमान्यतेची-लोक-वंदनाची पहिली निशाणी आहे. आणि नूतनसंशोधित भूमि-

वर आपला झेंडा फडकविण्याचा आनंद उपभोगण्यासाठीं मरणाला मगरमिठी घालून जशा सफरी कराव्या, तशींच कृतीचीं दिव्यें लोकवंदनेसाठीं व्हावीं लागतात. मग त्या कृतीसंबंधांतील बोल प्रस्थान ह्मणून कृतिपूर्वीं निघोत, किंवा प्रवचन ह्मणून कृतिनंतर निघोत ! !

आतां या किंवा याच्यापुढच्या खोल पाण्यांत शिरण्याच्या भानगडींत न पडतां, श्रीयुत चाल्यांचा निरोप घेऊन श्रीयुत बोल्यांच्याकडेच घटकाभर पाहूं या. श्रीयुत बोले हे चार गोत्रांत जन्म घेण्याचा संभव असतो. " सत्यं ब्रूयात्, प्रियं ब्रूयात्, न ब्रूयात् सत्यमप्रियम् " अशा मितभाष्यांचा, कांहीं असले तरी समाजांत टाळी पिटेल असेंच बोलणाऱ्या गोडबोल्यांचा किंवा वेडयांचे सहोदर शोभणाऱ्या व कधीं कधीं बडबडे या नांवानें ओळखले जाणाऱ्या बोल्यांचा आपणांस येथें विचार कर्तव्य नाहीं. समाजशास्त्राच्या दृष्टीनें तिसऱ्या बोल्यांचा विचार केवळ तेव्हांच कर्तव्य पडतो कीं, जेव्हां त्या वेडाला हॅम्लेटच्या वेडासारखी कांहीं शिस्त असते आणि ही शिस्त शालेयासारख्या ' वयाचा भार ' वहाणारांच्याही लक्षांत येते. राहतां राहिल्या गोडबोल्यांच्या दोन जाती; त्यापैकीं पहिली धूर्त असून दुसरी निव्वळ स्वार्थी आहे, आणि ह्मणून कमीअधिक प्रमाणानें, व्यक्तिविषयक विचारस्वातंत्र्याचा घटक जो समाजाच्या जिवंतपणासाठीं आवश्यक लागतो त्याच्या नरडीलाच नख देणारे ते वर्ग आहेत. या तीनही वर्गासंबंधीं आपल्याला येथें कर्तव्य नसून " समाजधारणेसाठींच जे नुसते बोले बनतात आणि विचारचालनेचें पाणी देण्यांतच पर्यवसान होण्याइतकेंच फार तर हाले किंवा चाले होण्याची ज्यांची तयारी किंवा कुवत, त्या ' अप्रियस्यापि पथ्यस्य ' बोल्यासंबंधीं मुख्यतः आपल्याला विचार करावयाचा उरला आहे. हा विचार करतांना नुकतेंच सांगितल्याप्रमाणें असल्या बोल्यांचीं चार गोत्रें चटकन् नजरेस येतात. पहिलें गोत्र ह्मणजे अनुभव. हा उभयविध किंवा उभयान्वयी असूं शकतो. उभयविध ह्मणजे चांगला अगर वाईट, पण स्वतां घेतलेला. धूम्रपानाचें साधें उदाहरण त्यासाठीं बस्स होईल. धूम्रपानाचें दुष्परिणाम समाजापुढें प्रतिपादणारे बोले , जन्मभर धूम्रपानानें आपल्या छातीचें देवद्वारी खोकें करून घेतलेले असतील, अगर स्वतां धूम्रपानापासून अलिप्त असल्यामुळें दणकट तब्बेतीचे असतील ! अथवा कांहीं काळ धूम्रपान करून व कांहीं काळ अलिप्त राहून, अगर आपला आणि दुसऱ्याचा अनुभव चोखाळून उभयान्वयी अनुभवाची जोड असलेलेही कोणीं बोले असतील. पैकीं धूम्रपानानें आपल्या छातीचें खोकें करून घेतलेले गृहस्थ अगर कांहीं काळ तो अनुभव चाखून कांहीं काळ दुसरा अनुभव घेतलेले प्राणी दोन तऱ्हांच्या टीकांना पात्र होतात. व्यसनाधीन आहेत पण ज्यांना दुष्परिणामांनीं आपला हात अजून दाखविला नाहीं असे महात्मे निषेधक बोल्यांची 'रससेवनाची पद्धतीच दिशाभुलीची होती' असा शेरा मारतात, तर प्रसंगवशात् ती लज्जत चाखणारे किंवा सुदैवानें तो गंध न लागलेले सुखात्मे "करून करून भागली आणि देवपूजेला लागली" या कोटींत बोल्यांना ढकलून देऊन रिकामे होतात.

स्वतां बोले पहिल्यापासूनच धोतर झाडून मोकळे असले तर एकतर्फी "मुखमस्तीति वक्तव्यं" हें पदक त्यांना मिळतें आणि स्वतांच्या व परक्यांच्या अनुभवांची तुलना करून ते आपल्या

जिभेचा पट्टा चालवित असले तर समाजाकडून कधीं कधीं मुगाचे लाडू खाण्यांत येतात व कधीं कधीं असें गरगटे करण्यांत येते कीं बोल्यांच्या शब्दांचें सारें फुळकवणी बनून राहतें.

परक्यांच्या अनुभवाचीं वडील भावंडें ह्मणजे इतिहासाचा बोध, सुतराम विचारवन्तांनीं केलेल्या वा करू घातलेल्या विचारप्रवर्तनाचा ठसा वा अधिकारी लेखनांनीं लिहिलेल्या ग्रंथांनीं केलेली जागृति हीं होत. या भावंडांचे खेळही बोले उत्पन्न करतात. येन केन प्रकारेण लोकांच्या डोळ्यावर आलेले व सामुदायिक जीवनावर आपल्या चरित्र-खंडांनीं बरावाईट परिणाम करणाऱ्या व्यक्तिंचा नोंदलेला अनुभव ह्मणजे इतिहास. त्याच्या आधारावर आपली शब्दगंगा सोडणाऱ्या बोल्यांना "सांगे वडिलांची कीर्ति" असा टोमणा मिळतो व काळभिन्नतेचें कुलूप त्याच्या तोंडाला घालण्यांत येतें. विचारप्रवर्तकांचा हस्तक ह्मणून जीभ पाजळणाऱ्या बोल्यांना "पढविलेले पोपट" ह्मणून हेटाळणी सोसावी लागते, तर ग्रंथजागृतीनें वाणी शिणवणाऱ्या बोल्यांना "तुका काय ह्मणे तें कळलें, तुह्मी काय ह्मणतां तें रडा" असा आहेर लाभतो. आधीं केल्याची ग्वाही तर या ऐतिहासिक गोत्रांतील बोल्यांना बिलकुल नसतेच नसते ! पण, टीचभर मोजमापाच्या आयुष्यांत सगळे अनुभव स्वतांच चाखावयाला सवड आहे कुठें ? आणि ह्मणूनच तर इतिहास – ग्रंथ – तत्वज्ञांचें महत्व. मग या कुळांतील बोल्यांच्या पुढें नुसतीं नाकें खाजवून माकडचेष्टा करण्यांत किफायत तरी काय, कोण जाणे ! !

बोल्यांचें तिसरें गोत्र ह्मणजे कवींचें. 'कवि शब्दाला जितके ह्मणून अर्थ देतां येतात, तितके सगळे लक्षांत घेऊन तें नामाभिदान केलें आहे. कल्पनाश्वारूवर बसवून वाऱ्यासारखा मेंदू बेफाम सोडणारा एकादा सुसंगत तर्कवादी असो, भावनांच्या माळा घेऊन गंधर्वनगरीच्या अप्सरांशीं गुजगोष्टी करणारा रंगराव असो, किंवा डोळ्यांच्या खांचा करून प्रयोगशाळेंत परमाणूंचे प्राण वेंचित बसण्यानें भूषण मानणारा संशोधक असो, आपआपल्या परिश्रमांच्या शेषजिव्हांनीं तो बोले बनतो. कविकुळांतील असल्या बोल्याच्या जिभेनें विजेच्यासारखा धक्का श्रोतृसमाजाला मिळत असतो आणि मोठी तारांबळ उडते. "नानारत्ना वसुंधरा" अशा उद्गारांनीं सुरवातून सदर बोल्यांना "आश्चर्यवत्पश्यति" चा सन्मान मिळतो किंवा "शून्यींच्या स्वर्गांतील शहाण्यांचे कांदे" अशी बेफिकीरिची गुलाबी शालजोडी अर्पण होते.

बोल्यांचें चवथें गोत्र ह्मणजे शर्विलकाचें. ईश्वरानें अक्कल वाटली त्यावेळीं हें मुख्य सभामंडपांत मानाच्या पाटावर बसण्याऐवजीं प्रवेशद्वारापाशीं उभे होते. तेथें असतांना, दुसऱ्यांच्या भागीचें तेज पाहून पाहून यांच्या डोळ्यांना दिपण्याची व अंतःकरणाला गुदगुल्या होण्याची संवय लागली, आणि शेवटीं पदरीं पडलेली पुंजी इतरांच्या बरोबर मांडली तर खालीं मान घालण्याचा प्रसंग यावयाचा ह्मणून कीं काय, तसला वक्तच टाळण्यासाठीं त्यांनीं काढता पाय घेतला आणि जीभ सैल सोडली. उथळ पाण्याला खळखळ फार या न्यायानें, दुसरा कोणी एकादा नवा मनोरम अगर अद्भुत विचार बोलला रे बोलला–मग तो कितीही एकान्तांत, खाजगी वा गुपचूप कां बोलेना – कीं हे बोले त्याची उचलेगिरी करतात व लोकसमुदायाच्या चावडीवर त्याची थाली पिटून पार रिकामे होतात. जरा यांना आडवे-

तिडवे घेण्याचा प्रयत्न केला, सूर्यांचीं पिलें दाखवलीं, थोडेसे डावे–उजवे डिवचलें कीं वरून मोठी तकतकीत दिसणारी या बोलघेवड्यांची साल चटकन् 'टच्' असा आवाज देते व आपल्या पोकळपणानें असले बोले जगाची बत्तीशी बाहेर काढतात व काढायला लावतात.

या बोलघेवड्यांपैकीं जे थोडेफार हात हालवून कृतिकेवडे होतात त्यांच्या बोलफुलांचा प्रश्न कसा सुटतो याचें दिग्दर्शन मागें केलेंच आहे. पण जे कां आपले बोलांचींच बोळकीं मांडून संसार करतात, त्यांना कांहीं किंमत आहे कीं नाहीं? बाजारी भाषा वापरून फड मारावयाचा असेल, तर असें ठीक ह्मणतां येईल कीं, "त्यांत काय अर्थ आहे हो ? तशाला कां कांहीं मोल आहे ? " पण मग या बाजारी भाषेंत बाद अंकही धरावा लागतो, हें विचारांतीं तरी कबूल करावें लागेल. मनुष्याचे सारे व्यवहार बोलावरच चालले असतांना, नुसत्या बोल्यांना कोणी पुसत नाहीं, हें ह्मणण्यांत काय पुरुषार्थ आहे ? मनुष्यानें अपूर्णत्वाकडून पूर्णत्वाकडे जाण्याचा मार्ग मेंदूनें आंखला आणि आज विकासवादानें त्याला झेपली तेवढी मजल त्यानें पायानें मारली. पण मेंदूची आंखणी आणि हातापायांची चोखाळणी यांची अंदाजीं किंवा नक्की ठेवण मनुष्याच्या जिभेनेंच जगाला दिली. एरवीं 'नसता कवींचा व्यापार । तरी कैंचा जगदुद्धार' असे उद्गार कृतिकेवडा रामदास तरी कसा काढता? जगाचा इतिहास दिव्य तेजानें जेथें जेथें ह्मणून चमकला आहे, तेथें तेथें ' कवि ' हा प्राणी क्वचितच आघाडीला दिसेल. त्याच्या हृदयाचा मर्दानी भाग जनानी भागाच्या सहकारित्वानें सदैव नांदत असल्याकारणानें पडद्यामागच्या शद्बांनीं जगाच्या रंगभूमीवर पात्रें खेळवावीं, तीं उठावानें खेळवावीं एवढीच भूमिका परमेश्वरानें त्याच्याकडे ठेवल्याचा दाखला इतिहासाच्या दप्तरीं आहे. शिवाय, कविगोत्रांतील असोत वा अन्य गोत्रीचे नांव सांगोत, बोल्यांना नांवें ठेवणारे नाकाच्या फेंदारण्यामुरडण्यापेक्षां किंवा हातकरण्यादाखवण्यापेक्षां जिभेच्या वेटोळ्यांचाच उपयोग ज्यास्त करीत असतात. मग, स्वतंत्र विचार हे व्यक्तीच्या व समाजाच्या जिवंतपणाचें लक्षण असतांना ते बोलून दाखविण्याचेंही जरूर तें जिवंतपणाचें काम करणाऱ्या समाजहितचिंतक बोल्यांनाच बोल कां लागावा, हें कळत नाहीं !

पण आणखीही एका रीतीनें या प्रश्नाचा विचार करतां येण्यासारखा आहे. " बोल बोलतां वाटे सोपे। करणी करतां टिरी कांपे " हें कोणीही नाकबूल करणार नाहीं. बोल बोलण्याचें व करणी करण्याचें सामर्थ्य जगांत सर्वांना लाभत नाहीं. एरवीं, कवि, मुत्सद्दी कीं रणनोवरा श्रेष्ठ असे वादविवाद प्रत्येक राष्ट्राच्या इतिहासांत केव्हां ना केव्हां तरी होऊन, त्यांची योग्यता व किंमत त्यांच्या त्यांच्या परी राष्ट्राला आहे, असा एकमताचा निर्णय कधींच बाहेर येता ना. एरवीं, वरील श्रमविभागाच्याच तत्त्वावर उभारलेली " ऐकावें जनाचें । करावें मनाचें " ही म्हण जगांतील सर्व प्रतिष्ठित भाषांत आपलें स्थान पटकावती ना ! या ह्मणीच्या पोटीं मनुष्यस्वभावाच्या बारीक सारीक छटांचें कसें सुंदर विस्तृत प्रदर्शन थाटलेलें आहे हें पाहिले ह्मणजे मन थक्क होतें; आणि बोल्यांच्या नांवानें खडे फोडणारेही सदर म्हण वापरतात ती तिच्या पोटींचें प्रदर्शन न पाहतां वापरतात, ह्मणून हसूं आवरत नाहीं.

भाकरीसारखें जनतेला कोठल्याही बाजूला तोंड करतां येतें, तेव्हां तिच्या तोंडाला तोंड देत बसण्यांत अर्थ नाहीं; आपलें मन जें आपल्याला सांगत असेल तेवढेंच करावें; हा कृतिकेवडे होण्याचा उपदेश तर त्या ह्मणींत आहेच आहे. पण बोलघेवडयांची श्रमविभागणीही तींत अमान्य केली नाहीं. कृतिकेवडयांनीं मनचें तेवढें करावें हें सांगतांनाच आपला पोंच-पेंच-पांच पाहून पाऊल टाकावयास सांगितलें आहे हें खरें; पण आपल्या अंगच्या ईश्वरी देणग्या कालस्थलप्रसंगानुसार अमक्या एका कारणीं व अमुक वळणानेंच लागतील याचें गणीत प्रत्येकाला सोडविण्याची शक्ति असतेच असें नाहीं. अर्थात् कोणातरी भाष्यकाराला वाट पुसतच कोणाही कृतिकेवडयाला पुढें सरकावें लागतें. आणि भाष्यकार म्हटला कीं, तो एक वा अन्य गोत्रींचा बोलेच असावयाचा.

" केल्यानें देशाटन, पंडितमैत्री सभेंत संचार। मनुजा चातुर्य येतसे फार " असें सुभाषित आहे; त्याला तरी बोल्यांच्या तोंडाचाच उगम आहे. मनुष्य,किंवा खरें सांगावयाचं ह्मणजे त्याचें वैशिष्टय-विशदीकरण (ज्याला वरील सुभाषितांत चातुर्य असें संबोधिलें आहे तें) मनुष्याच्या डोळ्याचा जसा एक भाग आहे, तसाच त्याच्या कानाचाही आहे. एरवीं देशाटन करतांना पंडितमैत्रीचा लाभ घेतांना अगर सभेंत संचार करतांना मनुष्यानें डोळयांत तेल घातलें आणि कानांत खुंटया अगर दडे बसवले तर त्याच्या अंगीं येणारें चातुर्य अर्धवटच उतरणार नाहीं काय ? समर्थ एवढे कृतिकेवडे. पण त्यांनीं संभाजी राजांना उपदेश करतांना नुसतें " शिवरायांचें कैसें चालणें " पहावयास सांगितलें नसून " शिवरायांचें कैसें बोलणें " तेंही लक्षांत घ्यावयास लिहिलें आहे.

बोल्यांच्या बाजूला परमार्थांतच काय पण प्रत्येक अर्थांत हवी असलेली श्रवणभक्ती ही आपली ढालतलवार घेऊन उभी आहे. श्रीमद्दासबोधांत श्रवणभक्तीचें केलेलें सुंदर वर्णन वाचल्यावर बोल्यांच्या अंगावर तिरस्काराचें किरण फेंकण्याची कोणाची शामत आहे ? मनुष्याला पशुत्व सोडून पाशुपतधारी परमेश्वरत्वाकडे जातांना जरूर त्या सर्व गुणांना अंगीं मुरवून घेऊन त्यांचा स्व-भाव करावयाचा असतो. याचाच अर्थ सद्गुणांच्या सवयी

जडवून घ्याव्या लागतात. आणि संवयी ह्मणजेच अभ्यास. फिरून अभ्यास ह्मटला कीं, वळण आलेंच. वळणाला मनन लागतें; मननाला पण विषय पुरविण्याचें काम, डोळे व कान यांच्याकडेच. आणि ह्मणून मनुष्यप्राण्याला जोंपर्यंत कानांचा उपयोग व्हावा ह्मणून ते देवानें दिले आहेत, तोंपर्यंत बोल्याचा ह्मणजे मनुष्याला देवानें दिलेल्या जिभेचा उपयोग करतां येणारांचा भाव कोणत्याही तऱ्हेनें कमी मानतां येत नाहीं. समाजाची, राष्ट्राची, जगाची सेवा आपल्या जिभेनें करण्याचें व्रत ज्यांनीं धरलें, ते हातानें व बुद्धीनें सेवा करणारांच्या मध्येंच शोभण्यासारखे खास आहेत. तें वरील सर्व दृष्टीनेंच होय.

## चित्पावन.

आपण आर्यवंशांतील श्रेष्ठशाखीय आहोंत, बुद्धिमान आहोंत; पण सर्व हिंदु समाजाबरोबर आपल्याला आपली संस्कृति ऋणप्रधान आहे, धनप्रधान नाहीं, याचा विसर पडला आहे. देव-ऋण, पितृऋण, देशऋण वगैरे ऋणें फेडण्यासाठीं यज्ञ स्वार्थत्याग करण्याची कल्पना नाहींशीं होत आहे. ' सर्व यज्ञे प्रतिष्ठितं ' हा मंत्र सोडल्यानें

'कृण्वन्तो विश्वमार्यं' ही महत्वाकांक्षाहीं नाहींशी झाली आहे. चित्पावन हा नुसता सत्पावन् असूं नये, त्याचें नुसत्या जगण्यावर संतुष्ट राहूं नये, तेजस्वी, चैतन्यमय, त्याचें जीवन पाहिजे. 'सांगे वडिलांची कीर्ति' असें वागणाऱ्यांना समर्थांनीं निराळी पदवी दिली आहे. ते चित्तपावन अगर चित्–पावन नव्हेत. To the nation my best, to the individual only the necessary. असा दंडक ठेवून, श्रमाचें उत्पत्तीक्षम जीवन जगलें पाहिजे व यासाठीं आपली श्रेष्ठ व परिणित अशी सामाजिक भूमिका टिकवून ठेविली पाहिजे. अशा ध्येयानेंच स्वतंत्र संघटना आंखली, टिकविली व चालविली पाहिजे.

## दासबोध.

ज्याला लोकांच्यावर सत्ता चालवावयाची असेल त्यानें परमेश्वरी पूर्णतत्त्वाकडे अखंड लक्ष देऊन आपलें प्रत्येक पाऊल टाकलें पाहिजे. ऐहिक आणि स्वार्थी गोष्टीपासून त्यानें कमालीचें अलिप्त असलें पाहिजे. वैयक्तिक आकांक्षा त्यानें मालवून टाकल्या पाहिजेत. समजूतदारपणा फाकविला व विकासविला पाहिजे. विकारांना मुसक्या घातल्या पाहिजेत, आणि जुलूमशाहीच्या जडीबुद्दीच्या सिंहासनावांचून दुसरीकडे पायही न टाकणाऱ्या पशुवृत्तीला लगाम लावून कायमची खेंचली पाहिजे. आरत्या ओवाळून घ्यावयाची त्याला आवड असतां कामा नये. सुखलालसेला त्यानें सोडचिठ्ठी दिली पाहिजे. आपल्या अत्युच्च पदाला आवश्यक असलेलीं कर्तव्यें त्यानें अभंग तत्परतेनें पार पाडलीं पाहिजेत.

लोकपुढारी व्हावयाचा कस असा धारेवर धरणारा आहे. तो सार्वकालीन आहे. मग तुकारामांनीं वर्णन केल्याप्रमाणें–

" थोर या युगाचें आश्चर्य, ब्रह्मकर्म उत्तम सार । सांडुनिया द्विजवर दावलपीर स्मरताती ॥ १ वा हरीहरांनीं म्हटल्यासारखी–

" कलिचेनि योगें धर्म तो राहिला । अधर्म चालिला बहुसाल ॥ १ ॥ शैव आणि शाक्त अगमादि जाण । आचरती जन बहुधा ते ॥ २ ॥ शद्बें ब्रह्मज्ञान बोलती सुंदर । होती शिष्योदर पारायण ॥ ३ ॥ अंगीं नाहीं पाहतां वैराग्याचा लेश । वरीवरी वेष मिरविताती ॥ ४ ॥ कर्माचा तो लोप जनीं करवून । यथेष्टाचरण करताती ॥ ५ ॥ किंवा खुद्द समर्थांनींच सांगितली तशी—

" पदार्थ मात्र तितुका गेला । नुसता देशची उरला । येणेंकरितां बहुताला संकट आले ॥ १ ॥ लोकें स्थानभ्रष्ट झालीं । कित्येक तेथेंचि मेलीं ॥ माणसा खावया नाहीं धान्य । आंथरूण पांघरूण तेंही नाहीं । घर करावया सामग्री नाहीं । काय करिती ॥ कितेक अनाचारीं पडलीं । कितियेक यातिभ्रष्ट जाली ॥ कितेक ते आक्रंदली । मुलें बाळें ॥ ऐसें जालें वर्तमान । पुढें अवघा अनमान । सदा दुश्चित अवघे जन । उद्वेग रूपी ॥ अद्यापि दुश्चिन्हें दिसतीं । दुष्ट ग्रह आदळती । पुढेंही वाईट सांगती । कित्येक ॥ कांहींच पहातां धड नाहीं । विचार सुचेना कांहीं । अखंड चिंतेच्या प्रवाहीं । पडिले लोक ॥ "

स्थिती असतांना लोकपुढारी व्हावयाचा प्रथम परिच्छेदांत सांगितलेला कस किती धारेचा असेल याची कल्पनाच करावी ! कल्पनेलाही शहारे आणणाऱ्या त्या दिव्याला पुरे पडणारे महंत ऊर्फ लोकपुढारी उत्पन्न करून छत्रपती शिवाजी महाराजांच्या कार्याला श्रीमत् दासबोधानें जोड दिली

आणि " स्नानसंध्या टिळेमाळा । अंतर्निष्ठ उपासना । नित्यानित्य विवेकानें । धन्य संसार होतसे ॥ मर्यादा न्यायनीतीची । अन्याय न घडे कदा । सन्मार्ग योग देवाचा ॥ ध० ॥ देवालयें शिखरें रम्यें । धर्मशाळा परोपरी । परत्र साधकां लोकीं ॥ ध० ॥ अन्नोदकें वस्त्रदानें । धन्य धन्य ब्राह्मणीं भजे । उदासवृत्तीनें लोकीं । ध० । वावी, सरोवरें, टाकीं । मठ वृक्ष परोपरी । उपकार समस्तै लोकां । ध० । पराचे जीविंचे जाणें । आस्ति नास्ति विचारणा । अत्यंत सर्व भूतांसी । ॥ ध० ॥ कदापि सत्य सोडिना । नित्य नेमस्त बोलणें । ओढतो बहुतां लोकीं । ध० ॥ होमयाग पुरश्चरणें । निरुपणें हरिकथा । ब्रह्मसंतर्पणें यांचा । ध० ॥ वगैरे वगैरे थाटानें महाराष्ट्राचें आनंदवनभुवन झालें. अर्थात् अशा प्रभावी रचनेचे रघुनाथ पंडितासारख्या रसरंगानें

" आह्मांतुह्मांस भव-वारिधिमाजी तारु ।
जे वाचितां परिसितां मग होय तारु ॥ "

असें वर्णन केलें ती समर्थरचना आहे तरी काय? असा प्रश्न डोळयापुढें येतो आणि ग्रंथराजाच्या निरिक्षणाला नमस्कारपूर्वक सुरवात होते.

आणि प्रथमदर्शनीं प्रतीत होते ती गोष्ट ही कीं, ~~शके १५७१ पासून १६०३ पर्यंत~~ विचारपूर्वक तयार होत राहिलेल्या दासबोधाची रचना मध्यकालीन इतर संतमंडळींच्या विषयरचनेहून पुष्कळ प्रकारें भिन्न आहे. भाषा गोड. शुद्ध व सुलभ आहे. विषयाची रचना अत्यंत व्यवस्थित व सुसंगत आहे. लोकमान्यांनीं निर्वाळा दिला आहे कीं, " उत्कटभक्ति आणि त्याबरोबरच आमरणान्त ईश्वरार्पणपूर्वक निष्काम कर्म असें जें प्रवृत्तिपर भागवतधर्माचें लक्षण किंवा गतिचा सिद्धांत याचा पूर्ण खुलासा कोणास पाहिजे असल्यास तुकाराम महाराजांनींच शिवाजी महाराजांस ज्या सद्गुरूस शरण जाण्यास सांगितलें त्या श्रीरामदास स्वामींच्या दासबोधग्रंथाकडेच त्यानें वळलें पाहिजे ......... कर्म योगाचें खरें महत्त्व शुद्ध व प्रासादिक मराठी भाषेंत सांगितलेलें ज्यास पहावयाचें असेल त्यानें समर्थांच्या दासबोधाचें व त्यांतल्यात्यांतही विशेषेंकरून उत्तरार्धाचें पठण केलें पाहिजे.

तर मग आपण प्रत्यक्ष दासबोधाकडेच पाहूं. ग्रंथारंभीं ईशस्तवन असावयाचेंच; तसें दासबोधाच्याही आरंभीं आहे. पहिला स्तवनदशक शारदा-गणेश-गुरुसभा-कवि-श्रोते-नरदेह इतक्यांचीं स्तवनें करतो. याचा अर्थच असा आहे कीं, व्यष्टि, समष्टि आणि परमेष्टि यांच्या समरूप समुच्चायानच खराखुरा परमार्थ व परमेश्वर प्रतीति होते हें ठरविण्याचा समर्थांचा उद्देश आहे.

आतां हें जर खरें, तर व्यक्तिसुधारणेवर समाजाची उन्नतावस्था अवलंबून असल्याकारणानें, आणि ज्या समाजांत व जगांत आपण राहतों त्या समाजाचा व जगाचा एक कर्तव्यदक्ष घटक प्रत्येक व्यक्तीनें होणें जरूर असल्याकारणानें व्यक्तिविकासार्थ मूर्खलक्षणापासून विरक्तलक्षणापर्यंत दुसऱ्या दशकीं दासबोधानें चर्चा केली आहे.

समाजाचा व जगाचा कर्तव्यदक्ष घटक होण्याकडे लक्ष ठेऊन व्यक्तीनें आपलें जीवन हाकारावयाचें ह्मणजे स्वार्थत्यागाचा–यज्ञाचा–विरक्तीचा प्रश्न हाटकून येतो. सहकार्य हें जितकें सुखावह तितकेंच त्यागमय असतें. दांपत्य, दोस्ती, एकत्र कुटुंब यांचा अनुभव ज्यांना असेल त्यांना तें निराळें सांगावयाची जरूरी नाहीं. होडींत बसणाऱ्या प्रत्येक

व्यक्तीनें सर्वच्या सर्व होडीची वाहतूक निर्धास्त होण्यासाठीं जपावें लागतें; आपल्या सुखरूप सुरक्षिततेपुरतेंच पाहून चालत नाहीं. अर्थात् सर्व होडीच्या कुशल वाहतुकीसाठीं कां होईना, प्रत्येक व्यक्ति आपआपल्यापरीं तयारीची असावी लागते. समाजशास्त्राच्या दृष्टीनें यालाच व्यक्तिविकसन ह्मणतात. पण नुसत्या व्यक्तिविकसन शद्बामागील समाजघटकत्वाची रंगरचना लक्षांत न आल्यामुळें व्यक्तिविकसन ह्मणजे स्वतःच्या पायापुरतीच वहाण कापणें असा खोटा अर्थ होऊन बसतो. संकुचित स्वार्थाच्या असल्या खोटेपणानें ज्यावेळीं व्यक्ति आपलें जीवन काढीत असतात त्यावेळीं समष्टीस्वरूप संसार तर नासतोच नासतो; पण व्यक्तिविषयक संसाराचेंही वाटोळें होतें. ‘ घटं विध्यात् पटं छिंद्यात् ’ असा सारा कारभार होऊन बसतो. त्याचें सुंदर वर्णन दासबोधाच्या तिसऱ्या दशकांत पहावयास सांपडतें. अर्थात् असल्या कचाटयांतून सुटून व्यष्टीच्या दृष्टीनें नेटका संसार समष्टीकडे व परमेष्टीकडे ह्मणजेच समाजाकडे लक्ष देऊन करावयास शिकविण्यासाठीं नवविधा भक्तीच्या दासबोधांतर्गत चतुर्थ दशकाचा अवतार आहे. श्रवणभक्तीचें सूक्ष्म विवेचन, इतर कोठेंही सांपडणाऱ्या त्या भक्तीच्या वर्णनापेक्षां व्यक्तिविकासनाच्या अप्रतिबंध कार्यासाठीं अचूक मार्गदर्शक नाहीं काय ?

समष्टी व परमेष्टी यांच्यावरील दृष्टी न सुटूं देतां आणि न चळूं देतां व्यक्तिविकासनाचा उपदेश भक्तिद्वारां करतांना परमेश्वराच्या बरोबरीनें गुरुपूजा सांगितली आहे. आपल्यापुढें कांहींतरी आभासमय ध्येय ठेवून चालण्यापेक्षां उदाहरण ह्मणून ध्येयपुरुष ठेवावा आणि त्याच्या तत्वाची वर्तनपूजा साधावी असा आधुनिकांचा सिद्धांत आहे. गुरुपूजेंत आधुनिक विभूतीपूजेचें केवढें तरी उदात्त स्वरूप दाखविलें आहे बरें ? ध्येयपुरुषाची वर्तनपूजा साधतांना त्या ध्येयपुरुषाच्या तत्वज्ञानाचा अभ्यास अंगीं मुरावा लागतो. तो मुरण्याकरितां त्या तत्वज्ञानाचें मुख्य सूत्र वा मंत्र समजला पाहिजे. तो न समजतांही अंधळयासारखें अगर अनुकरणप्रिय बालस्वभावानें ध्येयपुरुषाच्या पावलावर पाऊल टाकणें होत नाहीं असें नाहीं. “ करणी करतां जातें सोपें । उमज धरतां बुद्धी थोपें ” अशी एक चिनी म्हण आहे. नसत्या माकडचेष्टेचा प्रकार वरील तऱ्हेच्या वर्तनानें गळयांत येतो. ह्मणून एकनाथांची एकनिष्ठा ध्येयपुरुषाच्या वर्तनपूजेसंबंधीं ठेवण्याची आवश्यकता गुरुशिष्यसंबंधाचे व मंत्राचे महत्व वर्णन करून दासबोधाचे पांचव्या दशकांत दाखविलें आहे. याच गुरुशिष्यसंबंधाची व सायुज्य मुक्तीची सांगड काय आहे, याचा धागा सहाव्या दशकानें स्पष्ट केला असून आध्यात्म ऊर्फ देवशोधन ह्मणजेच व्यक्तिविकासनाची अंतीमसीमा काय व कशी आणि कां व कोणत्या वळणाची, हें स्पष्ट मांडलें आहे.

दासबोधाची रचनाच गुरु-शिष्य संवादाची आहे. अर्थात् गुरूनें शिष्याला तरबेज करण्याच्या परिणामकारक उपायांचा त्यांत अवलंब केला असला तर नवल काय ? शिष्याची स्मृति सूर्यकिरणाइतकी ताजी रहावी ह्मणून दिलेल्या शिकवणीची उजळणी मोजकेपणानें करण्याची गुरुजनांची चाल असते. नवीन द्यावयाची शिकवण शिष्याच्या मनावर ठसावयास हा जुना धागा उपयोगी पडत असतो. दासबोधांत हा प्रकार वारंवार पहावयास सांपडतो. उदाहरणार्थ, सातवा दशकच पहा. त्याचा पहिला समास हा मागील दशकांतील सर्व विवे-

चनांचें सिंहावलोकन असून दुसऱ्या समासापासून ब्रह्मविवरणाला सुरवात आहे. ब्रह्माचे पर्याय, चौदा ब्रह्में म्हणजे काय ? शुद्ध ब्रह्म कशास ह्मणतात ? ब्रह्म, ब्रह्मांड आणि पिंड यांचे परस्पर संबंध कोणते वगैरे गोष्टींचा उलघडा सदर सातव्या दशकांत समर्थांनीं करून अद्वैत निश्चयानें पशूचा परमेश्वर होणें हें मानवी जीवनाचें सार्थक स्पष्ट करून दाखविलें आहे. पण, मग हें जर खरें तर फार पूर्वीपासून चालत आलेलें-मनुष्यानें पशूचा परमेश्वर होण्याचे–जे दोन मार्ग संन्यास आणि योग त्यांतला अचूक कोणता अवलंबावा; कारण " ब्रह्म होऊन संसार करणें । विहित नव्हे, " असा प्रश्न उत्पन्न होतो आणि त्याचें समर्पक उत्तर सातव्या समासापासून दहाव्यापर्यंत समर्थांनीं मोठ्या चतुराईनें दिलें आहे. व्यष्टीनें परमेष्टरूप प्राप्त करून घेतल्यावरही त्याचा लोकांना ह्मणजे समष्टीलाही उपयोग होतो, ह्मणून ' कर्मसंन्यासात्कर्मयोगोविशिष्यते ' हा गीतेप्रमाणेंच समर्थांचाही सिद्धांत आहे.

ओघानेंच कर्मयोग आचरणारा असतो तरी कसा, हें शिष्याच्या मनावर ठसविणें जरूर होतें. ह्मणून त्याप्रीत्यर्थ आठवा दशक खर्ची घातला. तथापि ब्रह्म व त्याच्या अनुषंगानें जो मायेचा प्रश्न उद्भवला होता त्याचें उत्तर देऊन शिष्याला निःशंक करणें जरूर असल्यामुळें तें प्रथम उरकून नंतर समर्थांनीं कर्मयोग्याचें स्वरूप विषद केलें आहे.

कर्मयोगी हा ' समदुःख सुखक्षमी ' असेल; पण कर्माला अकर्म करून राहणारा हा सिद्धहि जर साध्या माणसासारखाच दिसावयाचा आणि जर " अंतर्निष्ठांच्या खुणा अंतर्निष्ठ जाणती " तर सिद्ध आणि साधा यांच्यांतील तफावत एका ज्ञानाशिवाय दुसऱ्या कशानें कळणार ! पण मुळांत जेथें ज्ञान खुंटतें तेथेंच जर ब्रह्मप्राप्ती होते, तर कर्मयोग्याला या विचिकित्सेंत पडण्याचें कारणच काय ? प्रकाश पाडीत रहावयाचें एवढेंच सूर्याला ठाऊक असतें. आपल्या प्रकाशापासून चंद्राचें किरण अमृतमय होतात आणि मर्त्य जगाला जीवनजंतु मिळतात म्हणून मी कोणी श्रेष्ठ आहे असा अभिमान कर्मयोगी सूर्याच्या ठिकाणीं बिलकूल नसतो. ही स्थिति कर्मयोगी बनल्यानंतरची असल्याकारणानें त्याच्यापूर्वी "मायोद्भवानंतर त्या मायोद्भवालाच चिकटून असलेल्या गुणरूपाचेंहि " वर्णन शिष्याला स्पष्ट करणें जरूर होतें व तें दासबोधाच्या नवव्या दशकानें केलें असून, गुणमायातीत म्हणजे संन्यास अं[illegible] मुरलेला कर्मयोगी कसा असतो याची फिरून एकदां उजळणी पाठोपाठ जगज्जोती नामक दहाव्या शतकांत ' पिंडीं तेंच ब्रम्हांडीं ' आपल्यावरून जग पारखावें याचा उलगडा करून पहिल्यापासून आतांपर्यंत सांगितलेल्या शिकवणीचा आढावा घेतला आहे.

अशा तऱ्हेनें दहा दशकभर व्यक्तीची परमावधीची उन्नती करण्याचा बिनचूक मार्ग सांगितल्यावर समष्टीच्या संबंधांत परमार्थाचा मानवी संसाराला उपयोग करून घेण्याची युक्ती दासबोधाच्या भीमदशकानें दाखविली आहे. प्रपंच असो, नाहीं तर परमार्थ असो, त्याचा नेटका निर्वाह विवेकाशिवाय होत नाहीं. जो कर्मयोगी असतो त्याचा संसार आपल्या कुटुंबापुरता असेल, नाहीं तर संन्यासाच्या अंतीम कल्पनेप्रमाणें सगळें जग त्याचें कुटुंब बनलें असेल. कांहीं असलें तरी वि[illegible] कपूर्ण अभ्यासानें चालणाऱ्या त्या परमार्थ्यासाठीं समर्थांनीं येथें लोकसंग्राहाचा दंडक दिला आहे,

आणि दंडक घेऊन लोकपुढारी ऊर्फ महंत होणाऱ्यानें व्यवहारतः काय करावयास पाहिजे याचें विवेचन स्पष्टपणें केलें आहे. व्यक्ती निष्काम झाली तरी शरीरपात होईपर्यंत जर एक वा अन्य ऱ्हेचें कर्म त्या मागचें सुटत नाहीं, "यद्यदा चरति …स्तत्त देवोतरो जनः" या न्यायानें कर्मयोग्यानें

भोवतालचा प्रपंच सावरावयाचा

तो स्वतः अलिप्त राहून सावरावयाचा असला तरी, " परस्पर सुधारणेनें अगर दैवावर विसंबून " तो सावरावयाचा नाहीं; तर झीज सोसून, जन-स्थल-कालमान राखून कार्य केलें पाहिजे असें विवेकवैराग्यनामक बाराव्या दशकाचें व्याख्यान आहे. स्वाचरण व प्रबोधशक्ति या प्रयत्नांच्या मुख्य दिशा लोकसंग्रहात्मक महंतीला ऊर्फ कर्मयोगी पुढारीपणाला आवश्यक म्हणून ठसवून समर्थांनीं बाराव्या दशकांत ' महंतानें महंत करण्याची महत्वाकांक्षा बाळगावी, असें उत्तेजन दिलें आहे.

" नम्र झाला भूतां । तेणें कोंडिलें अनंता " ही समर्थपदवी प्राप्त करून घेण्याच्या या दुसऱ्या टप्प्यावर आल्यानंतर झालेल्या ज्ञानाच्या दृढीकरणासाठीं स्वस्थ चित्ताचें स्मृतिसंशोधन सबंध तेराव्या दशकभर दासबोधानें केलें आहे. प्रपंच-परमार्थाची सांगड घालून महंतानें चालावयाचें व चालवावयाचें; तरी समष्टीचा गाडा हाकतांना शरीरधारणा ऊर्फ पोटाचा प्रश्न डोळे वटारून पुढें उभा राहतो हें विसरून चालणार नाहीं. निस्पृहपणें लोकसंग्रहात्मक धोरणानें समाजाचा संसार हाकतांना परमेष्टीवरील दृष्टी चळतां कामा नये म्हणून भक्तिमार्गाचा फैलाव महंतानें केला, त्यासाठीं कीर्तनरंग उभारला, आपल्या अंगच्या ' कांहीं एक उत्कटत्वानें ' लोक भारून टाकले, तरी त्यानें बुवाबाजी चुकूनही करतां कामा नये, असा चौदाव्या दशकांत समर्थांनीं शिरस्ता घालून दिला आहे. पोटाकरितां महंतानें भिक्षा मागायाची खरी; पण ती समाजाची लूट करण्याकरितां नव्हे किंवा तुकाराम महाराजांनीं म्हटल्याप्रमाणें "भिक्षा पात्र अवलंबिणें जळो जिणें लाजिरवाणें" अशा हीन वृत्तीकरितांही नव्हे, तर शरीर धारणेकारितां. पण मग ही शरीरधारणा कोठें दोन पाट्या टाकून कां करूं नये अशी शंका येईल. उत्तर इतकेंच कीं समाजाच्या—धारण—पोषणाच्या आणि विकास-बंधनाच्या संसाराचें सूत्र महंतानें हातीं घेतलें असल्याकारणानें त्याच्या पोटाची काळजी समाजानें केलीच पाहिजे. " जिथें काम तिथेंच पोट " हा आधुनिक युगाचा सिद्धांत आहे. समर्थांनीं फक्त पोटच व पोटापेक्षां दाणाही अधिक नाहीं इतकीच भिक्षा- एक मुष्ठि भिक्षा-घ्यावयाचा उपदेश महंताला दिलेला आहे. आणि ही एक मुष्ठि भिक्षा घेतांना देखील समाजाचें कार्य म्हणजे " लहान थोर परीक्षून घ्यावयास सांगितलें आहे. " समाजांतील लहान थोरांची परीक्षा झाल्याशिवाय एकंदरींत सामाजिक उठाव साधतां येत नाहीं, हें लक्षांत घेतलें म्हणजे साध्या संसाऱ्यापासून महंतापर्यंत कशा पद्धतीनें गेलें असतां व्यष्टि, समेष्टीचें कार्य होऊन व्यष्टीला परमेष्टीसुद्धां साधते हें अखंड ध्याननामक चौदावा दशक सांगत असल्याकारणानें लोक पुढारी होऊं इच्छिणाऱ्यानें त्याकडे ध्यान देणें जरूर आहे.

दहाव्या दशकापर्यंत व्यष्टीला परमेष्टी रूप होण्यासाठीं करावा लागणारा अभ्यास ज्याप्रमाणें सांगितला त्याप्रमाणेंच भीमदशकापासून व्यष्टीनें समेष्टी स्वरूप होता होता परमेष्टी स्वरूप कसें

व्हावें हे पंधराव्या दशकाअखेर सांगितलें आहे. व्यष्टी, समेष्टी, परमेष्टीचा मेळ घालण्यास मोक्षाची खरी आर्य कल्पना व्यष्टी, समेष्टी, विकास शास्त्रास धरून बहारीची मांडण्यांत आलेली आहे. आणि तेवढयाच भागाचा सिंहावलोकनात्मक भाग या आत्मदशकांत येऊन गेला आहे. समेष्टीच्या भूमिकेवरून परमेष्टीच्या भूमिकेकडे जाण्याचा उपक्रम सप्ततिन्वय दशकांत मानवी जगाच्या पलीकडच्याही भूतमात्राशीं समरस होऊन प्रतिपादन केलेला आहे. पंचभूतात्मक सृष्टिच वैचित्र्यानें भरली असल्याकारणानें व विविधत्वामुळेंच अस्तित्वांत टिकत असल्यामुळें तिला व्यापून राहणाऱ्या परमात्म्याला ओळखण्याचें विविध सांप्रदाय निघाले तरी आश्चर्य नाहीं. या विविधतेंत असलेल्या एकरूप परमेश्वराला विवेकानें ओळखून उपासना केली व चालविली पाहिजे.

तात्पर्य, कर्ता करविता देव एक हें तत्व समेष्टींतून परमेष्टी पाहण्यांत आणि त्याचप्रमाणें व्यष्टि आणि समेष्टि यांच्या एकजीव मिळणीनें परमेष्टिकडे धांव घेण्यांत कसें समाविष्ट झालें आहे हा प्रकृतिपुरुष नामक सतराव्या दशकाचा आहे. या विविधता-पूर्ण जगांत व्यष्टि समेष्टिच्या समन्वयाचा व्यावहारीक मार्ग बहुजिनसी असणार हें उघड आहे; म्हणून अठराव्या बहुजिनसी दशकांत महंताला ऊर्फ लोक पुढाऱ्याला असें सर्व मार्ग सांगून असा इषारा दिला आहे कीं, जो जागृत राहून आस्ते आस्ते श्रवणमननपूर्वक अभ्यास करीत जातो तो प्रत्यय घेत घेत अज्ञ जनांस सांभाळत सांभाळत समर्थ पदवीला पोंहोचतो. मात्र एकांति विचारविवरण हा त्याचा अमोघ मार्ग असतो.

पशूचा परमेश्वर होण्यासाठीं आणि त्यासाठीं दुसऱ्याला मार्ग दाखविण्याकरितां येथपर्यंत महंतासाठीं ऊर्फ लोकपुढाऱ्यासाठीं व्यष्टि, समेष्टी व परमेष्टि यांच्यावर दृष्टि देऊन मानवी जीवनाचें जें सूत्ररूप विवेचन केलें त्याचा व्यष्टि, समे[illegible] समन्वयापुरता स्मृतिसुंदर समारोप शिकवण नि[illegible] पण दशकांत समर्थांनीं केला असून पुढील पूर्ण दशकांत व्यष्टि—परमेष्टि, समेष्टि—परमोष्टि यांच्या समन्वयानें व्यष्टि—परमेष्टि—समेष्टि या उत्क्रांतीचा तर्कशास्त्र समारोप केला आहे.

अशा रीतीनें महंत ऊर्फ लोकपुढारी उत्पन्न करण्याच्या शाळेचा अभ्यासग्रंथ समर्थांनीं महाराराष्ट्राला दिलेला आहे. विषयाच्या प्रतिपादनांत ओघानें आलेल्या पोटविषयाचेंही तपशिलावर वर्णन बारीकसारीक छटांसह समर्थांनीं केलें असल्याकारणानें व अध्ययन पद्धतीशीं उजळणी आणि फेरउजळणीचा निकट संबंध असतो याची भूल पडल्याकारणानें अक्षर-वाचकाला श्रीमत् दासबोध म्हणजे एक समर्थांच्या लहरीनीं निपजलेली वांगमय-कंथा वाटतें. तथापि अर्थ—वाचकाला वर दिग्दर्शीत केल्याप्रमाणें श्रीमत् दासबोध पुढारीपणाचे शिक्षण देणारा प्राणग्रंथ असल्याचें अभ्यास-नजरेनें प्रत्ययाला येतें. आणि इतिहास तर असें बजावून सांगतो कीं, 'जगतः स्थितिकारणमभ्युदयनिश्रेयसहेतुर्यःस धर्मः' या न्यायानें, "सामर्थ्य आहे चळवळीचें । जो जो करील त्याचें । परी तेथें परमेश्वराचें । अधिष्ठान पाहिजे ।" असें आश्वासून "आधीं प्रपंच करावा नेटका । मग पहावें परमार्थ विवेका" अशी शिकवण देणारा समर्थांचा महाराष्ट्रधर्म म्हणजे सतराव्या शतकांतील स्मृतिग्रंथ होता. शक-

पूर्व हजार वर्षांखालीं मराठी लिपी अस्तित्वांत आल्यापासून, 'खटनटाशीं खटनट घालून' सुद्धां

अगोदर जगणें आणि मग चांगल्या

तऱ्हेनें जगणें कसें जगावें व तद्द्वारां समाजाची प्रगतीपर धारणा कशी साधावी हें अनुभवसिद्ध सांगणारा दुसरा स्मृतिग्रंथ मराठींत झालाच नाहीं. विशाल हृदयानें आणि व्यापक दृष्टीनें, इस्लामी संस्कृतीला पचनीं पाडून संग्रह-बुद्धि हिंदुधर्मानें समाजाच्या ' चढत्या वाढत्या पदवी ' साठीं जें समर्थ स्वरूप धारण केलें, त्याचा प्रभाव गेल्या सत्तावनच्या शिस्तसूट स्वातंत्र्ययुद्धापर्यंत जगाच्या डोळ्यांचे किरण साधल्या-शिवाय रहात नसे.

दास म्हणजे गुलाम समजा, दास म्हणजे साधा सेवक समजा अगर दास ह्मणजे परमेश्वराशीं एकरूप होऊं पाहाणारा परमार्थी समजा. दासबोध हा चतुर्थी तत्पुरुष समास घेऊन आपल्याला असें ह्मणतां येईल कीं, त्याच्या उद्धाराचा नेमका रस्ता समर्थांनीं दाखविला आहे. दास बोध हा तृतिया-तत्पुरुष समास घेण्याचीही चाल आहे. तसें केल्यास ' दास ' या शद्वाचा जो आपण अर्थ घेऊं, त्याप्रमाणें समर्थांचा किंचित् अत्युक्त विनय अगर आत्मविश्वास प्रगट होईल. मात्र "आधीं केलें मग सांगितलें " या ब्रीदाचे समर्थ असल्याकारणानें ' दास ' शद्वाचा तिसरा अर्थ घेऊनच आत्माविश्वासपूर्ण असें आपल्या ग्रंथाचें नामाभिदान केलें असावें, असा आमचा विश्वास आहे. तथापि ' दासबोध ' हा तृतियातत्पुरुष व चतुर्थीतत्पुरुष असा दोनही तऱ्हेचा समास एक-समयावच्छेदेंकरून सोडविण्याचाही कांहीं सुबुद्धांचा सांप्रदाय आहे. तोही मोठा अर्थबोधक असून, निरनिराळ्या तऱ्हेनें समास घेऊन जी अर्थप्रचिति होते, त्यापेक्षां या समासद्वयाच्या एकीकरणानें समर्थांच्या सामाजिक आपुलकीला बहारीचा रंग चढतो आणि ' समासां ' नीं म्हणजे कोऱ्या जागांनीं लिहिलेल्या दासबोधाचीं अक्षरें म्हणजे तीं अक्षरेंच तेवढीं नसून तीं अक्षरें सुचवितात त्या अर्थाचा खोल अभ्यास केला नाहीं तर कोरी जागा वाचत बसल्याचाच अनुभव येईल. या भीतीनें मननपूर्वक अभ्यासाकडे चित्त वेधतें. कारण दासबोध " अभ्यासेंचि प्रगट " झाला आहे.

॥ दासबोध ॥



# आभार.

साहित्य सेवा मंडळाचे सदस्य श्री. पु. पां. ऊर्फ बाबुराव गोखले यांची साहित्यिक म्हणून प्रसिद्धी आहेच. मंडळाच्या प्रथम प्रकाशनापासून श्री. बाबुरावजींनीं मंडळाला जें सहाय्य केलें आहे तें खरोखर अमोलिक आहे. तसेंच उदयोन्मुख साहित्य सेवकाला उत्साहानें उत्तेजन देऊन साहित्यक्षेत्रांत त्याचें पाऊल पुढें पडण्यास आपल्या ज्ञानाचा फायदा देण्याची त्यांची कळकळ मंडळांतील व इतरही साहित्यप्रेमी व्यक्तींना परिचित आहे.

सा. से. मंडळानें आजवर सामुदायिक साहित्याचेंच प्रकाशन केलें आहे. व्यक्तिगत असें मंडळाचें हें प्रथम प्रकाशन आहे. या प्रकाशनास श्री. बाबुरावजी यांच्या पत्नी, गोखलेवाङ्मयाच्या एकमेव विश्वस्त सौ. सुलोचनाबाई गोखले यानीं अनुमती दिली हें त्याही साहित्यसेवा मंडळाच्या सदस्या असल्यानें त्यांच्या मंडळाबद्दलच्या आपुलकीस साजेसेंच आहे.

श्री. बाबुराव हे सुप्रसिद्ध साहित्यिक आहेत, एवढेंच नव्हे तर त्यांची सामाजिक व राजकीय क्षेत्रांतील कामगिरीही महशूर आहे. कोणतेंही कार्य विशेष गाजावाजा न करतां करण्याचें त्यांचें नेहमीचें धोरण असलें तरी प्रसंगानुसार जनतेसमोर येऊन आपले विचार लोकांपुढें मांडावे लागतातच. " बोललेल्या शब्दांइतके लिहिलेल्या शब्दांनीं लोक वश होत नाहींत; फार काय पृथ्वीवरील प्रत्येक मोठ्या चळवळीची वाढ महान् वक्त्यांमुळें जशी झाली तशी महान् लेखकांमुळें झाली नाहीं. " जर्मनीचा अरेराव हेर हिटलर याच्या या उद्गारांत संपूर्ण नसलें तरी अर्ध सत्य आहे खास. या दृष्टीनें श्री. बाबुरावजींनीं जें वक्तव्य केलें त्याचे वृत्तपत्रांच्या रकान्यांतून शिल्लक राहिले ते प्रतिध्वनी प्रस्तुत पुस्तकांत संकलित केले आहेत." अभ्यासेंचि प्रकट झालें " हे बोल तरुणांना " प्रकट होवोनि नासावें हें बरें नव्हें " अशी शिकवणूक देतील असा भरंवसा आहे.

हा भरंवसा येण्यास जे जे कारणीभूत झाले त्यांत श्री. गोखले यांचीं व्याख्यानें घडवून आणणाऱ्या संस्था, तीं व्याख्यानें प्रसिद्ध करणारीं वृत्तपत्रें व त्यांचे वार्ताहर आणि प्रस्तुत पुस्तकाची सजावट करण्यास सहाय्य करणारे प्रस्तावक व मुद्रक यांचा येथें साभार उल्लेख केल्याशिवाय राहवत नाहीं.

साहित्य- सेवा मंडळ कचेरी,
कऱ्हाड.

**बाळकृष्ण वासुदेव घाटे,**
चिटणीस, सा. से. मंडळ, कऱ्हाड.